








## महिला व बाल विकास विभाग

# मंत्रालय, मुंबई

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

# महिला धोरण
## २०१४







## महिला व बाल विकास विभाग

### महाराष्ट्र शासन

महाराष्ट्र शासन

समान हक्क
महाराष्ट्र राज्य महिला आयोग

बाल हक्क आयोग

महिला आर्थिक विकास महामंडळ

# महिला धोरण

## २०१४

### अनुक्रमणिका


| अ.क्र. | विषय | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ | पार्श्वभूमी | १–३ |
| २ | प्रस्तावना | ४–६ |
| ३ | महिलांसाठी सनद | ७ |
| ४ | महिलाकेंद्री अर्थसंकल्प | ८–९ |
| ५ | जाणीव–जागृती/स्वयंसेवी संस्थांचा सहभाग/संनियंत्रण व पर्यवेक्षण | १०–१३ |
| ६ | शिक्षण व संशोधन | १४–१८ |
| ७ | महिला वसतिगृहे | १९ |
| ८ | पाळणाघर | २० |
| ९ | आरोग्य | २१–२२ |
| १० | स्वच्छतागृह सुविधा | २३ |
| ११ | व्यसनमुक्ती | २४ |
| १२ | पर्यावरण | २५–२६ |
| १३ | सांस्कृतिक धोरण | २७–२८ |
| १४ | महिला व उद्योग | २९ |
| १५ | महिला आणि कायदा | ३०–४१ |
| १६ | महिला लोकप्रतिनिधींचे राजकीय सक्षमीकरण | ४२–४३ |
| १७ | कृषी, ग्रामीण, शहरी व आदिवासी क्षेत्रातील महिलांची भुमिका/पाणी पुरवठा. | ४४–५५ |
| १८ | असंघटित कामगार महिला | ५६–५८ |
| १९ | अपंग व मतिमंद महिला | ५९–६० |
| २० | एकल महिला | ६१–६३ |
| २१ | प्रबोधनात्मक लोक कलावंत (शाहिरी) | ६४–६५ |
| २२ | देवदासी पुनर्वसन | ६६–६७ |
| २३ | देहविक्री करणाऱ्या महिलांसाठी | ६८–७२ |
| २४ | तृतीयपंथी व्यक्तींकरीता | ७३–७६ |
| २५ | विविध क्षेत्रातील महिलांच्या योगदानाबद्दल पुरस्कार | ७७ |
| २६ | ऋण–निर्देश | ७८–८३ |

# १. पार्श्वभूमी

महाराष्ट्राला पुरोगामी, सामाजिक व राजकीय सुधारणांची प्रदीर्घ परंपरा आहे, राजमाता जिजाऊ, छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा ज्योतिबा फुले आणि क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले, गोपाळ गणेश आगरकर, महर्षी कर्वे, राजर्षी शाहू महाराज, भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर, कर्मवीर भाऊराव पाटील, विठ्ठल रामजी शिंदे अशा असंख्य विभूतींनी महाराष्ट्राची जडण घडण केली आहे. महात्मा गांधी आणि पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या प्रेरणेने राष्ट्रीय स्वातंत्र्य चळवळीतून ती अधिकाधिक समृद्ध होत गेली आहे. स्व:कर्तृत्वावर सत्ता मिळाल्यानंतर राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर दिवंगत इंदिरा गांधी यांनी महिलांचे प्रभुत्व सिध्द केलेले आहे. महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री माननीय श्री.यशवंतरावजी चव्हाण यांनी या परंपरेचे जतन केले. महाराष्ट्रातील काही ज्ञात आणि असंख्य अज्ञात समाज सुधारकांनी लक्षणीय बदल केले, या समाज सुधारकांमुळे महाराष्ट्राच्या मातीला अभिनव कल्पनांची आणि नाविन्यपूर्ण संस्थांची जन्मभूमी अशी ख्याती प्राप्त झाली आहे. त्या स्त्रिया या धोरणाच्या स्फूर्तीस्थान आहेत.

भारतीय संविधानाने दिलेले मूलभूत हक्क आणि अधिकार हा स्त्रियांच्या विकासाचा पाया आहे. त्याचप्रमाणे महिला आणि समाजातील दुर्बल घटकांसाठी विशेष कायदे करण्याची तरतूद घटनेमध्ये केलेली आहे. तथापि, महिलांकडे बघण्याचा समाजाचा आणि शासनाचा दृष्टीकोन प्रामुख्याने कल्याणकारी उपक्रमांच्या लाभार्थी असाच राहिला. महिला विकास प्रक्रियेचा अविभाज्य घटक होऊ शकल्या नाहीत. या तत्वाकडे दुर्लक्ष झाले. राष्ट्रीय स्वातंत्र्य चळवळीत, तसेच दुर्बल घटकांच्या हक्कांच्या चळवळीत जातिप्रथा, विषमता निर्मूलन, कामगार–शेतकऱ्यांच्या चळवळी, सामाजिक सुधारणा, उत्पादन प्रक्रिया यात स्त्रियांचा महत्वपूर्ण सहभाग होता, स्वातंत्र्योत्तर काळात शिक्षणाचे प्रमाण वाढले असले तरी एकूण सामाजिक, आर्थिक, राजकीय जीवनात महिलांचा अपेक्षित सहभाग वाढलेला दिसत नाही. कौटुंबिक आणि सामाजिक असुरक्षितता, बेरोजगारी, स्थलांतर, आरोग्य सेवा व अन्य दैनंदिन सुविधांचा अभाव यांचा परिणाम महिला व मुलांवर प्रकर्षाने दिसून येऊ लागला. पिण्याच्या पाण्याचा अभाव, दारिद्रय, कुपोषण, बालमृत्यू दर त्यातही गर्भलिंगनिदान चाचणी व त्यामुळे कमी होणारी मुलींची संख्या, महिला आणि मुलींची विक्री, यातून महिलांच्या मानवी हक्कांची पायमल्ली होताना दिसत आहे, गेल्या वीस वर्षात आपल्या देशाने उदारीकरणाचे धोरण स्वीकारल्याने, आर्थिक आणि सामाजिक घडीमध्ये मोठे बदल झाले. हे बदल अनेक क्षेत्रांत लाभदायक ठरले असले, तरी तळागाळातील लोक, विशेषकरून महिलांपर्यंत विकासाची ही फळे अधिक प्रमाणात पोहचणे आवश्यक होते. ती पाहिजे त्या प्रमाणात महिलांपर्यंत पोहचू न शकल्यामुळे जो असमतोल निर्माण झाला, त्यातून मानवी हक्कांच्या उल्लंघनाचे नवे प्रकार वेगाने वाढू लागले आहेत.

केवळ भारतातच नव्हे तर जगातील सर्व देशांमधील महिलांच्या थोडफार फरकाने याच समस्या आहेत याची नोंद घेणे आवश्यक आहे.

१९४८ साली संयुक्त राष्ट्र संघाने मानवी हक्कांची सनद तयार केली, त्यातही महिलांचे काही वेगळे प्रश्न आहेत आणि त्यांचा मानवी हक्काच्या दृष्टीने उहापोह झाला पाहिजे असा विचार नव्हता. स्त्रिया मागे राहिल्या तर समाजच मागे पडत जातो याची जाणीव होऊन संयुक्त राष्ट्रसंघाने १९७५ हे वर्ष प्रथमत: आंतरराष्ट्रीय महिला वर्ष जाहीर केले आणि त्याचेच पुढे महिला दशकात रूपांतर केले. त्याचे औचित्य साधून भारत सरकारने एक समिती नेमून समतेकडे वाटचाल हा महिलांच्या परिस्थितीविषयक अहवाल तयार केला. या अहवालांतून भारतीय महिलांच्या परिस्थितीचे सम्यक दर्शन घडते. महिलांचे, शिक्षण, आरोग्य, रोजगार, विघातक सामाजिक चालीरिती, प्रथा, परंपरांचा त्यांच्यावर होणारा परिणाम व उपाययोजना आदी संदर्भात त्यातून ठोस मांडणी करण्यात आली.

संयुक्त राष्ट्रसंघाने आपल्या सदस्यांनी एका विशिष्ट गतीने महिलांची प्रगती घडवून आणावी यासाठी आंतरराष्ट्रीय संकेत तयार केले. त्यात १९७९ मधील सीडॉ (Convention on the Elimination of All Forms of Discrimination Against Women) हा अत्यंत महत्वाचा दस्तऐवज मानला जातो. तसेच

- South Asian Association for Regional Cooperation (SAARC)
- International, Civil & Political Documents Cairo 1994
- Beijing Platform For Action 1995
- Millennium Development Goals 2000

हे आंतरराष्ट्रीय बांधिलकी असलेले दस्तऐवज महिला धोरण ठरविण्यासाठी पायाभूत मानावे लागतील.

केवळ कागदोपत्री सुधारणा करून भागणार नाही. महिलांना प्रत्यक्षात सन्मानाने जगता आले पाहिजे, सर्व क्षेत्रांत महिलांना समान संधी मिळाली पाहिजे आणि समान स्थानही मिळाले पाहिजे. महिलांसाठी केलेल्या सर्व कायदेशीर तरतूदींची आणि कार्यक्रमांची अंमलबजावणी केली गेली पाहिजे. ही जबाबदारी प्रथमत: राज्य व केंद्र शासनाची आहे.

उपरोक्त दस्तऐवजातून स्त्री हक्क व अधिकारांची जरी तपशिलवार नोंद झालेली असली तरी अंमलबजावणीत येणाऱ्या अडचणी खूपच आहेत.

१.१ एकूण मानवी समाज पितृसत्ताक व पुरूषप्रधान असल्याने स्त्री, पुरूषांवर लिंगभेदाधिष्ठित संस्कार होतात. स्त्रियांसाठी वेगळी नीतीमूल्ये आणि पुरूषांसाठी वेगळी नीती मूल्ये लावली जातात. या विचारसरणीचा पगडा सर्व शासकीय संस्थावरही असल्याचे जाणवते. न्याय यंत्रणा, दंड यंत्रणा, नोकरशाही, राज्य यंत्रणा, राजकीय संस्था, प्रसार माध्यमे, शिक्षण संस्था तसेच राजकीय पक्ष आणि खाजगी आस्थापना, कृषी उत्पादना संबंधात सर्व क्षेत्रे त्यापासून मुक्त नाहीत, त्यामुळे महिलांवर जात, धर्म, वर्ग आणि लिंगभाव अशा सर्व बाजूंनी अन्याय होत असतो.

१.२ समाजातील सर्व प्रकारच्या संस्थांवर पुरूषवर्गाचे संख्येने तसेच वैचारिक वर्चस्व आणि नियंत्रण असल्याने महिलांसाठी घटनात्मक तरतूद असली तरी त्यांना सत्तेत भागीदारी करण्यात अनंत अडचणी येतात. परिणामी सर्वच ठिकाणी त्यांचे प्रतिनिधीत्व फारच कमी आहे.

१.३ शिक्षण व आरोग्याची हेळसांड, हिंसाचार यामुळे महिलांचे सक्षमीकरण व सबलीकरण यात अडचणी येतात.

१.४ सन १९७५ नंतर स्त्रियांमध्ये जागृती करण्याचे प्रयत्न मोठ्या प्रमाणात झाले तसे प्रयत्न पुरूष जागृतीसाठी झाले नाहीत.

या अडचणींवर मात करण्यासाठी महिलांविषयक उपरोक्त दस्तऐवजातून केलेली तात्विक मांडणी तसेच प्रत्यक्ष कृती कार्यक्रम व अंमलबजावणीची व्यूहरचना यांची सुस्पष्ट आणि सूत्रबद्ध मांडणी करणे अत्यंत गरजेचे आहे. महाराष्ट्र राज्याच्या महिलांविषयक धोरण या दस्तऐवजातून ती करता येईल.

यापूर्वी १९९४ साली त्यावेळचे महाराष्ट्राचे माननीय मुख्यमंत्री श्री.शरदचंद्र पवार यांच्या पुढाकाराने महिला धोरण तयार करण्यात आले. अशाप्रकारचे धोरण बनविणारे अग्रेसर राज्य अशी महाराष्ट्राची ओळख त्यातून निर्माण झाली. या धोरणाच्या आखणीत महाराष्ट्रातील सर्व प्रमुख महिला संघटनांनी महत्वपूर्ण सहभाग घेतला होता. नंतर २००१ साली पुन्हा महाराष्ट्र शासनाने तत्कालीन मा.मुख्यमंत्री दिवंगत विलासराव देशमुख यांच्या नेतृत्वाखाली महिला धोरण तयार केले होते. या दोन्ही धोरणांमुळे काही चांगले निर्णय झाले व उपक्रम मार्गी लागून महिलांबाबतच्या दृष्टिकोनाला दिशा लाभली.

दुसरे महिला धोरण जाहीर होऊन १२ वर्षे झालेली आहेत. त्यानंतर अनेक सामाजिक आणि आर्थिक व्यवहारात अनेक बदल घडून आले. काळानुसार व न्यायाच्या अधिक जवळ जाण्याच्या उद्देशाने काही कायद्यात सुधारणा झाल्या. प्रसार माध्यमांच्या जागतिकीकरणामुळे काही आव्हाने उभी राहीली. या बदललेल्या परिस्थितीशी सुसंगत व महिलांना एक व्यक्ती म्हणून घटनेने दिलेले अधिकार सक्षमपणे वापरता येतील, असे पोषक सामाजिक वातावरण निर्माण होण्यासाठी नव्याने सर्वंकष धोरण जाहीर करणे आवश्यक आहे.

म्हणून हे तिसरे महिला धोरण प्रसिध्द करतांना आम्हांला विश्वास वाटतो की, त्यामुळे महिला सक्षमीकरणाच्या प्रक्रियेला अधिक गती मिळेल, पुरूषांच्या संवेदनशीलतेला चालना मिळेल व सर्वसामान्य महिलांना दिलासा मिळेल. यामुळे महाराष्ट्र हा खरोखरच सर्व क्षेत्रात अग्रस्थानी राहील, अशी आम्हांला खात्री आहे. समाजाचा एक परिपूर्ण आणि समान घटक म्हणून महिलांना समान स्थान प्राप्त व्हावे, यासाठी महाराष्ट्र सरकार कटिबद्ध आहे.

***********

## २. प्रस्तावना

महिलांबाबत होणारे सर्व प्रकारचे भेदभाव दूर करण्यासंबंधी संयुक्त राष्ट्र संघटनेच्या आमसभेने १९७९ मध्ये ठराव संमत केला होता. महिलांबाबत भेदभाव दूर करणे आणि आपल्या न्याय व्यवस्थेत समानतेचे तत्त्व समाविष्ठ करणे हे या ठरावावर सही केलेल्या सर्व देशांना बंधनकारक आहे. या पार्श्वभूमीचा एक भाग म्हणून, महाराष्ट्र शासनाने सन १९९४ मध्ये महिला धोरण जाहीर केले. बदलांशी सुसंगत रहाण्याच्या दृष्टीने वेळोवेळी या धोरणांतर्गत घेतलेल्या निर्णयांची फेरतपासणी करून त्यात आवश्यकतेनुसार बदल घडवून आणण्याची तरतूद १९९४ च्या धोरणात करण्यांत आलेली आहे. ही बाब विचारात घेऊन तसेच कालानुरूप झालेल्या बदलाचा विचार करून शासनाने सन २००१ मध्ये दुसरे महिला धोरण जाहीर केले.

या दोन्हीही धोरणांमध्ये प्रामुख्याने महिलांवरील अत्याचार, हिंसा, महिला विषयक कायदे, त्यांच्या आर्थिक दर्जात सुधारणा, प्रसार माध्यमांची भूमिका, स्वयंसेवी संस्थांचा सहभाग, महिलांना केंद्रस्थानी मानून नियोजन, स्वयंसहाय्यता बचतगटांचा विकास, महिला विषयीचे हक्क व कायदे याबाबत जनजागृती यावर प्रामुख्याने भर देण्यात आला. या दोन्ही धोरणांच्या अनुषंगाने महिलांच्या विकासाच्या विविध बाबींवर विशेष लक्ष केंद्रीत केले. त्याचेच फलीत म्हणजेच महिलांची शिक्षणातील प्रगती, त्यांच्या आरोग्यात सुधारणा, महिलांचा मालमत्तेतील हक्क, महिला विषयक कायद्याबाबत जनजागृती, या बरोबरच शासकीय व निमशासकीय यंत्रणामध्ये नोकरीच्या संधी उपलब्ध होण्याच्या दृष्टीने दिवंगत पंतप्रधान राजीव गांधी यांच्या दूरदृष्टीतून आलेले नोकरी व उच्च शिक्षण यांत ३०% महिला आरक्षण तसेच राजकीय क्षेत्रात / स्थानिक स्वराज्य संस्थेत ३३% महिला आरक्षण करण्यात आले. पुढे राजकीय क्षेत्रातील महिलांचा सहभाग वाढविण्याच्या दृष्टीने स्थानिक संस्थामध्ये महिलांसाठी ५०% आरक्षण करण्यात आले. तसेच महिला आर्थिक विकास महामंडळाची स्थापना करून बचतगटांच्या चळवळीद्वारे महिलांना आर्थिक पाठबळ मिळाले व त्यांचा आत्मविश्वास वाढला. यासारख्या ठळक बाबी प्रामुख्याने महिलांच्या सर्वांगिण सक्षमीकरणाकरीता उपयुक्त ठरत आहेत.

महाराष्ट्राच्या विकासाचा चढता आहे, आणि तो तसा असण्यामध्ये महिलांचे मोलाचे योगदान आहे. प्रत्येक क्षेत्रात महिला प्रगतीपथावर आहेत, ही बाब निश्चितच महाराष्ट्राला भूषणावह आहे. महिलांकरिता करण्यात आलेल्या धोरणांचा हा परिणाम आहे असे म्हटल्यास अतिशयोक्ती होणार नाही. परंतु असे करत असतांना २१व्या शतकात येणाऱ्या नवीन बाबी, आव्हाने यांचा विचार करून महिलांच्या या धोरणांमध्ये सुधारणा करणे अपेक्षित आहे. एकीकडे महिलांमधील शिक्षणाचे व अर्थाजनाचे वाढलेले लक्षणीय प्रमाण सुखदायक आहे तर दुसरीकडे दर हजार पुरूषांमागे त्यांचे घटलेले प्रमाण ही गोष्ट सुद्धा क्लेशकारक आहे. मात्र समाजातील जागृत घटक, महिला संघटना आणि महाराष्ट्र शासन यांच्या एकत्रित प्रयत्नांना फळ येतांना दिसत आहे. समाजात 'स्त्री जन्माचे' स्वागत होवून भविष्यात मुलींची संख्या वाढेल व विकासाच्या क्रियेत त्यांना सहभागी होता येईल असे पोषक वातावरण निर्माण करण्यासाठी शासन सदैव प्रयत्नशील राहील.

बदलत्या काळानुसार आणि सामाजिक परिस्थितीनुसार महिलांसमोरील आव्हाने दिवसेंदिवस वाढत असल्याचे दिसून येते. अलिकडच्या काळात महिलांवर झालेल्या हिंसाचाराच्या घटना विचारात घेवून महिलांच्या संरक्षणासाठी विशेष उपाययोजना करणे क्रमप्राप्त आहे. केवळ कठोर कायदे करून या समस्या दूर होतील असे नाही. त्यासाठी समाजामध्ये महिलांबद्दल स्वाभिमान, सन्मान आणि आदराची भावना निर्माण करणे आणि त्यादृष्टीने समाजाच्या मानसिकतेत बदल घडवून आणणे ही काळाची गरज झाली आहे.

दुसरे महिला धोरण जाहीर करून एक तप लोटलेले आहे. या काळात सामाजिक, आर्थिक स्थितीत तसेच नागरिकांच्या मानसिकतेत अनेक बदल घडून आले. त्या बदलांशी सुसंगत असे धोरण जाहीर करतांना त्यात सामाजिक कार्यकर्ते, महिला संघटना यांचा समावेश असलेली एक समिती तिसऱ्या महिला धोरणाचा मसुदा निश्चित करण्यासाठी गठित करण्यात आली होती, सदर मसुद्यावरील जनतेचे/महिलांचे अभिप्राय/सूचना दोन महिन्याचे आंत प्राप्त करून घेणेसाठी महिला धोरण २०१३ (मसुदा) मराठी व इंग्रजीमध्ये महाराष्ट्र शासनाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यांत आले होते. त्यानूसार शासनास प्राप्त झालेल्या सूचना/ हरकती विचारात घेऊन महिला धोरण अंतिम करण्यासाठी शासन निर्णय दिनांक ०७.०५.२०१३ अन्वये मा.मंत्री, महिला व बाल विकास यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन केली. या समितीने केलेल्या सूचना विचारात घेवून, सदर महिला धोरणाचा मसूदा अंतिम करून आपल्या समोर तो सादर करतांना आम्हाला आनंद होत आहे.

**तिसऱ्या महिला धोरणांची उद्दिष्टे**

१. महाराष्ट्रातील महिलांच्या सर्वांगिण विकास व सक्षमीकरणासाठी प्रागतिक दृष्टिकोन रूजविणे व पुरूष प्रधान मानसिकता बदलणे व स्त्री आणि पुरूष यांचे परस्पर संबंध अधिक सौहार्दपूर्ण व निकोप व्हावेत, यासाठी प्रयत्न करणे.
२. महिलांना त्यांच्या अग्रक्रमानुसार आयुष्य जगता यावे यासाठी सर्व क्षेत्रांमध्ये समान संधी व त्यांना आपले उद्दिष्ट साध्य करता येण्यासाठी आवश्यक ते पोषक वातावरण व साधने उपलब्ध करून देणे.
३. धर्म, वंश, जात, सत्ता, प्रदेश या कारणांमुळे वाढत्या हिंसेचा प्रभावी मुकाबला करण्यासाठी स्त्रियांना पाठबळ देणे, किंबहुना या प्रकारच्या हिंसा होणारच नाहीत यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना राबविणे.
४. स्त्री पुरूष जन्मदर समान ठेवण्यासाठी प्रभावी उपाययोजना करणे.
५. महिलांच्या पारंपारिक प्रतिमेला छेद देऊन आधुनिक व स्वबळावर उभी असणारी नवी प्रतिमा तयार करण्यासाठी आवश्यक ते प्रयत्न करणे व गृहिणीच्या घरकामाला प्रतिष्ठा मिळवून देणे.
६. शासनाच्या सर्व स्थरावरील निर्णय प्रक्रियेत समाजातील सर्व महिलांच्या हिताचे व हक्कांचे संवर्धन करण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करणे.

७. समाजाच्या मुख्य प्रवाहातून बाहेर फेकल्या गेलेल्या एकल स्त्रियां, देवदासी, देहविक्री करणाऱ्या महिला, लोककलावंत महिला आणि तृतीयपंथी यांच्या पुनर्वसनासाठी प्रयत्न करणे. तसेच महिलांवर अन्याय करणाऱ्या अनिष्ट प्रथेपासून त्यांची मुक्तता होण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाय योजना करणे.

८. समाजाच्या विषमतामुलक रचनेमुळे, विशेषतः अनुसूचित जाती/अनुसूचित जमाती/विमुक्त जाती व भटक्या जमाती जातीतील व अल्पसंख्यांक समुदायातील महिलांवर होणारा अन्याय दूर करण्यासाठी विशेष प्रयत्न करणे.

९. असंघटीत क्षेत्रातील कार्यरत महिलांच्या हक्कासाठी प्रयत्न करणे.

१०. स्त्रियांना त्यांच्या क्षमतांचा पुरेपूर उपयोग करता यावा, यासाठी घरात तसेच कामाच्या ठिकाणी हिंसाचार विरहीत व सुरक्षित वातावरण निर्माण करणे.

या उद्दिष्टांची पूर्तता करण्यासाठी शासनाच्या विविध विभागाकडून आवश्यक मनुष्यबळ व पुरेसा निधी उपलब्ध करून देण्यासाठी शासन सर्वतोपरी प्रयत्न करेल.

***********

## ३. महिलांसाठी सनद

शासनाचे जे विभाग महिलांसाठी योजना राबवितात, त्या योजनांची माहिती त्या संबंधीत कार्यालयाच्या आवारात सनद म्हणून प्रदर्शित करण्याबाबत सूचना दिल्या जातील. प्रत्येक विभागाने अशी सनद दरवर्षी तयार करून त्यात गरजेनुसार आवश्यक ते बदल करून ती सनद ३१ मे पर्यंत महिला व बाल विकास विभागाकडे सादर करणे बंधनकारक राहील. महिला व बाल विकास विभाग सर्व विभागांकडून प्राप्त झालेली माहिती **१५ ऑगस्ट** रोजी पुस्तिकारूपाने प्रकाशित करेल. सदर पुस्तिका शासनाच्या संकेत स्थळावरही उपलब्ध करून देण्यात येईल.

शासनाच्या प्रत्येक कार्यालयाच्या आवारात सनद प्रदर्शित करताना त्या विभागाच्या योजनांमध्ये महिलांसाठी किती जागा आहेत, सदर महिलांच्या जागेमध्ये जातीनिहाय समांतर आरक्षणानुसार किती जागा आहेत याचे विवरण असणे आवश्यक आहे. तसेच अनुसूचित जाती/ अनुसूचीत जमातीच्या महिलासाठी जागा आरक्षित असाव्यात. प्रत्येक विभाग त्याच्या अखत्यारितील महिलांसाठीच्या योजनांची काटेकोरपणे अंमलबजावणी करेल व वेळोवेळी नियमितपणे त्याचा आढावा घेवून पाठपुरावा करेल. तसेच त्याच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकात भरीव तरतूद करेल आणि अशा सर्व योजनांची फलनिष्पत्ती तपासण्यासाठी त्याचे मूल्यमापन करणे त्या विभागावर बंधनकारक राहील. त्यासाठी अंदाजपत्रकात भरीव तरतूद करणे व मुल्यमापन करणे बंधनकारक राहील.

***********

# ४. महिलाकेंद्री अर्थसंकल्प

समाजात महिलांच्या वाट्याला बहुधा दुय्यम स्थान येते व त्यामुळे त्या क्षमता असूनही आपला विकास पुरेशा प्रमाणात करून घेऊ शकत नाहीत. यात मुख्यत्वे संधी तसेच साधनांचा अभाव हे प्रमुख कारण दिसते. हे लक्षात घेऊन शासनाला राज्याच्या एकूण वाटचालीला दिशा देणाऱ्या आपल्या वार्षिक अर्थसंकल्पामध्ये महिलांचा विशेषत्वाने विचार करणे आवश्यक वाटते. उत्पादन, विनिमय, व्यवहार, रोजगार याचबरोबर शिक्षण, आरोग्य, जमीन–पाणी–अन्न आदी जगण्याचा साधनांवरील मालकीत महिलांचाही व्यक्ती म्हणून समान वाटा प्रत्यक्षात अस्तित्वात येण्याच्या दृष्टीने आर्थिक नियोजनात व त्याच्या अंमलबजावणीसाठीच्या अर्थसंकल्पात महिलाकेंद्री धोरणे, योजना व तरतुदी करणे आवश्यक आहे. जगभर 'जेंडर बजेट' या नावाने प्रचलीत असलेली ही संकल्पना महाराष्ट्र शासनास अतिशय महत्वाची वाटत असून अशा दृष्टिकोनाचे प्रतिबिंब असलेला अर्थसंकल्पाचा आराखडा तयार करण्याची विशेष जबाबदारी राज्य नियोजन मंडळ किंवा तत्सम यंत्रणेकडे वेळोवेळी स्वतंत्र शासकीय आदेशांन्वये सोपवली जाईल.

## १ नियोजन आणि अंमलबजावणी.

१. प्रत्येक विभागात जेंडर सेल स्थापन करून त्यामार्फत महिलाकेंद्री नियोजनाचे सनियंत्रण होईल.
२. प्रत्येक विभागातर्फे दरवर्षी अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक तयार करताना, त्यांच्या विविध योजनांमध्ये केलेल्या अर्थिक तरतूदींचे मूल्यमापन व त्याची अपेक्षित फलनिष्पत्ती यांचा विश्लेषणात्मक अहवाल विधिमंडळातील महिला व बाल हक्क समितीपुढे दरवर्षी सादर केला जाईल. या समितीकडून सदर अहवालाची तपासणी केली जाईल, व तो विधान मंडळांसमोर सादर केला जाईल. ही प्रक्रिया जिल्हा नियोजन व स्थानिक स्वराज्य संस्थांमध्येही राबविण्यात येईल व त्याची खातरजमा संबंधित प्रशासकीय विभाग करतील.
३. प्रशासकीय विभागाकडून सदर प्रयोजनार्थ उपलब्ध करून देण्यात येणाऱ्या निधीचा विनियोग हा महिलाकेंद्रीत प्रत्यक्ष कामांसाठीच वापरण्यात येईल याची खबरदारी प्रत्येक विभागाचा प्रमुख स्वत: घेईल, व तो या संदर्भात शासन व विधीमंडळास उत्तरदायी असेल.
४. प्रत्येक विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या योजनांचा लाभ महिला व मुलींनाही मिळावा याकरिता सुस्पष्ट नियम व मार्गदर्शक तत्वे तयार केली जातील.
५. प्रत्येक विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या योजनांचे कायदे व संबंधित मार्गदर्शक तत्वे महिलांसाठी अधिकाधिक सोयीस्कर (Women Friendly) बनविण्यात येतील.
६. गृहिणीच्या कामाचे आज कोणत्याही प्रकारे मोल केले जात नाही वास्तविक राज्याच्या व देशाच्या अर्थप्रक्रियेत या घटकाचा अप्रत्यक्ष मोठा वाटा आहे, हे लक्षात घेवून घरकामाच्या मूल्याचा समावेश राष्ट्रीय उत्पन्नात केला जावा यासाठी राज्य शासन केंद्र शासनाला सुस्पष्ट शिफारस करेल.

## २. लेखापरीक्षण.

पुरूषांच्या तुलनेत स्त्रियांची प्रगती किती झाली ते समजून घेण्यासाठी आंतरराष्ट्रीय धोरणानुसार स्त्री विषयक असमानता निर्देशांक तयार करण्याची आवश्यकता आहे. त्यासाठी खालील निकषाच्या आधारे राज्यस्तरीय निर्देशांक नियमितपणे शासनाच्या मानव विकास निर्देशांकाप्रमाणे करण्यात येईल.

१) महिलांचे शिक्षण

२) महिलांचे आरोग्य

३) आर्थिक सक्षमीकरण व उत्पन्नाचे स्त्रोत

४) श्रम बाजारातील महिलांचा सहभाग (पुरूषांच्या तुलनेत)

***********

# ५. जाणीव जागृती/स्वयंसेवी संस्थांचा सहभाग/संनियंत्रण व पर्यवेक्षण.

## ५.१ जाणीव – जागृती एक प्रभावी प्रतिबंधात्मक उपाय.

जाणीव–जागृतीला विशेष महत्व देणे आवश्यक असून, विविध मोहिमा, अभियानांच्या माध्यमातून महिलांच्या स्थितीत सकारात्मक बदल घडविण्यासाठी जनजागृती कार्यक्रम समाजाच्या प्रत्येक स्तरावर राबविणे आवश्यक आहे. जेणेकरून समाजात दूरगामी व सकारात्मक दृष्टिकोन रूजविणे शक्य होईल.

### ५.२ संस्कारक्षम पिढी घडविणे.

बालमनावर बिंबवलेले धडे चिरकाल स्मरणात राहत असल्याने शालेय शिक्षणापासूनच महिलांच्या हक्कांची जाणीव होणे गरजेचे आहे, त्यासाठी प्रत्येक शाळेमध्ये मुले व मुली यांच्यात निकोप मैत्रीचे संबंध रूजावे म्हणून, अभ्यासक्रमात बुद्धिमत्ता वाढविण्यासोबतच पुरूषांप्रमाणेच स्त्रियांना असणारे समानतेचे हक्क, कायदा, महिला व वडिलधाऱ्या व्यक्तिंबद्दल आदर, लैंगिक सुखाच्या पलिकडच्या निकोप स्त्री–पुरूष संबंधाची जाणीव, भावनिक बुद्धिमत्तेचा विकास इ. साठी जाणीवपूर्वक कार्यक्रम राबविले जातील.

### ५.३ प्रसार माध्यमे.

१. शासनाच्या विविध विभागाकडून महिलांचे हक्क/योजना, महिलांसाठी असलेल्या सुविधा, हेल्पलाईन इ. बाबींना प्रसारमाध्यमातून सातत्याने प्रसिध्दी देण्यात येईल.

२. पीडित मुली/महिला यांच्या प्रसारमाध्यमांकडून होणाऱ्या चित्रणावर प्रचलित कायद्यातील तरतूदीनुसार निर्बंध घालण्यात येतील.

३. स्त्रियांना दुय्यम दर्जाची वागणूक देणाऱ्या वर्तनाचे उदात्तीकरण करणाऱ्या चित्रपट/मालिका यांच्या विरोधात तक्रार प्राप्त झाल्यावर किंवा स्वत:हून स्वाधीकारात आवश्यक दंडात्मक /प्रतिबंधात्मक कारवाई करण्याचे अधिकार महिला आयोगास देण्याची कायदेशीर तरतूद केली जाईल.

४. सेन्सॉर बोर्डावर सदस्य म्हणून मानसोपचारतज्ञ /मानसशास्त्रतज्ञ तसेच अनुसूचित जाती/अनुसूचित जमाती / विमुक्त जाती व भटक्या जमाती गटातील महिलांचा समावेश करण्यासाठी महाराष्ट्र शासन केंद्र शासनास शिफारस करेल.

५. वर्तमानपत्रात तसेच दूरचित्रवाणीवरील कार्यक्रमात सकारात्मक वृत्ते व माहिती, महिलांचे जीवनपट, विशेषत: अनुसूचित जाती/जमातीतील महिलांचे जीवन / त्यांची संस्कृती/ गौरवास्पद इतिहास/ समाज व्यवहारात त्या देत असलेले विविध पातळ्यांवरील योगदान यांचे चित्रण असणाऱ्या लेखांना/मालिकांना/चित्रपटांना/कार्यक्रमांना प्रोत्साहन देण्यात येईल. शासन आवश्यक तेथे आर्थिक तरतूद करेल व पुढाकारही घेईल.

६. प्रसार माध्यमांध्ये महिला पत्रकारांना विशेषत: अूसूचीत जाती/जमाती/विमुक्त जाती/भटक्या जमाती/ अल्पसंख्याक प्रवर्गातील महिलांना त्यांच्या लोकसंख्येचा प्रमाणात सामावून घेतले जावे, तसेच सक्षम महिला पत्रकारांना समानतेची वागणूक मिळून माध्यमांच्या निर्णयप्रक्रियेत त्यांना सन्मानाचे स्थान मिळावे यासाठी शासनाकडून विशेष प्रयत्न केले जातील.

७. माध्यमांशी सतत संवाद साधून भारतीय संविधानाच्या चौकटीत व कायद्याच्या कक्षेच्या आधारे महिलांना एक उपभोग्य वस्तू म्हणून दाखविणारे, पुरूषांपेक्षा महिला दुय्यम असल्याचे चित्र रेखाटणारे, करियर करणाऱ्या महिलांबद्दल समाजमनात दुराव्याची भावना निर्माण करणारे, लेखन/ कार्यक्रम/कलाकृती यांना प्रसिद्धी दिली जाणार नाही याची काळजी घेतली जाईल. मुलगी हे परक्याचे धन आहे ही मनोवृत्ती प्रदर्शित करणारे चित्रीकरणा प्रदर्शित करण्यापासून परावृत्त केले जाईल.

## ५.४ प्रशिक्षणाचा प्रभावी वापर

सन २००१ च्या महिला धोरणात तरतूद केल्याप्रमाणे महिलांचे हक्क, कायदे, तसेच समाजातील अनिष्ट चालीरिती नष्ट करणे इ. बाबत महिला व बाल विकास विभाग, स्वयंसेवी संस्था, नागरिक व अधिकारी यांच्यासाठी प्रशिक्षण कार्यक्रम तयार करेल व त्याचे प्रत्येक पातळीवर नियमित स्वरूपात आयोजन करण्यास बांधील राहील. त्यासाठी महिला व बाल विकास विभाग स्वतंत्र प्रशिक्षण धोरण निश्चित करून विभागाच्या प्रशिक्षण संस्था सक्षम करेल व त्यासाठी शासन सर्वतोपरी सहाय्य करेल. सदरचे प्रशिक्षण जास्तीत जास्त जणांपर्यत पोहोचविण्यासाठी शासकीय यंत्रणेबरोबर स्वयंसेवी संस्था, शाळा, महाविद्यालय यांचे सहाय्य घेतले जाईल व त्यासाठी शासन सर्वतोपरी प्रयत्न करील.

## ५.५ महिलांचे हक्क, महिला धोरण व महिलांविषयक कायदे प्रत्येक महिलेपर्यंत पोहोचविणे.

१. सदर प्रयोजनार्थ माहिती तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करून महिलांशी संबंधित कायदे, धोरण, योजना, त्यांचे अधिकार कळण्यासाठी व तातडीच्या प्रसंगी संपर्क साधणे शक्य होण्यासाठी जबाबादार अधिकारी, कार्यालय, स्वयंसेवी संस्थांचे पत्ते व दूरध्वनी क्रमांकाची सविस्तर माहिती सर्व शासकीय विभाग व कार्यालयांच्या संकेतस्थळांवर प्रसिद्ध करण्यात येईल.

२. सदरची माहिती शाळा, महाविद्यालय, सरकारी व खाजगी कार्यालये, सार्वजनिक संस्था, कारखाने, व्यवसायिक आस्थापना इत्यादी ठिकाणी काम करणाऱ्या महिलांपर्यंत पोहोचविण्यासाठी सर्व संबंधित आस्थापनांना सूचना दिल्या जातील.

३. सदरची माहिती जवळच उपलब्ध व्हावी यासाठी राज्यातील सर्व तालुक्यात साधन केंद्राची स्थापना केली जाईल. या केंद्रासाठी विशिष्ट क्रमांकाची स्वयंचलित हेल्पलाईन सुरू करण्यात येईल.

४. साधन केंद्र महिलांना भेडसावणाऱ्या प्रत्येक प्रश्नाचे उत्तर देण्यास सक्षम असेल.

## ५.६ साधन केंद्र निर्मिती.

१. राज्यभरात साधन केंद्रासाठी असलेला दूरध्वनी क्रमांक हा एकच असेल. (हेल्पलाईन)
२. प्रत्येक तालुक्याच्या ठिकाणी महिलांसाठी साधन केंद्राची निर्मिती केली जाईल.
३. साधन केंद्र मुली/महिलांना भेडसावणाऱ्या प्रत्येक प्रश्नाचे उत्तर देण्यास सक्षम असेल. (जसे वैयक्तिक व कौटुंबिक प्रश्नांची सोडवणूक–समुपदेशन).

## ५.७ स्थानिक स्वराज्य संस्थांची जाणीव–जागृतीत भूमिका.

१. जिल्हा परिषदेला मिळणाऱ्या एकूण स्वनिधीपैकी किमान १०% निधी जिल्हा परिषदेच्या महिला व बालकल्याण समितीच्या योजनांवर खर्च करण्यात येतो या निधीपैकी २०% किंवा रू.१० लक्ष पर्यंत निधी महिलांच्या प्रश्नांबाबत जाणीव–जागृती निर्माण करण्यासाठी उपलब्ध करून देण्यात येईल. या तरतूदी संदर्भातील अंमलबजावणीचा दर तीन महिन्यांनी आढावा घेतला जाईल.

२. सदरची मोहिम ही दूरचित्रवाणी, पथनाट्य, कलापथक, शाहिरी, जलसा, कार्यशाळा इत्यादी विविध माध्यमाद्वारे राबविण्यात येईल.

## ५.८ स्वयंसेवी संस्थांचा सहभाग

१. महिलांविषयक योजनांच्या अंमलबजावणीत व जाणीव जागृतीसाठी सक्षम स्वयंसेवी संस्थाचा सहभाग वाढविण्यावर भर दिला जाईल. त्याचप्रमाणे सामाजिक व आर्थिकदृष्ट्या दुर्बल गटातील अनुसूचित जाती/अनुसूचित जमाती/विमुक्त जाती, भटक्या जमाती व अल्पसंख्याक समुदायातील महिलांच्या स्वयंसेवी संस्थाना त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात सहभागाची संधी देण्यात येईल.
२. विविध योजना/धोरणाच्या अंमलबजावणी संदर्भातील सखोल विश्लेषणात्मक मूल्यमापन करण्यासाठी स्वयंसेवी संस्थांची मदत घेतली जाईल.

## ५.९ स्वयंसेवी संस्थेचे महिलांच्या प्रश्नाविषयी धोरण

सर्व स्वयंसेवी संस्थाची धोरणे अधिक संवेदनशील, महिलाकेंद्री असतील.

राज्य शासन व केंद्र सरकारचे महिलाविषयक सर्व कायदे व योजना याबाबतची माहिती स्वयंसेवी संघटनांना व त्यांच्या कर्मचाऱ्यांना देण्यात येईल व प्रशिक्षण कार्यक्रमात या माहितीचा समावेश करण्याचे सूचित करण्यात येईल.

शासन महिला आयोगाच्या मदतीने स्वयंसेवी संस्थाची पाहणी करेल व त्यानुसार पात्र स्ववंसेवी संस्थांची नोंदणी केली जाईल आणि शासनाच्या महिलाविषयक विविध कार्यक्रमाच्या अंमलबजावणीत सहभागी होण्यासाठी त्यांची निवड केली जाईल.

स्वयंसेवी संघटनांच्या व्यवस्थापन तसेच कार्यकारी समितीवर स्त्रियांसाठी ३३% आरक्षण ठेवण्या संदर्भातील आवश्यक ती तरतूद, प्रचलित कायद्यात करण्यास येईल.

स्वयंसेवी संस्थामार्फत राबविण्यात येणाऱ्या महिलांविषयक योजनांमध्ये पारदर्शकता ठेवण्यासाठी निकष निश्चित करण्यात येतील.

संस्थांना उपलब्ध करून देण्यात येणारे अनुदान आणि त्याचा झालेला विनियोग याबाबतची सविस्तर माहिती लाभार्थींच्या नावासह संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल व याबाबतचा नियमित आढावा घेण्याची जबाबदारी महाराष्ट्र राज्य महिला आयोगाची राहील.

***********

## ६. शिक्षण व संशोधन

१. महिलांना शैक्षणिक क्षेत्रात उपलब्ध असलेल्या संधीची माहिती स्थानिक स्वराज्य संस्थामार्फत शाळा, महाविद्यालांमध्ये पोहोचवण्यात येईल..

२. नोकरी व रोजगाराच्या निमित्त क्षेत्रातील संधी व त्याच्या निवडीविषयक समुपदेशनाची सुविधा उच्च माध्यमिक शाळा व महाविद्यालयांमध्ये उपलब्ध करून देण्यात येईल.

३. शासकीय व अशासकीय स्वयंसेवी संस्थाकडून देण्यात येणाऱ्या विविध शिष्यवृत्त्या व अभ्यासवृत्ती (Fellowship) विषयींची माहिती शिक्षण संस्थामध्ये प्रदर्शित करण्याच्या सूचना शैक्षणिक संस्थांच्या व्यवस्थापनास करण्यात येतील.

४. महिलांसाठी उपलब्ध शैक्षणिक संधी, शिष्यवृत्त्या, नोकरीच्या संधी, आरक्षण, सवलती, योजना इ. बाबतची सविस्तर माहिती रोजगार व स्वयंरोजगार विभागामार्फत त्यांच्या विशेष संकेतस्थळावर उपलब्ध करून दिली जाईल.

५. उच्च शैक्षणिक व व्यावसायिक अभ्यासक्रमाचे शिक्षण देणाऱ्या संस्थात उपलब्ध राखीव जागा व भरलेल्या जागा यांची आकडेवारी प्रवेश प्रकिया पूर्ण झाल्यावर दरवर्षी संस्थेच्या आवारात ठळकपणे प्रदर्शित करणे, प्रत्येक शैक्षणिक संस्थेस बंधनकारक असेल.

६. उच्च/व्यवसाय शिक्षणाच्या प्रवेशासाठी महिलांना वयोमर्यादेत शिथिलता देण्यात येईल.

७. व्यावसायिक प्रशिक्षणासाठी मुलींना दिल्या जाणाऱ्या विद्यावेतनाची महागाईच्या निर्देशांकानुसार नियमितपणे पुनर्रचना केली जाईल.

८. विद्यावाचस्पती (Ph.D) अभ्यासक्रमासाठी महिला उमेदवारांना प्राधान्याने आरक्षण ठेवण्यात येइल तसेच त्या अभ्यासांतर्गत संशोधन अध्ययनासाठी असलेला कालावधी महिलांसाठी वाढवून देण्यात येईल.

९. संशोधक मार्गदर्शक म्हणून महिलांना प्राधान्याने संधी दिली जाईल याची खातरजमा सर्व विद्यापीठे करतील.

१०. उच्च शिक्षणासाठी असलेल्या शैक्षणिक कर्जाचा व्याजदर हा मुलांसाठी असलेल्या दराच्या तुलनेत मुलींसाठी ०.५% कमी आहे. तो २% कमी असावा अशी शिफारस उच्च व तंत्र शिक्षण विभागामार्फत केंद्र शासनाकडे करण्यात येईल व व्याजदरातील परतावा करण्याची फरकाची रक्कम शासनामार्फत अदा केली जाईल.

११. शैक्षणिक कर्जाची वसूली नोकरी लागल्या नंतर ६ महिण्यापासून सुरू करणे बंधनकारक आहे. मुलींसाठी ही सुरूवात नोकरी लागल्यानंतर १ वर्षाने करावी अशी शिफारस शासनामार्फत बँकांना करण्यात येईल.

१२. ज्या ठिकाणी नोकरभरतीसाठी वयाची अट आहे तिथे महिलांसाठी ही वयोमर्यादा ३८ करण्याचा निर्णय घेण्यात येईल.

१३.सर्व शिक्षण संस्थांनी मुलींसाठी ३ महिण्याचा कराटे प्रशिक्षण कार्यक्रम किमान एकदा राबविणे.

१४.अनुसूचित जमातीतील महिलांच्या सर्वांगीण विकासासाठी औपचारिक शिक्षणाबरोबरच त्यांच्या स्थानिक गरजानूसार शिक्षण मिळेल, अशी व्यवस्था करण्यात येईल. (उदा. कृषी शिक्षण, पारंपारिक कौशल्य, पर्यटन शिक्षण, त्यांच्या स्थानिक कलांचे प्रशिक्षण (वारली चित्रकला, इ.)

१५.प्रौढ महिलांच्या शिक्षणाची वाढती गरज लक्षात घेता रात्रशाळा/सायंशाळा सुरू करण्यास प्रोत्साहन दिले जाईल.

१६.कुटुंबजीवन शिक्षण, भावभावना व्यवस्थापन, नातेसंबंध, व्यवस्थापन, पौगंडावस्थेतील आरोग्य व लिंगभाव संवेदनशीलता, विवाहपूर्व समुपदेशन, जोडीदार निवड, स्वसंरक्षण, व्यायाम, अपत्यसंगोपन व गर्भारपण, महिलांविषयक कायदे, विविध योजना आणि सवलती, पोषक आहार, कुपोषण, व्यसनांचे परिणाम, सर्वंकष आरोग्य शिक्षण, किशोरवयीन मुला–मुलींसाठी आरोग्य शिक्षण या सर्व विषयांच्या शिक्षणाच्या विविध टप्प्यांमध्ये आवश्यकतेनुसार समावेश करण्यात येईल.

१७.सर्व विद्यापीठे, अभ्यासक्रम रचना समित्या/मंडळे यांनी अभ्यासक्रमात लिंगभाव संवेदनाशीलता आणण्यासाठी स्वतंत्र लिंगभाव संवेदनशीलता अभ्यासक्रम रचना समिती निर्माण करून लवकरात लवकर हा विषय अभ्यासक्रमात समाविष्ट केला जाईल.

१८.शिक्षक, प्राध्यापक आणि शिक्षकेत्तर कर्मचारी, यांना दिल्या जाणाऱ्या सर्व प्रशिक्षण कार्यक्रमात – सेवापूर्व प्रशिक्षण, ओरिएन्टेशन कार्यक्रम, सेवांतर्गत आरक्षण, प्रशासकांचे प्रशिक्षण, विद्यापीठांचे सर्व प्रशिक्षण कार्यक्रम या सर्व टप्प्यांवर लिंगभाव संवेदनशीलता हा विषय अंतर्भूत करणे बंधनकारक करण्यात येईल.

१९.शैक्षणिक संस्थांमध्ये विद्यार्थिनींची संख्या आणि स्वच्छतागृहांची संख्या यांचे गुणोत्तर प्रमाण दर १५० मुलींमागे दोन स्वच्छतागृहे आणि ३ मुत्रालये असे करण्यात येईल. सर्व स्वच्छतागृहे पुरेशा पाण्याच्या सुविधेसह स्वच्छ व प्रमाणित निकषानुसार असतील.

२०.प्रत्येक शाळा, महाविद्यालयात सहा महिन्यातून एकदा प्रत्येक विद्यार्थिनींची वैद्यकीय तपासणी बंधनकारक असेल, त्यामध्ये रक्तचाचणी, मासिक पाळीविषयक समस्या, हार्मोन्स मधील बदल, स्त्री रोग विषयक समस्या यांची तपासणी केली जाईल. शाळेत शारिरीक तपासणीच्या वेळेस स्त्री डॉक्टर किंवा महिला मदतनीस असणे सक्तीचे केले जाईल.

२१.शाळांमध्ये सॅनिटरी पॅडस् उपलब्ध करून दिले जातील. दारिद्र्यरेषेखालील मुलींना मोफत आणि इतर मुलींना सवलतीच्या दरात सॅनिटरी पॅडस् उपलब्ध करून दिले जातील. सॅनिटरी नॅपकिन्स बरोबरच मासिक पाळीत ठेवावयाच्या स्वच्छतेचे प्रशिक्षण देण्यात येईल.

२२.विविध स्पर्धांमध्ये सहभागी होण्यासाठी मुलींना प्रोत्साहन दिले जाईल. उदा. तालुका/जिल्हा/राज्यस्तरीय वक्तृत्व, निबंध, चित्रकला, काव्यवाचन, कथाकथन स्पर्धा.

२३.सर्व शाळा, महाविद्यालयामंध्ये स्वतंत्र विद्यार्थिनी कक्ष निर्माण करणे बंधनकारक राहील. तसेच १२वी नंतर पुढील शिक्षणासाठी व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी विशिष्ट मार्गदर्शन कक्षाची निर्मिती करण्यात येईल, यात वसतीगृह, शिष्यवृत्ती यासंबंधी माहिती देण्यात येईल.

२४.शाळा, महाविद्यालये सुटण्याच्या वेळेतील बसेसच्या संख्या आणि पासधारक विद्यार्थी संख्या यांचा आढावा घेऊन ज्या ठिकाणाहून मुली शाळा, महाविद्यालयासाठी येत असतील तर त्या ठिकाणासाठी शाळा, महाविद्यालये सुटल्यावर मुलींसाठी विशेष बससेवा सुरू करण्यात येईल.

२५.शालेय प्रवास करतांना बसमध्ये मुलींकरिता महिला मदतनीस असणे सक्तीचे केले जाईल.

२६.प्रसार माध्यमांनी महिलांच्या खेळाचे प्रसारण करण्यासंदर्भात क्रिडा विभागाकडून सूचना देण्यात येतील.

२७.साधारणत: आठवीनंतर मुलींच्या खेळण्यावर बंधने येतात. शाळांनी मुलींच्या खेळण्यावर प्रोत्साहन देणे, सोयी सुविधा, क्रिडासाहित्य उपलब्ध करून देणे, शाळांमध्ये महिला पी.टी. शिक्षक पदासाठी राखीव जागा ठेवणे, जिथे महिला पी.टी. शिक्षक नाही, त्यांनी अशा स्पर्धांना इतर शिक्षिकांना मुलींसोबत पाठविणे बंधनकारक करणे इ. गोष्टींवर भर दिला जाईल.

२८.महिला शिक्षकांची बदली करतांना अपत्य संगोपन, मुलांचे शिक्षण विशेषत: दहावी, बारावी, अचानक निवासस्थान बदलावे लागणे, नवीन ठिकाणी एकटीने रहावे लागणे, नवीन ठिकाणी येण्याजाण्याची योग्य सोय नसणे, कुटुंबातील सदस्यांच्या दुर्धर व्याधी, पन्नाशीनंतर कुटुंबात राहण्याची शारिरीक, मानसिक, भावनिक गरज याबाबींचा विचार केला जाईल.

२९.महिला शिक्षिकेच्या/प्राध्यापिकेच्या सेवेत खंड असेल तर तो पाच वर्षांपर्यंत माफ करून सेवेतील सर्व सुविधा, फायदे इ. साठी तिची एकूण सेवा लक्षात घेण्याबाबत योग्य विचार करण्यात येईल.

३०.प्रत्येक शाळा, महाविद्यालयामंध्ये स्टाफरूमला लागूनच शिक्षिका आणि प्राध्यापिकांसाठी स्वच्छतागृहाची सोय करणे सर्व शिक्षण संस्थावर बंधनकारक करण्यात येईल.

३१.दुर्धर व्याधीग्रस्त, गर्भवती, ६ वर्षाखालील अपत्ये असणाऱ्या शिक्षिका/प्राध्यापिकांना अशैक्षणिक काम न देण्याबाबत सर्व विभागांना सूचना देण्यात येईल.

३२.शिक्षकांसाठी असणारे प्रशिक्षण कार्यक्रम अनुदानित शाळा महाविद्यालयांबरोबरच विना अनुदानित शाळा, महाविद्यालयांनाही लागू करण्याबाबत निर्णय घेण्यात येईल.

३३.पंतप्रधानांचा १५ कलमी कार्यक्रम सच्चर समिती व रंगनाथ मिश्रा यांच्या शिफारशी अंमलात आणण्यासाठी आवश्यक कार्यवाही करण्यात येईल.

३४.एकात्मिक बाल विकास योजनेंतर्गत कार्यान्वित अंगणवाड्या व बालवाड्या यामध्ये तेथील बहुसंख्यांक बालकांच्या मातृभाषेनुसार तिथे सेविकांची नेमणूक करण्याची खात्री करण्यात येईल.

३५.बालकांना मोफत व सक्तीचे शिक्षण हक्क कायद्याची अंमलबजावणी काटेकोरपणे करून मुलींसाठी अधिकाधिक शाळा सुरू करण्यात येतील.

३६.अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व अल्पसंख्यांक प्रवर्गातील स्त्रियांना National Institute of Open Schooling ची प्रवेश प्रक्रिया व प्रवेश शुल्क सुलभ करण्यासंदर्भात राज्य शासनाकडून सूचित करण्यात येईल.

३७. अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व अल्पसंख्यांक प्रवर्गातील संस्थांना स्त्रियांसाठी शिक्षण प्रशिक्षण महाविद्यालये स्थापन करण्याची कार्यवाही केली जाईल.

३८.अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व अल्पसंख्यांक प्रवर्गातील महिलांच्या प्रती संवेदनाशीलता निर्माण करण्यासाठी शासकीय/अशासकीय संस्थांमधील कर्मचारी यांचेसाठी जाणीव जागृती कार्यक्रम आयोजित केले जातील.

३९.अनुसूचित जाती – जमातीसाठींच्या योजनांच्या धर्तीवर अल्पसंख्यांक स्त्रियांसाठी सुद्धा विविध योजना राबविण्यात येतील.

४०.अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व अल्पसंख्यांक वस्तीत जास्तीत जास्त कस्तुरबा गांधी बालिका निवासी विद्यालय योजना सुरू केली जाईल.

४१.अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व अल्पसंख्यांक वस्तीमधील जास्तीत जास्त अंगणवाडी मध्ये पाळणाघरांची सोय केली जाईल.

४२.अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व अल्पसंख्यांक स्त्रियांसाठी उच्च व्यवसाय शिक्षण देणाऱ्या अभ्यासक्रमाची सोय करून या विविध व्यावसायिक अभ्यासक्रमांचे शिक्षण घेण्यासाठी कर्ज देण्यात येईल.

४३.अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती प्रमाणे माध्यमिक व उच्च शिक्षण घेऊ इच्छिणाऱ्या अल्पसंख्यांक महिलांसाठी विशेष आरक्षण व शिष्यवृत्तीच्या योजना राबविल्या जातील.

४४.शासकीय करिअर–मार्गदर्शन कार्यालय महिला केंद्रित केले जातील.

४५. महिला व पुरूष क्रीडापटूंमधील भेदभाव दूर करण्यासाठी विशेष पावले उचलण्यात येतील, त्यासाठी .........

- शाळा/महाविद्यालयांमध्ये महिला प्रशिक्षकाची नियुक्ती बंधनकारक राहील, तसेच महिला क्रीडा अधिकाऱ्यांची पदे निर्माण करण्यात येतील.
- महिला क्रीडापटू, क्रीडा शिक्षक, क्रीडा अधिकारी यांच्या शिष्यवृत्तीत वाढ केली जाईल.
- क्रीडा क्षेत्रात महिलांचे शोषण होऊ नये म्हणून तालुका व जिल्हा स्तरावर दक्षता समितीची स्थापना करण्यात येईल.
- क्रीडापटू विद्यार्थीनींसाठी खेळात सहभागी होण्यासाठी मोफत प्रवासाची सोय करण्यात येईल.
- शिक्षण हा विकासाचा पाया आहे, महाराष्ट्र हे प्रगतीशील राज्य आहे. मुले/मुली मिळून ९६% विद्यार्थ्यांची नोंदणी आहे. परंतु वरच्या इयत्तांमध्ये मुलींच्या गळतीचे प्रमाण खूप आहे. त्यामुळे

त्या प्रश्नाकडे लक्ष देणे गरजेचे आहे. मुलींच्या शिक्षणाचा विचार केल्याशिवाय महिला धोरण पूर्णच होऊ शकत नाही. त्यामुळे. स्त्रियांच्या शिक्षणाबाबत सकारात्मक भूमिका घेतली जाईल. त्यासाठी........

- सर्व मुली कमीत कमी १२वी पर्यंतचे शिक्षण तरी पूर्ण करतील याची काळजी शासन घेईल.
- या मुली केवळ साक्षरच होणार नाहीत, तर व्यावसायिक व जीवन कौशल्येही शिकतील. यासाठी शासन समाजातील इतर ऊपक्रमशील घटकांबरोबर प्रयत्नशील राहील.

त्यासाठी .........

४६) मुलींच्या उच्च शिक्षणासाठी आर्थिक मदतीच्या रक्कमेत वाढ केली जाईल. त्याचप्रमाणे शालेय आणि महाविद्यालयीन शिष्यवृत्तीसाठी एक खिडकी योजना राबविण्यात येईल.

४७) उच्च, तंत्र व व्यावसायिक शिक्षणातील फी – परतावा – योजना अल्पसंख्यांकांपर्यंत वाढविण्यात येईल. स्थानिक गरजा लक्षात घेऊन महिलांसाठी नवीन तांत्रिक महाविद्यालये सुरू करण्यात येतील.

४८) पायाभूत अभ्यासक्रम गणित–भाषा–इंग्रजी–संवाद कौशल्ये – लेखन कौशल्ये यांचा अंतर्भाव केला जाईल. ज्यायोगे मुली समाजात मागे पडणार नाहीत.

४९) आर्थिकदृष्ट्या दुर्बल, अल्पसंख्यांक आणि मागासवर्गीय मुलींचे पदवीपर्यंतचे शिक्षण मोफत करण्यास शासन प्रयत्नशील राहील.

५०) शासनामार्फत सनदी परीक्षेपूर्वी देण्यात येणाऱ्या मोफत प्रशिक्षणात मुलींकरीता ३०% आरक्षण ठेवण्यात येईल.

५१) शासन निर्णय क.बीसीसी–१०९४/सीआर–५७/९४/१६–ब, सामान्य प्रशासन विभाग, दिनांक ५ डिसेंबर, १९९४ अन्वये अनुसूचित जाती व जमातीच्या आरक्षणाप्रमाणे त्या–त्या प्रवर्गातील महिलांकरीता राखीव जागा रिक्त राहिल्यास पुढे चालू ठेवण्यासाठी तरतूद करण्यात येईल. तथापि सामाजिक व आर्थिक दृष्ट्या दुर्बल गटातील अनुसूचित जाती/अनुसूचित जमाती/विमुक्त जाती व भटक्या जमातीतील महिलांसाठी असलेली रिक्त पदे तातडीने भरण्यात येतील, अशी पदे रिक्त रहाणार नाहीत, याचीही काळजी घेतली जाईल.

## संशोधन

महिला समस्यांविषयी संशोधन करून, ठोस उपाययोजना सूचविणाऱ्या संशोधन प्रकल्पाला शासन मान्यता देऊन त्याआधारे शासनास महिलांचे सक्षमीकरण करण्यासाठी धोरणात्मक निर्णय घेण्यास व अंमलबजावणी करण्यास सहाय्य होईल अशा शोधनिबंध व प्रकल्पांना शासनाकडून भरीव अनुदान देण्यात येवून प्रोत्साहन देण्यात येईल. महिला संशोधकांना प्राधान्य देण्यात येईल. हे काम राज्य महिला आयोगाच्या संबंधित विशेष समितीच्या देखरेखीखाली केले जाईल.

***********

# ७. महिला वसतिगृहे

१. मुलींकरीता वसतिगृह हे तालुका मुख्यालय अथवा जेथे संपर्क साधने सहजपणे उपलब्ध होतील अशा ठिकाणी सुरू करण्यात येईल.

२. ग्रामीण भागातील मुलींच्या शैक्षणिक सुविधेसाठी वसतिगृहांची क्षमता, दर्जा व गुणवत्ता अधिक वाढविली जाईल आणि गुणवत्तेचे निकष वसतिगृहात प्रदर्शित केले जातील.

३. वसतिगृहात तक्रार निवारण समितीची व प्रक्रियेची माहिती दर्शनी भागात प्रदर्शित करणे बंधनकारक राहील.

४. शिक्षण व नोकरी निमित्ताने राहत असलेल्या मुलींच्या खाजगी वसतिगृहांची नोंद शासनाकडे करणे बंधनकारक राहील.

५. मुलींच्या/महिलांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने वसतीगृहात अधीक्षक, व्यवस्थापक, केअर टेकर व अंतर्गत सुरक्षा यासाठी महिला कर्मचारी नेमले जातील.

७. सुरक्षिततेच्या दृष्टिकोनातून वसतीगृहांमध्ये दूरध्वनी, सीसीटीव्ही, हेल्पलाइन यांची तरतूद केली जाईल व यांचा गैरवापर होणार नाही याची कटाक्षाने काळजी घेतली जाईल.

८. आदिवासी दुर्गम भागांतील सरकारी व खाजगी आश्रमशाळांमध्ये सुरक्षेच्या वरील उपायांबरोबरच स्थानिक नागरिक व पालक प्रतिनिधींची देखरेख समिती स्थापन केली जाईल. दुर्गम भागातील अडचणी लक्षात घेता या आश्रमशाळा जवळच्या पोलिस ठाण्याशी दूरध्वनीच्या थेट सेवेने (हॉट लाइन ) जोडल्या जातील.

९. स्त्रियांचा कामात सहभाग वाढवण्यासाठी नोकरदार महिलांसाठी प्रत्येक महसूल विभागाच्या मुख्यालयाच्या ठिकाणी २०० प्रवेश क्षमतेचे किमान एक व मुंबई उपनगरात किमान दोन वसतीगृहे उपलब्ध करून देण्यात येतील.

१०. महिला/मुलींच्या वसतिगृहाची पाहणी करण्यासाठी जिल्हा समिती नेमून वर्षातून एकदा आकस्मिक /रात्रीच्या वेळी तपासणी केली जाईल, याची काळजी घेण्यात येईल. जिल्हा समितीमध्ये पालक व अशासकीय संस्थांच्या प्रतिनिधींचा समावेश असेल. अशा समित्यांमध्ये अनुसूचित जाती/अनुसूचित जमाती/विमुक्त जाती व भटक्या जमाती अल्पसंख्यांक समुदायातील महिलांच्या संस्थांना सहभागी करण्यात येईल. वसतिगृहामधील भोजनाचा व निवासी पायाभूत सुविधांचा दर्जा निकषानुसार गुणात्मक राहिल याची काळजी घेतली जाईल.

**********

# ८. पाळणाघर

नोकरी करणाऱ्या, अर्थार्जन करणाऱ्या, व्यवसाय करणाऱ्या महिलांची ३ वर्षाच्या आतील बालके सुरक्षित ठिकाणी ठेवून त्यांचा आहार, करमणूक व सुरक्षित व्यवस्था आणि सुविधा प्राप्त करून देण्यासाठी तज्ज्ञ काळजीवाहकाच्या देखरेखीखाली मुले राहतील यासाठी सार्वजनिक ठिकाणे, बाजार, व्यापारी आणि औद्यागिक क्षेत्रे, मोठी खाजगी शासकीय व निमशासकीय कार्यालये व स्थानिक वस्त्यावरील अंगणवाडी इत्यादी ठिकाणी पाळणाघराची आवश्यकता आहे.

१. शासन सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांना अशी पाळणाघरे सुरू करण्याचे आदेश देईल. त्यासाठी प्रत्येक पाळणाघरामागे पाळणाघरातील काळजीवाहकाच्या पगारासाठी, बालकांना आहार पुरविण्यासाठी स्वतंत्रपणे तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या आवारातच पाळणाघरासाठी सर्व सोयींनी युक्त असलेले कक्ष उपलब्ध करून देण्याची जबाबदारी संबंधित मुख्य आस्थापना अधिकाऱ्याची राहील.

२. शासन निर्णय, दिनांक ३.१०.२००७ अन्वये ५०० महिला कर्मचारी असलेल्या आस्थापना, व्यावसायिक किंवा व्यापारी, औद्योगिक वापराच्या इमारतीमध्ये महिलांच्या सुविधेसाठी किमान २० चौ.मी. क्षेत्रफळाच्या पाळणाघराची तरतूद ठेवणे बंधनकारक करण्यात आले आहे. याची अंमलबजावणी होत असल्याची खात्री करेल.

३. औद्योगिक कायद्यानुसार कामाच्या ठिकाणी पाळणाघरे सुरू करणे बंधनकारक आहे. जेथे या तरतुदीचे उल्लंघन केले जाईल तेथे कठोर कारवाई करण्याच्या कायद्यातील तरतुदीची अंमलबजावणी केली जाईल.

४. या व्यतिरिक्त ज्या ठिकाणी पाळणाघरांची आवश्यकता आहे (उदा. असंघटित क्षेत्रातील कामाच्या जागा) त्या ठिकाणी अशी पाळणाघरे सुरू करण्यासाठी कार्यवाही करण्यात येईल. त्यासाठी शासन आवश्यक ते अनुदान देईल. तसेच पाळणाघर कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देऊन पाळणाघर सुरक्षा आणि व्यवस्था यासाठी नियमावली तयार करेल.

***********

# ९. आरोग्य

महिलांच्या आरोग्यावर होणारे परिणाम केवळ स्वत:पुरते मर्यादित न राहता त्याचा परिणाम कुटुंबावर विशेषत: मुलांवर आणि पर्यायाने समाजावर होत असतो. त्यामुळे महिला आरोग्य हा अतिशय महत्वाचा, गंभीर आणि जटील विषय आहे. महिलांच्या केवळ शारिरीक आरोग्यावर लक्ष केंद्रित करून चालणार नाही, तर त्यांचे मानसिक, भावनिक, आध्यात्मिक आणि सामाजिक असे सर्वांगिण आरोग्य जपणे अत्यंत गरजेचे आहे. त्यादृष्टीने पुढील पावले उचलली जातील.

१. भौगोलिकदृष्ट्या मागासलेल्या प्रदेशात प्रसूतीच्या योग्य साधनांची व्यवस्था केली जाईल.
२. आरोग्य विषयक पुस्तकांची प्रदर्शने, पोस्टर्स, फिल्म्स्, खेळ यासारख्या साध्या सोप्या माध्यमातून महिलांना आरोग्य साक्षर केले जाईल.
३. महिलांच्या शारिरीक, मानसिक, भावनिक, आध्यात्मिक आरोग्य जपण्यावर भर दिला जाईल.
४. महिला आरोग्याची स्थिती समजून घेण्यासाठी महिला आरोग्य निर्देशांक मोजला जाईल.
५. महिलांच्या मानसिक ताणतणावाचे व्यवस्थापन करण्यासाठी ग्रामीण रूग्णालय व जिल्हा रूग्णालय समुपदेशन केंद्र स्थापन केली जातील.
६. आरोग्य सेवेमध्ये काम करणाऱ्या महिलांच्या (आशा, अंगणवाडी सेविका) सामाजिक जाणीवा वृद्धिंगत करून, त्यांना सक्षम केले जाईल.
७. महिला आरोग्यामध्ये अभ्यास करू इच्छिणाऱ्या अभ्यागतांसाठी महिला आरोग्य फेलोशिप योजना कार्यान्वित करून महिला आरोग्यविषयी होणाऱ्या संशोधन व जाणीवजागृती कार्यास प्रोत्साहन दिले जाईल. स्वयंप्रेरणेने महिला आरोग्य स्वयंसेवक तयार होतील, यासाठी ठोस पावले ऊचलली जातील.
८. स्वयंसेवी संस्थांच्या माध्यमातून स्वास्थ व आहार जनजागृती केंद्राची स्थापना करून मधुमेह, उच्च रक्तदाब, हृदयरोग, स्थूलपणा व सिकलसेल यासारख्या आजारांना प्रतिबंध करण्याचे प्रशिक्षण देण्यात येईल.
९. झोपडपट्ट्यांमध्ये फिरती रूग्णालये उपलब्ध करून दिली जातील.
१०. कामगार रूग्णालयात महिलांसाठी विशेष विभाग सुरू करण्यात येतील.
११. वृद्ध, अपंग आणि संवेदनशील महिलांसाठी (गरोदर, स्तनदा, देहविक्री करणाऱ्या व्यक्ती आणि तृतीयपंथी ) विशेष आरोग्य विषयक सोयी सुरू करण्यात येतील.
१२. किशोरवयीन मुलींसाठी आरोग्य तपासणी करून त्यांचा ग्रोथ चार्ट तयार केला जाईल. त्यामध्ये बी.एम.आय. ॲनिमिया (रक्तक्षय), मासिक पाळी याविषयीच्या तपासणीची माहिती असेल. किशोरवयीन मुलींमध्ये ॲनिमिया आढळल्यास त्यावर मोफत उपचार केला जाईल.
१३. किशोरवयीन मुलींसाठी शाळेत, आश्रमशाळेत व वसतीगृहात सॅनिटरी नॅपकीन उपलब्ध करून दिले जातील.
१४. ज्येष्ठ महिलांकरीता विरंगुळा केंद्र, सुट्टी केंद्र तसेच टर्मिनल केअर सेंटर्स उभी करण्यात येतील.
१५. शासकीय रूग्णालयात जातीय हिंसेने पिडीत असणाऱ्या महिला, लैंगिक अत्याचारग्रस्त, ॲसिड हल्ल्यात बळी पडलेल्या महिला, कौटुंबिक हिंसाचारग्रस्त महिलांसाठी उपचार व समुपदेशनाची व्यवस्था केली जाईल.

१६.आरोग्य व कुटुंब नियोजन विषयातील महिलांचे निर्णय स्वातंत्र्य वाढविण्यासाठी प्रयत्न केले जातील.

१७.वार्षिक रूपये १ लाखापर्यंत उत्पन्न असलेल्या सर्व महिलांसाठी जननी सुरक्षा योजना लागू करण्यात येईल.

१८.नवसंजीवन योजना ही दुर्गम भागासाठी आहे. या योजनेच्या धर्तीवर शहरी भागातील झोपडपट्ट्यामध्ये सदर योजनेचा लाभ देण्यात येईल.

१९.शहरी भागात असलेली महिला व बालक केंद्रीत अर्बन हेल्थ सेंटर्सचे नुतनीकरण करून ते अद्ययावत करण्यात येतील व त्यांना शासकीय योजनांद्वारा सहाय्य करण्यात येईल.

२०.आरोग्य सुविधा शेवटच्या घटकांपर्यंत पाहोचविण्यासाठी डॉक्टर्स संघटना फार्मासिस्ट संघटना, लायन्स क्लब, रोटरी क्लब यासारख्या इतर सामाजिक संस्थांना सोबत घेऊन पब्लिक खाजगी सहभागाद्वारे उपलब्ध करून देण्यात येतील.

२१.कुटुंब नियोजनामध्ये पुरूषांचा सहभाग वाढविण्यासाठी प्रबोधनात्मक कार्यक्रम राबविले जातील.

२२.सरकारी दवाखान्यामध्ये एच.आय.व्ही. सेवा व्यवस्थापनाचे प्रशिक्षण दिले जाईल. त्याचबरोबर एस.टी.डी. /एच.आय.व्ही., सिकलसेल या रोगांवर उपचार केले जातील.

२३.भटक्या विमुक्तांच्या तांड्यांवर आणि पालांवर महिलांसाठी आरोग्य व्यवस्था सक्षम करण्यांत येईल.

२४.वयाच्या ४0शी नंतर शासकीय व निमशासकीय कार्यालयातील महिला कर्मचाऱ्यांची मोफत आरोग्य तपासणी करण्यात येईल. महिलांकरीता हेल्थकार्ड सिस्टिम बनविण्यात येईल.

२५.मुले व समाज यांचे स्वास्थ स्त्रीवर अवलंबून असते. त्यामुळे स्त्रिया निरोगी असणे अत्यंत महत्वाचे आहे. पण  दारिद्र्य जात–पितृसत्ताक पध्दती – भेदभावाची वागणूक – कुपोषण, कुटुंबाच्या गरजा पुरवतांना स्वत:कडे दुर्लक्ष या कारणांमुळे स्त्रीचे आरोग्य बऱ्याचदा दुर्लक्षित राहते. वयाच्या प्रत्येक टप्प्यावर तिच्या गरजा वेगवेगळ्या असतात. त्या लक्षात घेऊन, महिलांच्या आरोग्याकडे विशेष लक्ष पुरवले जाईल व महिलांच्या आरोग्याविषयक संशोधनपर कार्यास शासनातर्फे विशेष मदत दिली जाईल.

२६.सुरक्षित मातृत्व, मातृत्वाचे हक्क याविषयी जागृती करण्यासाठी आधारगट तयार केले जातील.

२७.महिलांसाठी आरोग्य विमा काढणे सक्तीचे असावे. दारिद्र्य रेषेखालील महिलांसाठी विमा संचालनालयामार्फत योजना राबविण्यात यावी.

***********

## १०. स्वच्छता गृह सुविधा

महिलांसाठीची स्वच्छतागृहे हा आपल्याकडील अतिशय ज्वंलत प्रश्न असून स्वच्छता गृहांची सद्य:स्थिती अतिशय बिकट आहे. सध्या महाराष्ट्रामध्ये सार्वजनिक ठिकाणी असलेली स्वच्छता गृहे अपुरी आहेत. आणि जी आहेत त्यातील बहुतांशी वापरण्यास अयोग्य आहेत, हे लक्षात घेऊन–

१) विकास आराखड्यामध्ये महिलांसाठी स्वच्छतागृहासाठी आवश्यक असणाऱ्या जागा निश्चित करण्यात येतील. सदर जागेच्या निश्चिती शिवाय कोणताही विकास आराखडा मंजूर करण्यात येणार नाही.

२) महिलांसाठी पुरेशी स्वच्छतागृहे निर्माण करण्यासाठी व स्वच्छतागृहांची दैनंदिन साफसफाई करण्यासाठी व्यवस्थापन करण्यात येईल.

३) राज्यभरातील बस/रेल्वे स्थानके, बाजार, तीर्थक्षेत्रे, पर्यटनस्थळे, शाळा, महाविद्यालये, महामार्ग, शासकीय, निमशासकीय कार्यालये तसेच खाजगी गृहनिर्माणसंस्था इ. ठिकाणी महिलांकरिता पुरेशी स्वच्छतागृहे उपलब्ध केली जातील. तेथे पुरेशा पाण्याची व्यवस्था करणे बंधनकारक राहील. ती नसल्यास दंडात्मक कारवाई केली जाईल. या स्वच्छतागृहांचे व्यवस्थापन महिला गटांकडे पूर्ण व्यावसायिक तत्वावर दिले जाईल.

४) महानगरांमध्ये प्रत्येक रेल्वे स्टेशनबाहेर, सार्वजनिक बस वाहतूक स्थानके, पुलाखालील मोकळ्या जागेत महिलांसाठी स्वच्छ स्वच्छतागृहे उभारली जातील. महानगरातील वाढती लोकसंख्या, महिलांचा सार्वजनिक जीवनातील वाढता वावर , त्यासाठी करावा लागणारा प्रवास लक्षात घेता दर एक कि.मी. अंतरावर स्वच्छतागृहे उभारण्याबाबत स्थानिक स्वराज्य संस्थांना निर्देश दिले जातील.

५) महामार्गात महिलांसाठी दर २५ कि.मी मागे एक स्वच्छता गृह असेल व स्वच्छता गृहाच्या अगोदर १–२ कि.मी. च्या अंतरावर दर्शनी ठिकाणी त्याचे बोधचिन्ह असेल याची दक्षता घेतली जाईल.

६) महिला स्वच्छतागृहासाठी आदर्श आराखडा तयार केला जाईल. त्याप्रमाणे स्वच्छतागृहाची निर्मिती करण्यात येईल. स्वच्छतागृहात अपंग महिलांसाठी सोयीची ठरेल अशी सुविधा उपलब्ध करून दिली जाईल.

७) रात्रीच्या वेळी स्वच्छतागृहात सुरक्षा रक्षकांची व्यवस्था करण्यात येईल.

८) सार्वजनिक व खाजगी ठिकाणी महिलांसाठी स्वतंत्र स्वच्छतागृहाची निर्मिती करणे सक्तीचे राहिल.

९) आरोग्यदायी व सूस्थितीतील प्रसाधनगृहांची निर्मिती करण्यात येईल.

***********

# ११. व्यसनमुक्ती

१. प्रत्येक गावांत व्यसनमुक्ती केंद्राची स्थापना करण्यात येईल. त्या केंद्रामार्फत व्यसनाला प्रतिबंध करण्यासाठी शिक्षण संस्थात, गावात, सार्वजनिक ठिकाणी व्यसनाचे दुष्परिणाम दर्शविणारे तक्ते, पोस्टर्स लावली जातील. मद्याच्या उघड/छुप्या जाहिरातीवर बंदी आणली जाईल व इंग्रजी वाहिन्याप्रमाणे मराठी व हिंदी वाहिन्यांत देखील धूम्रपान व मद्यप्राशनाच्या दृष्याच्या वेळी दारू व धूम्रपान हे आरोग्यास अपायकारक आहे, अशी टीप दाखविणे बंधनकारक केले जाईल.

१.१ महिलांमध्ये गुटखा, तंबाखू, मशेरी, विडी, दारू यांच्या दुष्परिणामाबद्दल जनजागृतीचे कार्यक्रम राबविण्यात येतील.

१.२ प्रसूतीपूर्व तपासणीसाठी व प्रसूतीसाठी दाखल होतांना जन्माला येणाऱ्या बालकाच्या माता–पित्याना काही व्यसने आहेत का? हे स्पष्ट करणे बंधनकारक राहील.

१.३ विना–परवाना मद्यप्राशन करणाऱ्यावर व विकणाऱ्यावर कठोर कारवाई केली जाईल.

२. व्यसनाधीन पुरूषांचा पगार किंवा मजुरी, पत्नीने किंवा मातेने मागणी केल्यास, बँक खात्यात किंवा प्रत्यक्ष हातात देण्याची व्यवस्था करण्यासाठी योग्य तो सेवानियम/कायदा करण्याचा विचार केला जाईल.

३. चित्रपट, गाणी, मालिका, दूरदर्शन यातील कार्यक्रमांतून व्यसनाचे उदात्तीकरण करणे थांबविले जाईल. यासाठी शासन प्रयत्नशील राहिल.

४. व्यसनांच्या दुष्परिणामांचा अभ्यासक्रमात समावेश करून शाळा व महाविद्यालयात व्यसनमुक्ती समुपदेशन केंद्र स्थापन केले जाईल. तसेच शाळा व महाविद्यालये यांच्या १०० मीटर परिसरात ना–फेरीवाला क्षेत्र जाहीर केले आहे त्याची कठोर अंमलबजावणी करण्यांत येईल.

५. कायद्याने गुटख्यावर बंदी आहेत. त्याची कडक अंमलबजावणी करण्यांत येईल.

६. अंमली पदार्थाचा वापर करणाऱ्या किंवा बिगर परवाना मद्यप्राशन करणाऱ्या, विना परवाना रेव्ह पार्ट्यांच्या आयोजनावर कठोर कारवाई करण्यात येईल.

७. व्यसनांचे दुष्परिणाम व व्यसनमुक्ती यासाठी जनजागृती करणाऱ्या स्वयंसेवी संस्थाची मदत घेतली जाईल.

८. ज्या महिलांची कुटुंबे व्यसनाधीन आहेत, त्यांच्या कल्याणासाठी National Control Programme व National Aid Control Organisation ह्या सारख्या संस्थांच्या उपक्रमाबद्दल त्यांना माहिती पुरवली जाईल. NACO च्या धर्तीवर सर्व व्यसनाबाबत Maharashtra Addiction Control Programme ची निर्मिती करण्यात येईल.

***********

# १२. पर्यावरण

प्रदूषित पाणी, हवा व ध्वनी प्रदुषण यांमुळे आरोग्यावर विपरित परिणाम होत आहे. याचमुळे आजमितीस शासन, उद्योजक, शासकीय व सामाजिक संस्था या सर्वांनाच शिक्षित अशा पर्यावरणीय व्यवस्थापकांची नितांत गरज निर्माण झालेली आहे. त्यातही महिलांचा पर्यावरणाशी निगडीत बाबींशी रोज संबंध येतो. त्यामुळे त्यांच्यात पर्यावरण विषयक जागृती निर्माण करण्याची व त्यांच्या सक्रीय सहभागाची गरज आहे. त्यासाठी

१. पर्यावरणाच्या विषयावर काम करण्यासाठी गाव पातळीवर महिला पर्यावरण गटांच्या स्थापनेसाठी प्रोत्साहन देण्यात येईल.
२. या गटांसाठी महिलांना पर्यावरण साक्षर केले जाईल. ५ जून या जागतिक पर्यावरण दिनी महिलांची पर्यावरण या विषयावर ग्रामसभा घेण्यात येईल.
३. शाश्वत उर्जेचा वापर वाढावा यासाठी महिलांमध्ये जनजागृती केली जाईल. महिला पर्यावरण गटांमार्फत शाश्वत उर्जेसाठी सोलार उपकरणे, बायोगॅस, अशा उपकरणांच्या देखभालीसाठी महिलांना प्रशिक्षण दिले जाईल व त्यांना रोजगार उपलब्ध करून दिला जाईल.
४. स्थानिक स्वराज्य संस्था व महिला पर्यावरण गट यांतील समन्वयातून कचरा व्यवस्थापन प्रक्रिया कार्यान्वित केली जाईल. कचरा विभाजनामध्ये तांत्रिकी आधुनिकता आणली जाईल, कचरा वेचक महिलांच्या क्षमतांचा विकास करण्यासाठी प्रशिक्षण देण्यात येईल.
५. कचऱ्यावर प्रक्रिया – पुनर्वापर करण्यासाठी आवश्यक तंत्रज्ञान, महिला पर्यावरण गटाला व कचरा वेचक महिला तसेच त्यासाठी लागणाऱ्या छोट्या व मध्यम उपकरणासाठी सबसिडी आणि प्रकल्प उभारण्यासाठी सहाय्य आणि जागा मिळण्याची व्यवस्था केली जाईल.
६. कचरा वेचक महिलांना आरोग्यदूत असे संबोधून ह्या व्यवसायाला सन्मानपूर्वक वागणूक दिली जाईल.
७. स्थानिक स्वराज्य संस्थेचे कचरा गोळा करणे, वेगळा करणे या कामांसाठी महिला पर्यावरण गट किंवा महिला बचत गट यांना जबाबदारी देतांना ते गट निविदा प्रक्रियेत कॉन्ट्रॅक्टर सोबत स्पर्धेत टिकणे कठिण आहे हे लक्षात घेऊन अशा महिला गटांना प्राधान्याने किंवा महिला गटांमधील स्पर्धेला प्रोत्साहन देऊन काम देण्यात येईल.
८. सामाजिक वनीकरणासारख्या शासकीय योजनांत महिलांचा सहभाग वाढवला जाईल.
९. जागतिक महिला दिनानिमित्त पर्यावरणाच्या क्षेत्रात उल्लेखनीय काम करणाऱ्या महिलांना किंवा पर्यावरण गटाला पुरस्कृत केले जाईल.
१०. पारंपारिक वनस्पती (औषधी वापरासाठीच्या अथवा आहारासाठीच्या) फुले, फळे, कंद यांवरील आदिवासी महिलांचा परंपरागत अधिकार बाधित होऊ नये व त्यांच्या वनस्पतींबाबतच्या या पारंपारिक ज्ञानाचा समाजाच्या व स्वत:च्या उन्नतीसाठी उपयोग व्हावा यासाठी उत्पादन, विनिमय, केंद्र व्यवस्थापन यांच्या आधुनिक तंत्राचे प्रशिक्षण देण्यात येईल.

११.वन जंगलाची देखभाल आणि संवर्धन यासाठी देशभरात व महाराष्ट्रातही ठिकठिकाणी वन समित्या स्थापन झाल्या आहेत. या समित्यांवर ३३% महिला प्रतिनिधी असणे बंधनकारक राहील.

१२.गाव पातळीवरील पिण्याचे पाण्याचे नियोजन करताना त्यात महिलांचा ५0% सहभाग ठेवण्यात येईल व त्यामध्ये अनुसूचित जाती/अनुसूचित जमाती/विमुक्त जाती व भटक्या जमाती आणि अल्पसंख्यांक प्रवर्गातील महिलांचा त्यांच्या लोकसंख्येनुसार समावेश करण्यात येईल अशा सूचना ग्रामपंचायत, जिल्हा परिषदा यांना देण्यात येतील.

१३.पाण्याचा योग्य वापर, त्याची बचत आणि पुनर्वापर याबाबत महिलांना जागृत केले जाईल.

१४.पर्यावरण संरक्षण, व्यवस्थापन व विकास यात स्त्रियांची, विशेषत: ग्रामीण स्त्रियांची महत्वाची भूमिका असल्याने राष्ट्रीय पर्यावरण धोरणाने स्त्रियांच्या सहभागाबद्दल जी मार्गदर्शक तत्वे तयार केलेली आहेत, त्यावर अधिक भर देण्यात येईल.

१५.नैसर्गिक संसाधनांचे जतन व संवर्धन करण्यात महिला मोठा वाटा उालू शकतात हे लक्षात घेऊन त्या दृष्टिने त्यांना उद्दिष्टपूर्तीचे लक्ष्य असणाऱ्या योजना सोपवून प्रोत्साहित केले जाईल.

१६.पर्यावरणाशी निगडीत समस्या व स्त्रियांचे घरकामाचे ओझे कमी करण्यासाठी विज्ञान–तंत्रज्ञानाची मदत घेतली जाईल.

१७.हवामान बदलामुळे होणाऱ्या परिणामांबाबत स्त्रियांना जागृत व सक्षम बनण्यासाठी पर्यावरण शिक्षणावर भर दिला जाईल. त्यात त्यांचा सहभाग वाढवण्यासाठी State Climate Change Action Plan यासारख्या योजनांमध्ये त्यांना सामील करून घेण्यात येइल.

१८.कार्बन क्रेडिट पॉईंट मिळविण्यात महिला महत्वाची भूमिका बजावू शकतात. हे विचारात घेऊन पावले उचलण्यात येतील.

१९.नैसर्गिक पाण्याचे स्त्रोत जतन व संवर्धन याबाबतचे प्रशिक्षण सर्व महिलांना देण्यात येईल.

२०.उर्जा बचतीबाबत व नैसर्गिक उर्जेचा सक्षम वापर करण्याबाबतच्या प्रशिक्षणात महिलांचा जास्तीत जास्त सहभाग घेण्यात येईल.

२१.वरील सर्व तरतूदींमध्ये अनुसूचित जाती/अनुसूचित जमाती/विमुक्त जाती व भटक्या जमाती या प्रवर्गातील महिलांना त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात प्रतिनिधीत्व व समान संधी मिळण्यावर विशेष भर दिला जाईल.

२२.महिलांना पर्यावरण साक्षर बनवित असताना विविध सण पर्यावरणपूरक साजरे करण्याबाबत उत्तेजन देण्यात येईल आणि विविध नैसर्गिक स्त्रोतांचे संवर्धन व जतन करण्यात येईल. यासाठी तांत्रिक मार्गदर्शन पर्यावरण विभागामार्फत देण्यात येईल.

**********

# १३. सांस्कृतिक धोरण

महाराष्ट्राला कला, साहित्य यांची समृद्ध परंपरा लाभली आहे. या परंपरांची जोपासना करण्यासाठी दरवर्षी लोककला/साहित्य/चित्र–नाट्य–संमेलन आयोजित करण्यात येईल. चित्रकला, नृत्य, संगीत, विज्ञान, आहार, वेशभुषा व जीवनशैली या क्षेत्रातील महिलांच्या कर्तृत्वाला वाव मिळावा या दृष्टीने तसेच पिढ्यान् पिढ्यांचे सांस्कृतिक वैभव टिकून रहावे म्हणून शासनातर्फे विशेष प्रयत्न करण्यात येतील.

१. उपरोक्त सर्व क्षेत्रातील कर्तबगार महिलांचे कार्य जतन होण्यासाठी व ते सर्वांपर्यंत पोहोचावे यासाठी विशेष चित्रफिती तयार केल्या जातील.

२. राज्यात अनेक ठिकाणी भरणाऱ्या वाऱ्या, यात्रा व जव या ठिकाणी लाखो लोक जमत असतात तेथे स्त्रीभ्रूण हत्या, स्त्री पुरूष समानता, एच आय व्ही एड्स, व्यसन मुक्ती, अंधश्रद्धा निर्मूलन या संदर्भात जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन केले जाईल.

३. अंधश्रद्धापीडित महिला, तथाकथित चेटकीण, डाकीण इ. देवदासी, देहविक्री करणाऱ्या स्त्रिया, कैदी महिला, बलात्कारीत महिला, घटस्फोटित, परित्यक्ता, अपंग, मतिमंद, गतिमंद, तृतीयपंथी, बारबाला, लोककलावंत यासर्व स्तरातील महिलांविषयीचा समाजाचा पूर्वग्रह दूषित दृष्टिकोन बदलण्यासाठी सकारात्मक पाऊल म्हणून शैक्षणिक अभ्यासक्रमात योग्य ते बदल केले जातील, तसेच विद्यार्थ्यांसाठी विशेष कार्यशाळा आयोजित केल्या जातील (स्वयंसेवी संस्थांच्या सहकार्याने)

४. उपरोक्त दृष्टिकोन बदलण्यास सहाय्यभूत साहित्य लेख, कथासंग्रह, कवितासंग्रह, कादंबऱ्या नाटक, चित्रपट, चित्रफिती, जाहिराती, संशोधन इ. यांना विशेष अनुदान, शिष्यवृत्ती अथवा संशोधनवृत्ती पुरस्कार यांच्या माध्यमातून प्रोत्साहन दिले जाईल.

५. महिलांच्या विषयी समाजाची मानसिकता बदलावी यासाठी विशेष प्रबोधनपर जाहिराती तयार करून सर्व दूरचित्रवाणी वाहिन्यांवरील प्रमुख वेळेमध्ये (prime time) त्या प्रसृत केल्या जातील.

६. सर्व दूरचित्रवाणी वाहिन्यांवरील मुख्य वेळेत (प्राईम टाईम) मधील मालिकांचे प्रक्षेपण चालू, असतांना खालील पट्टीवर स्त्री विषयक दृष्टिकोन बदलणारे संदेश व आवश्यक हेल्पलाईनची देखील माहिती दिली जाईल.

७. स्त्री विषयीचा सांस्कृतिक/सामाजिक दृष्टिकोन बदलण्यासाठी सर्व स्तरावरील महिला व बाल विकास समित्या अधिक कार्यक्षम केल्या जातील. त्यांच्या माध्यमातून विविध पोस्टर्स, पथनाट्ये, पोवाडा, कलापथके, चित्रफिती, या प्रकारच्या सर्व प्रसार माध्यमांचा यासाठी उपयोग करून जनजागृती केली जाईल.

८. दूरचित्रवाणी वाहिन्या, नाटके व जाहिराती यासाठी स्वतंत्र सेन्सॉर बोर्डाची निर्मिती करून सेन्सॉर बोर्डाने मान्यता दिल्याशिवाय कोणत्याही गाण्याचे दूरचित्रवाणी वाहिन्यांवर, संकेतस्थळांवर प्रदर्शन व प्रसारण करण्यावर बंदी घातली जाईल या विषयाबाबत केंद्र शासनाकडे पाठपुरावा करण्यात येईल.

९. वृत्तपत्र व मासिकांच्या संकेतस्थळांवर आणि वृत्तपत्र व मासिकांमध्ये पोर्नोग्राफी व अश्लील छायाचित्रे प्रसारित करण्यावर बंदी घातली जाईल.

१०. चित्रपट, चित्रफिती यामधील स्त्रीप्रतिमा बदलण्यासाठी सेन्सॉर बोर्डाची पुनर्रचना करून त्यामध्ये सामाजिक कार्यकर्त्यांचा/अशासकीय संस्थांच्या प्रतिनिधीचा समावेश असेल. त्यामध्ये ५0% महिला असतील. या सेन्सॉर बोर्डाचे अध्यक्षपद केवळ दूरचित्रवाणी, चित्रपट, जाहिराती यांच्याशी संबंधित व्यक्तींकडे देण्याच्या धोरणात लवचिकता आणून ते संवेदनशील व्यक्तींकडे सोपविले जाईल या विषयाबाबत केंद्र शासनाबरोबर पाठपुरावा करण्यात येइल.

११. अश्लील जाहिराती/पोस्टर्स प्रदर्शित केल्यास त्वरित त्या रद्द करून निर्मात्यावर आणि प्रदर्शित करणाऱ्यावर कठोर कारवाई केली जाईल. त्यासाठी आवश्यक असल्यास अश्लीलतेची व्याख्या व्यापक केली जाईल.

***********

## १४. महिला व उद्योग

१. वस्त्रोद्योग, साखर कारखाने, दूध संघ, मच्छिमारी व्यवसाय, अन्न प्रक्रिया, सौंदर्य प्रसाधने व इतर तत्सम उद्योग व्यवसाय करण्यासाठी महिला सहकारी संस्थाना विशेष सवलत देण्यात येईल.

२. महिलांना लघु उद्योग व स्वयंरोजगारासाठी विशेष प्रशिक्षण देण्यात येईल.

३. महिला उद्योजकांना व्यवसायाकरिता आवश्यक संवाद कौशल्य प्रशिक्षण (communication skill) देण्यात येईल.

४. महिलांमध्ये उद्योजकता विकास घडवून आणण्याकरिता, उद्योग क्षेत्रातील यशस्वी महिलांची व्याख्याने आयोजित करण्यात येतील.

५. महिला उद्योजकांकरिता स्वतंत्र वित्तीय महामंडळ स्थापन करण्यात येईल. तसेच महिला पतसंस्थांच्या निर्मितीकरीता प्रोत्साहन देण्यात येईल व महिला उद्योजकांना कमी दरात कर्ज उपलब्ध करून देण्यात येईल.

६. महिला उद्योजक निर्माण करण्यासाठी जिल्हा उद्योग केंद्राच्या धर्तीवर स्वतंत्र यंत्रणा निर्माण करण्यात येईल व या संस्थेत महिला उद्योजकांकरीता आवश्यक असणारे अर्ज, परवाने, मंजुरी, वित्तीय सहाय्य, परदेशी कंपन्यांशी करारनामे करणे, इ. सर्व सुविधा एक खिडकी योजनेच्या माध्यमातून राबविण्यात येतील.

७. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या नवीन औद्योगिक वसाहतीमध्ये सुक्ष्म व लघुउद्योगांसाठी १०% क्षेत्र राखीव ठेवण्यात येईल या राखीव क्षेत्रापैकी ५०% पर्यंत क्षेत्र महिला उद्योजकांना, अनुसूचित जाती, अनुसूचित जमातीच्या उद्योजकांना तसेच वस्तूंचे उत्पादन करणाऱ्या महिला बचत गटांना प्राधान्याने वाटप करण्यात येईल.

८. खाजगी उद्योग संस्थामार्फत राबविण्यात येणाऱ्या C.S.R. (Corporate Social Responsibility) मध्ये महिला सक्षमीकरणाला चालना देण्याकरिता आवश्यक ती कार्यवाही करण्यात येईल.

९. उद्योजक महिलांसाठी वाहतूक व्यवस्था, घर, पाळणाघर, मातृत्व सुविधा उपलब्ध करून देण्यात येतील.

१०. महिलांची शारिरीक ठेवण, त्यांच्यावर असलेली मातृत्वाची जबाबदारी लक्षात घेऊन त्यांना धोकादायक, अवजड कामांपासून लांब ठेवण्याच्या सूचना उद्योजकांना दिल्या जातील.

११.कौशल्य वाढीचे प्रशिक्षण, प्रत्यक्ष कामाचे प्रशिक्षण देऊन त्यांना कामाची संधी मिळेल, यासाठी प्रयत्न केले जातील.

१२.व्यक्तिगत व समूह पातळीवर स्त्रियांची उपक्रमशिलता वाढवण्याचा प्रयत्न केला जाईल.

१३.विविध शासकीय विभागांचे समायोजन करून स्त्रियांना विविध योजनांचा जास्तीत जास्त लाभ मिळवून देण्याचा प्रयत्न केला जाईल.

***********

# १५. महिला आणि कायदा.

**स्त्रियांच्या संरक्षणासाठी व सुरक्षतेसाठी**

भारतीय संविधानात महिलांना अनेक कायदेशीर हक्क दिलेले आहेत. सध्या अनेक कायदे, अधिनियम महिलांविषयक संवेदनशीलता दाखविणारे व त्यांचे हक्क प्रस्थापित करणारे आहेत. तरीही त्यांची अंमलबजावणी, समाजाचा दृष्टिकोन व अधिनियमामधील त्रुटी ह्यामुळे महिला कायद्याचा वापर आपले हक्क अबाधित राखण्यासाठी करू शकत नाहीत. काही मर्यादित महिलाच ह्या कायद्यांचा थोड्याफार प्रमाणात फायदा घेऊ शकतात, पण अनेक स्त्रिया कायद्यापासून वंचित रहातात.

महिलांच्या सबलीकरणासाठी – स्त्रियांच्या संरक्षणासाठी व सुरक्षिततेसाठी अनेक कायदे, तसेच संरक्षण व नियमावली बनविली गेली पण तरीही अंमलबजावणीच्या पातळीवर आजही आपल्यापुढे आव्हाने आहेत. त्याची प्रमुख कारणे.

- स्त्रियांचे त्यांच्या अधिकारांविषयी अज्ञान.
- कायद्याची किचकट प्रक्रिया.
- कायद्यातील संदिग्धता.
- कार्यक्षम, मोफत कायदेशीर सल्ल्याची उणीव.
- वैद्यकशास्त्र, फॉरेन्सिक, पोलीस, सरकारी यंत्रणा, न्यायालय, स्वयंसेवी संस्था, मंत्रालयीन कामकाज इ. चा महिलांशी परिणामकारक समन्वय न साधला जाणे.

मा.न्यायालयाच्या अंतर्गत समन्वय वाढविण्याच्या अनुषंगाने हे धोरण विविध उपाययोजना आखेल. अधिनियमात बदल, शासनाच्या सूचना व नियमावली, महिला व बाल विकास विभागामार्फत अंमलबजावणी करण्यासाठी शासनाची बांधिलकी राहील.

## १.शिफारसी

### १) हिंदू दत्तक विधान आणि पोटगी कायदा.

(अ) हिंदू दत्तक विधान आणि पोटगी कायदा, १९५६ व सर्व दिवाणी कायद्यांतर्गत महिलांना त्यांच्या पोटगीचा अधिकार मिळण्यासाठी मा.न्यायालयीन कार्यवाहीमध्ये पोटगीची वसुली न झाल्यास, कारवाई करतांना जेल भत्ता भरण्यातून महिलांना वगळण्यात येईल.

(ब) घटस्फोटित महिला आपल्या ताब्यात असलेल्या मुलाला दत्तक देऊ शकेल. त्यासाठी वडिलांच्या किंवा कोणाच्याही परवानगीची गरज पडणार नाही, अशी तरतूद करण्यांत येईल.

१) कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम २००५ मध्ये मा. न्यायालयाने विवाहसदृष्य संबंधांना (लिव्ह–इन–रिलेशनशिपला) मान्यता दिली असून, ह्या मुद्यावर ह्या महिलांना भारतीय फौजदारी प्रक्रिया संहिता (Cr.PC) कलम १२५ मध्ये पोटगी नाकारली जाते, ह्याची जाणीव ठेवून शासन योग्य ती उपाययोजना करेल.

२) कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम २००५ मध्ये कलम १२५ अंतर्गत पोटगीचा दावा दाखल करण्यासाठी साधे, सरळ, सर्व भाषांमध्ये अर्ज उपलब्ध करून देण्यात यावे. त्याकरीता फौजदारी आचारसंहिता, दिवाणी आचारसंहिता व पोटगी संदर्भात सर्व अधिनियमात दुरूस्त्या केल्या जातील.

३) ज्या स्त्रीला पोटगीचा आदेश मिळूनही पोटगी फौजदारी प्रक्रिया संहिता (Criminal Procedure Code) कलम १२५ प्रमाणे वसुल होत नाही. उदा. नवरा, सात वर्षांपेक्षा जास्त फरार असणे किंवा मृत असणे, ज्यांच्यावरती विसंबून राहता येईल असे कोणीही अस्तित्वात नसणे, नवऱ्याची पैसे भरण्याची आर्थिक ऐपत नसणे, नवरा हा सराईत गुन्हेगार असणे इत्यादी अशा महिलांकरीता शासन विशिष्ट निधीची तरतूद करेल.

## २. कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण –

कौटुंबिक हिंसाचार हा सामाजिक प्रगतीच्या मार्गातील महत्वाचा अडसर आहे. सरकारची महिलांच्या कायदेशीर हक्कांचे रक्षण करणे ही जबाबदारी आहे. कलम ११ अन्वये या कायद्याच्या संदर्भात शासनाची असलेली कर्तव्ये स्पष्ट करण्यात आली आहेत. या कायद्याच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी सामाजिक प्रबोधन करण्यात येईल. व्यथित महिलांना या कायद्याचे संरक्षण देण्यासाठी शासनाने कुठल्या प्रकारची व्यवस्था ठेवावी व कुठल्या उपाययोजना कराव्यात, यासाठी खालील महत्वाचे मुद्दे विचारात घेऊन कार्यवाही करण्यात येईल.

१. कौटुंबिक हिंसाचाराला आळा घालण्यासाठी शासनामार्फत या कायद्याला व्यापक प्रसिद्धी देण्यात येईल.
२. पोलीस अधिकारी आणि मा.न्यायालयीन सेवेमधील सदस्यांना वेळोवेळी सचेतन करण्यात येईल व महिलांच्या हक्कांच्या संदर्भात प्रशिक्षण देण्यात येईल.
३. महिलांच्या कौटुंबिक हक्कांच्या जतनासाठी शासनाच्या विविध खात्यांमध्ये प्रभावी समन्वय राखला जाईल आणि

(अ) या कायद्यान्वये महिलांना सेवा पुरविण्याकरीता मंत्रालयासाठी आणि मा.न्यायालयासाठी नियमावली तयार करण्यात येईल. ती योग्य स्थितीत ठेवण्यात येईल.

(ब) प्रभावी प्रशिक्षण – नियोजन, जबाबदारी, संरक्षण अधिकाऱ्यांसाठी मार्गदर्शक नियम, हे या कायद्याच्या अंमलबजावणीसाठी आवश्यक आहे. यासंदर्भात शासन गांभीर्याने पाऊले ऊचलेल. यामध्ये कर्मचारी यांच्यासह इतरांचे प्रशिक्षण वर्ग घेतले जातील. या कामात सेवाभावी संस्थाचा सहभाग नोंदवला जाईल.

(क) कलम १९ यात स्त्रीधनाचा उल्लेख येतो. परंतु ही संकल्पना स्पष्ट होत नसल्याने त्याची सुस्पष्ट व्याख्या कायद्यात येण्यासाठी शासन त्याचा पाठपुरावा करेल.

४. स्त्रियांच्या बाबतीत जे गुन्हे होतात त्या गुन्ह्यात वारंवार किंवा गुन्ह्याची तीव्रता तपासून ज्या पुरूषाने गुन्हा केला असेल, त्या पुरूषांची नांवे जाहीर करणे व ते पोलीस स्टेशनच्या फलकावर लावणे यासाठी गृह खात्यास आवश्यक सूचना देण्यांत येतील.

५. बालकांवरील अत्याचार, बालकांचे अपहरण हे सुद्धा अप्रत्यक्षपणे स्त्रियांवरील अत्याचारच आहेत, त्याबाबत संबंधीत कायद्यात तरतूद करण्यात येईल.

## ३. घटस्फोट कायदा

भारतीय घटस्फोट कायद्यातील परस्पर संमतीने विभक्त राहण्याचा कालावधी दोन वर्षाचा असून तो विशेष विवाह अधिनियमाप्रमाणे १ वर्ष करण्याचा प्रयत्न शासन करेल, ह्यामुळे हया कायद्यातील तफावत दूर होईल.

## ४. मा.न्यायालयाशी संबंधित सूचना.

१. कौटुंबिक न्यायालय कायदा अन्वये कौटुंबिक न्यायालयात स्वयंसेवी संस्थांना जागा उपलब्ध करून देण्यांत येईल. प्रोटेक्शन ऑफ चिल्ड्रन फ्रॉम सेक्सुअल ऑफेन्सेस ॲक्ट, २०१२ (POCSO) अधिनियमाप्रमाणे शासन स्पेशल कोर्ट चालू करेल.

ह्यासाठी सर्व साधनांची उपलब्धता व प्रशिक्षित कर्मचारी शासन देईल.

२. कुठल्याही न्यायालयाचा आदेश महिलांना मोफत मिळण्याची सोय शासन करेल.

३. गरजू महिलांना त्यांच्याविरूद्ध असलेल्यां केसमध्ये कोर्टात जाण्यासाठी प्रवासभत्ता देण्याची सोय शासन करेल.

४. कोर्टाच्या परिसरात दाव्यातील महिला, महिला कर्मचारी यांना सुरक्षित वातावरण व संरक्षण देण्यास शासन कटिबद्ध राहील. अत्याचार करणाऱ्या विरूद्ध कडक कारवाई करण्यात येईल. सर्व कोर्टामध्ये महिलांना स्वच्छतागृह, पाळणाघरे व हिरकणी कक्ष असेल व केसच्या सुनावणीसाठी विशेषत: कौटुंबिक दाव्यात महिलांसाठी निश्चित वेळ असेल, अशी व्यवस्था करण्यात येईल.

५. महिलांच्या संदर्भातील केसेससाठी फास्ट ट्रॅक कोर्ट चालू करण्यास शासन कटिबद्ध राहील.

६. स्त्रियांवरील हिंसाचाराच्या, अत्याचाराच्या गुन्ह्याचा समावेश तंटामुक्ती योजनेच्या कक्षेतून बाहेर ठेवण्यात येईल.

७. शालेय अभ्यासक्रमात महिलांसंबंधी कायदेविषयक माहिती अंतर्भूत केली जाईल, ज्यात विवाहाचे वय, स्त्री–पुरूष समानता, लिंग समभाव, घरगुती अत्याचार, स्त्रियांची मालकी हक्क ह्या विषयांचा समावेश असेल.

८. करार पद्धतीने शासकीय व निमशासकीय क्षेत्रात काम करणाऱ्या महिलांना मॅटर्निटी बेनीफिट ॲक्ट चा लाभ देण्याकरीता शासन नियमावली करेल.

९. गर्भपाताच्या कायद्यात (Medical Termination of Pregnancy Act) यामध्ये Married woman ऐवजी Any woman अशी दुरूस्ती केली जाईल.

१०. महिला व त्यांच्या मुलांना कुठलेही नांव लावण्याच्या अधिकाराचा शासन सन्मान करेल व त्याप्रमाणे संबंधीत विभागांच्या कामकाजांमध्ये महिलांचे विशिष्ट आडनांव (पतीचे/वा पित्याचे) लावण्याचा आग्रह धरणार नाही. नाव लावण्याचे स्वातंत्र्य स्त्रीला राहील. यासंबंधीची सूचना सर्व शासकीय विभागांना देण्यात येईल व त्याची अंमलबजावणी न झाल्यास थेट त्या ठिकाणच्या जिल्हाधिकाऱ्यांकडे तक्रार नोंदवण्याचा अधिकार त्या महिलेला असेल. सर्व शासकीय अर्जात आई किंवा वडील किंवा दोघांचे नाव यापैकी कोणताही पर्याय निवडण्याची मुभा राहील. आई किंवा वडील यापैकी कोणतेही एक नाव पुरेसे मानले जाईल.

११. महिला मंडळ वा बचत गट प्रतिनिधींना बेअरफूट – कायदा सखी (KAYDA SAKHI) (प्रथम समुपदेशक हिंसा प्रतिबंधक मार्गदर्शक) म्हणून प्रशिक्षण देण्यास शासन प्रोत्साहन देईल. उदा. पुढील ३ वर्षाच्या काळात प्रत्येक गावात, ५० महिलांच्या मागे १ या प्रमाणात समुपदेशक कायदा सखी (Kayda Sakhi) असतील. त्याप्रमाणे विधी व न्याय आणि अशासकीय स्वयंसेवी

संस्था (NGO) सेवेच्या माध्यमातून तात्काळ कायद्याचे मार्गदर्शन मिळविण्यासाठी शासन प्रयत्नशील राहील.

१२. हुंडा बंदी कायदा अंमलबजावणीसाठी सामाजिक जनजागृती करतांना कायद्याने निर्देशित केल्याप्रमाणे कुठलेही मिळालेले धन स्त्रीच्या नावावर राहील याची शाश्वती देण्यासाठी शासनामार्फत जनजागृती केली जाईल.

१३. विवाह नोंदणी सक्तीचीच असल्याने त्याचे शुल्क सर्वसाधारण लोकांना परवडणारे असेल याची शासन काळजी घेईल.

१४. अल्पसंख्याक महिलांच्या सबलीकरणासाठी योग्य ती पावले उचलण्यास शासन कटिबद्ध आहे.

### ५. महिलांसाठी राज्यभर हेल्पलाईन.

संकटात सापडलेल्या महिलांसाठी केंद्र सरकारने सुचविलेल्या १८१ क्रमाकांची हेल्पलाईन महिला व बाल विकास विभागामार्फत राज्यभर सुरू करण्यांत येईल. सदर कॉल सेंटरमध्ये प्रशिक्षित कर्मचारी असतील. संकटग्रस्त महिलेचा दूरध्वनी आल्यावर सदर कर्मचाऱ्यामार्फत महिलेला समुपदेशन केंद्र, संरक्षण अधिकारी किंवा परिस्थितीनुरूप निवारागृह किंवा संबंधित पोलिस स्टेशन यांच्याशी समन्वय साधून देण्यात येईल.

### ६. अल्पवयीन विवाहासंदर्भात सूचना.

अल्पवयीन मुलींचे लग्न, त्या लग्नाची वैधता, त्यांचा कुटुंबाच्या मालमत्तेतील अधिकार, पोटगीचे व दत्तकाचे अधिकार व पतीच्या ठिकाणी कुटुंबाच्या मालमत्तेतील वारस म्हणून अधिकार या संबंधीच्या कायद्यातील सर्व त्रुटी दूर केल्या जातील.

## ७. संपत्तीचे अधिकार

जमिनीच्या मालकी हक्काच्या संदर्भातील सर्व महिलांचे हक्क/तृतीय पंथी हक्क व त्यांच्या व्याख्या सुस्पष्ट करून योग्य अधिनियम शासन करेल. वैवाहिक जीवनात स्त्रीचे मालमत्ता विषयक हक्क, (सन २००१ च्या महिला धोरणात नमूद केल्याप्रमाणे), पतीच्या मालमत्तेतील हक्क–याबाबतचे अधिनियम अधिक सुस्पष्ट करण्यासाठी शासन योग्य त्या कायद्यातील दुरूस्त्या (Amendments) करेल. तसेच हिंदू वारसा कायदा १९५६ – दुरूस्ती महाराष्ट्र शासन १९९४, दुरूस्ती केंद्र शासन २००५ याअन्वये मुलींच्या वडीलांच्या संपत्तीतील अधिकारांची काटेकोरपणे अंमलबजावणी केली जाईल. याबाबत जनजागृती करण्यात येईल.

## ८. प्रसुतीपूर्व गर्भलिंग चिकित्सा

१. गर्भधारणापूर्व व प्रसवपूर्व लिंग निदान तंत्र प्रतिबंधक कायदा, १९९४ व सुधारित २00३ हा मुलींच्या कमी होणाऱ्या संख्येशी संबंधीत कायदा आहे. मुलींची घटती संख्या लक्षात घेता अंमलबजावणीतील त्रुटींचा अभ्यास करून शासन त्यावर उपाययोजना आखेल.

२. या कायद्याची अंमलबजावणी करण्यासाठी केंद्र शासनाने केलेल्या नियमावलीची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यात येईल.

३. न्यायिक अधिकारी, सरकारी वकील व समुचित प्राधिकारी व सदर कायदयांतर्गत येणारे सल्लागार समितीचे सदस्य यांच्या प्रशिक्षणाची तरतूद व उपयुक्त साहित्य **(Modules)** शासन तयार करेल.

४. दारिद्रय रेषेखालील कुटुंबाना मुलीच्या जन्मानंतर तिच्या शिक्षणासाठी ठराविक रक्कम विशिष्ट कालावधीसाठी ठेवण्याच्या योजनेची शासन स्तरावर कडक अंमलबजावणी केली जाईल व सर्वसामान्य कुटुंबातही पालकांनी मुलीच्या नावावर गुंतवणूक करण्यासाठी शासन योग्य तो प्रचार व प्रसार करेल.

५. एका मुलीच्या जन्मानंतर फळ व इतर झाडे मोफत उपलब्ध करून त्याची लागवण करण्यासाठी प्रोत्साहन दिले जाईल.

## ९. वयस्कर महिला.

वयस्कर महिलांच्या बाबतीत असलेले अधिनियम अंमलात आणण्यासाठी शासन प्रयत्न करेल. त्यासाठी स्थापलेल्या लवादाचा फायदा मिळण्यासाठी त्यांना योग्य मदत दिली जाईल.

वयस्कर महिलांच्या सुरक्षेसाठी शासन अधिक ठोस पावले उचलेल व अस्तित्वात असलेल्या हेल्पलाईन्स बरोबर अधिक सक्षम यंत्रणा निर्माण करेल. या हेल्पलाईन्स विरंगुळा केंद्रे, हॉस्पिटल्स, पोलिस स्टेशन्स, हाऊसिंग सोसायट्या व सर्व सार्वजनिक ठिकाणी ठळकपणे प्रदर्शित करणे बंधनकारक राहील.

वयस्कर व्यक्तींसाठी लवादाची स्थापना करून त्याची माहिती सर्वत्र जाहिर करण्यात येईल. त्याचप्रमाणे वयस्करांसाठी असलेल्या हेल्पलाईनची विस्तृत प्रसिद्धी करण्यात येईल.

**१०. देहविक्री करीता महिलांची अनैतिक मानवी वाहतूक.**

१. २००७ मध्ये अनैतिक मानवी वाहतूक रोखण्यासाठी महिला व बाल विकास विभागाने कृती आराखडा तयार केला होता. त्याची कडक अंमलबजावणी शासनामार्फत करण्यात येईल.

२. अनैतिक मानवी वाहतूक रोखणे, प्रतिबंध, सुटका करणे, पुनर्वसन, अभियोग, मूल्यमापन व संनियंत्रण, नेटवर्कींग या सर्व प्रक्रिया करण्यासाठीची यंत्रणा कार्यान्वित करण्यासाठी शासन प्रयत्न करेल.

३. अल्पवयीन मुला–मुलींना ताब्यात घेतल्यानंतर त्यांना पालकांच्या ताब्यात देताना संबंधित मुलांबाबत परिवेक्षक अधिकारी यांनी विशेष लक्ष देणे आवश्यक आहे. जर पालक त्या व्यवसायात समाविष्ट असतील तर त्यांच्यावर कारवाई करून संबंधित मुलांचे पुनर्वसन शासनामार्फत करण्यात येईल. पालकांनी मुला–मुलींना ताब्यात घेतले तर त्याचा शासन वारंवार आढावा घेईल.

४. मुलांचे पुनर्वसन करतांना शैक्षणिक व आरोग्याच्या सुविधांकडे विशेष लक्ष पुरविले जाईल व सुधारगृहांचा दर्जा उत्कृष्ट करण्यावर शासन भर देईल.

५. सदर सामाजिक समस्येचे प्रमाण कमी करणे व समस्या समूळ रोखणे याकरीता धोरण व कार्यक्रम आखण्यात येतील.

६. आपत्कालीन परिस्थितीमध्ये तात्काळ मदत व संरक्षण याकरीता वेगवेगळ्या पर्यायांची उपलब्धता असणे आणि महिलांना सदर पर्यायांची माहिती असणे व त्यांचा वापर करण्याची सुविधा उपलब्ध असणे. उदा. महिलांसाठी आधारगृह, जेणेकरून अशा परिस्थितीचा गुन्हेगारी प्रवृत्तीकडून महिलांच्या अनैतिक मानवी वाहतुकीसाठी गैरवापर होणार नाही, यासाठी शासन कटीबध्द राहील.

७. महिला/बालक आणि तृतीयपंथीयांना देहविक्रीसाठी भाग पाडणाऱ्यांवर कडक शासन करण्यात येईल.

**११. महिला दक्षता समित्या–विविध समुपदेशन केंद्र**

१) पोलीस ठाण्याच्या स्तरावर आज ज्या महिला दक्षता समित्या आहेत, त्यांनी अधिक प्रभावीपणे काम करणे अपेक्षित आहे. यासाठी शासन या समित्यांना काही अधिकार देऊन त्यांची पुनर्रचना करेल.

२) अशा समित्यांवरील नेमणुकीसाठी शासन मार्गदर्शिका तयार करेल व त्यांत स्थानिक महिला मंडळ, बचत गट, युवती मंडळ, नोंदणीकृत किंवा शासन मान्यता प्राप्त समुपदेशन केंद्राच्या प्रतिनिधींना प्राधान्य देईल व समिती सदस्यांना ओळखपत्रे देण्यात येतील.

गृहविभाग, महिला व बाल विकास विभाग अंतर्गत महिला आयोग व समाज कल्याण मंडळामार्फत आणि ग्रामविकास विभागांतर्गत जिल्हा परिषदेमार्फत कार्यान्वित समुपदेशन केंद्राच्या समन्वयासाठी महिला व बाल विकास विभाग हा Nodal विभाग राहील.

## १२. निवारा

अत्याचारपीडित स्त्रियांना व त्यांच्या मुलांना ताबडतोब निवारा मिळण्याची सुविधा स्वयंसेवी संस्थांच्या मदतीने किंवा शासनाच्या वतीने सोय करणे गरजेचे आहे. कोर्टाचा निर्णय लागेपर्यंत ह्या निवाऱ्याची सोय कालावधीचा निर्बंध न ठेवता शासनाने शासकीय व निमशासकीय संस्थांना नियमावली ठरवून देणे गरजेचे आहे. संरक्षण गृहांची संख्या वाढविणे, दर्जा सुधारणे ह्याबाबत शासन त्वरीत प्रयत्न करेल. तसेच त्यांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यास शासन मदत करेल.

## १३. राज्य आयोग.

१) राज्य आयोगाचे महिलांचे हक्क व अधिकार मिळविण्यासाठी काम अधिक प्रभावी होण्याच्या दृष्टीने शासन विशेष लक्ष देईल. आयोगासाठी विभागीय कार्यालयांची तरतूद करणे, त्यांची संरचना, अधिकार व आर्थिक तरतूदी वाढवण्यासाठी शासन उपाययोजना करेल.

२) राज्य आयोग, निमशासकीय कार्यालय व इतर सर्व महिला कर्मचाऱ्यांना प्रसूतीच्या सवलती देण्यात येतील.

३) जेव्हा जेव्हा महिलांवर हिंसा वा अत्याचाराच्या घटना घडतील. उदा. दंगल, हत्याकांड तिथे आयोग आपली निष्पक्ष भूमिका घेऊन परिस्थिती, घटनांचा आढावा घेईल व शासनास अहवाल देईल. ह्यासाठी राज्य आयोग व या अहवालाची शासन काटेकोरपणे अंमलबजावणी करेल.

४) सर्व राज्य आयोगाच्या शिफारशींची अंमलबजावणी कडक व बंधनकारक करण्याची तरतूद शासन करेल.

५) महिला आयोगाने स्वतंत्रपणे एक निष्पक्ष, देखरेख करणारा/कायदेविषयक मार्गदर्शक/प्रतिबंधात्मक पुढाकार घेणारी मध्यवर्ती भूमिका निभावण्यासाठी शासन प्रोत्साहन देईल.

६) महिला आयोगाला योग्य प्रमाणात आर्थिक तरतूद शासन वाढवून देईल.

७) महिला आयोगास प्रकरणातील संबंधीत व्यक्ती हजर राहण्याचे टाळत असेल तर पकड वॉरंट काढून त्यास हजर करून घेण्याचे अधिकार यासाठी शासन कायद्यात तरतूद करेल.

८) राज्य महिला आयोगाच्या कार्यपध्दतीबाबत जाणीव जागृती करेल.

## १४. लैंगिक छळ प्रतिबंधक

१. कामाच्या ठिकाणी महिलांचे लैंगिक शोषण प्रतिबंध कायदा 2013(Sexual Harassment of Women at Workplace (Prevention Prohibition an Redressal Act 2013)

२. फौजदारी कायदा सुधारणा अधिनियम 2013 (The Criminal Law Amendments Act 2013)

३. मुलांचे लैंगिक शोषण कायदा 2012 (The Protection of Children form Sexual Offences Act 2012) त्याची अंमलबजावणी अधिक प्रभावीपणे होण्यासाठी शासन उपाययोजना करील.

## १५. शासकीय महिला कर्मचाऱ्यांसाठी देखील खालील मुद्यांच्या अनुषंगाने काही तरतूदी होणे आवश्यक आहे.

१) शासकीय कार्यालयात महिला कर्मचाऱ्यांना व्यवस्थित वागणूक दिली जात नाही. महिला अधिकाऱ्यापेक्षा महिला कर्मचाऱ्यांना शासकीय कार्यालयात विविध समस्यांना तोंड द्यावे लागते.
२) महिला कर्मचाऱ्यांना अतिरिक्त पदभार देऊ नये.
३) वरिष्ठ अधिकारी/कर्मचारी यांचेकडून कनिष्ठ महिला कर्मचाऱ्यास दोष नसतानाही बाहेरील लोकांसमोर अपमानास्पद वागणूक देणे.
४) महिला कर्मचाऱ्यांच्या समस्या विचारात घेतल्या जात नाही. या सर्व समस्या सोडविण्यासाठी योग्य उपाययोजना करून महिला कर्मचाऱ्यांना पण सन्मानाची वागणूक देणेबाबत शासन प्रयत्न करेल.

## १६. नुकसान भरपाई

१. स्त्रियांवर झालेल्या अत्याचार प्रकरणी समुपदेशन करण्यासाठी वेगळा कक्ष (crisis center) सर्व हॉस्पिटलमध्ये उभारण्यास शासन प्रोत्साहन देईल. बलात्कार व लैंगिक अत्याचार झालेल्या महिलांना आणि बालकांना तातडीने मानसिक आधार देण्यासाठी व इतर मदत देण्यासाठी प्रत्येक जिल्ह्यात District Trauma Team स्थापन करण्यात येईल. सदर टिम घटना घडल्यावर पिडीत महिला आणि पालक आणि परिस्थितीनुसार त्यांच्या कुटूंबियांची भेट घेवून त्यांना मानसिक आधार देईल आणि तातडीची मदतही करेल.

२. महिलांच्या अत्याचाराबाबत काम करणाऱ्या समित्या, विशेषत:, लैंगिक छळाच्या समितीच्या सदस्या विरूद्ध कायद्यानुसार केस दाखल करता येऊ नये, याची शासन काळजी घेईल.

## १७. कायद्याची अंमलबजावणी आणि संवेदनशीलता

भारतीय दंड संहिता (IPC) कलम ४९८–अ : या कायद्याची अंमलबजावणी आणि नियमन करणाऱ्या यंत्रणेची संवेदनशीलता वाढविण्याबाबत शासन प्रयत्न करेल. या कायद्याबाबत जास्तीत जास्त जागृती करून ह्या कायद्याच्या अंमलबजावणीमध्ये आढळणाऱ्या त्रुटींचा व उपयुक्ततेचा शास्त्रीय अभ्यास राज्य महिला आयोगामार्फत करण्यात येईल.

## १८. जातीय, धार्मिक हिंसा/अत्याचार प्रतिबंध

घटनेने दिलेल्या मुलभूत अधिकाराचा अनादर करणाऱ्या जाती/धर्म/प्रांत यावर आधारित, कौटुंबिक खोट्या प्रतिष्ठेसाठी हत्या करणाऱ्या कृत्यांचा शासन कडक कारवाईची भूमिका करेल.

१. जातीय /धार्मिक/वंशिक दंगलीत महिलांवर होणारे अत्याचार, हिंसा रोखण्यासाठी शासन प्रतिबंधात्मक उपाययोजना करेल. अफवा रोखण्यासाठी व जनतेच्या भावना भडकावणाऱ्या वक्तव्याला रोखण्यासाठी, अशा घटनांना आवर घालण्यासाठी, शासन कडक कारवाई करेल.

२. दंगली वा जातीय हत्याकांडात स्त्री–देह विटंबना /अत्याचार हे प्रतिस्पर्ध्याला नामोहरम करण्यासाठी केले जातात. यामध्ये जातीय, धार्मिक, प्रांतिय पैलू लक्षात घेणे आवश्यक ठरते. अशा प्रकारची विटंबना मुख्यतः दलित, आदिवासी, अल्पसंख्याक, मागास जाती–जमातीतील महिला, निराधार महिलांच्या व महिला कर्मचाऱ्यांच्या वाट्याला येते. म्हणून लैंगिक हिंसा ही फक्त बलात्कारापुरती सीमित नसून पूर्णतः लैंगिक अत्याचार गुन्हा म्हणून बघणे आवश्यक ठरेल. त्यासाठी शासन कायद्यातील लैंगिक हिंसेच्या व्याख्याच्या दुरूस्तीसाठी केंद्र शासनाला शिफारस करेल.

## १९. हिंसा/अत्याचार व आधुनिक तंत्रज्ञान

१. महिलांचे शोषण करणारे, विकृत/हिडिस दर्शन करणारे, एस.एम.एस./इंटरनेट संकेतस्थळ/ई–मेल व इतर तंत्रज्ञानाविरूद्ध शासन कडक कारवाई करेल, सायबर गुन्हे यांना लागू असणारे कायदे व व्याख्या यांची नियमावली जास्त सुस्पष्ट करेल. त्यासाठी पोलीस स्टेशनमध्ये तालुका स्तरावर वेगळा कक्ष उभारण्यास व २४ तास कार्यरत असणेसाठी शासन प्रयत्न करेल.

२. एफ.आय.आर. लिहिण्याचे प्रशिक्षण पोलीस अधिकारी/कर्मचारी यांना दिले जाईल.

३. पोलीस स्टेशनवर फिर्याद रजिस्टर करतांना अशा नोंदी ठेवाव्यात. की, जेणेकरून नंतर पुराव्याअभावी केस रद्दबातल ठरणार नाहीत व गुन्हेगार सुटणार नाही, ह्याची खबरदारी घेतली जाईल.

४. मा.उच्च न्यायालय व शासनाच्या निर्देशानुसार अस्तित्वात असलेल्या व बदल होणाऱ्या कायद्याच्या तरतूदींची अंमलबजावणी होईल ह्याची काळजी घेतली जाईल. बलात्कारीत महिलेच्या वैद्यकीय तपासणीच्या नियमावलीची अंमलबजावणी करण्यासाठी शासन कटिबद्ध राहील.

५. महिलांवर बंधन घालणाऱ्या, त्यांच्या वर्तणूक /वेशभूषेबाबत नियमन करणाऱ्या व सांस्कृतिक दहशत जोपासून महिलांवर अत्याचार करणाऱ्या व्यक्ती/संस्था/संघटनांवर शासन आवश्यक ती कडक कारवाई करेल.

## २०. खालील महत्वाच्या सूचना.

दि.०४/०९/२००९ या केंद्रीय गृह मंत्रालय, दिल्ली यांच्या काही महत्वाच्या सूचना गृह विभाग, महाराष्ट्र राज्य यांच्याकडे पाठविण्यात आल्या आहेत. या सूचना अंमलात आणण्यासाठी राज्य शासन विविध उपाययोजना आखेल व अंमलबजावणीसाठी शासन बांधील राहील.

१. बलात्कार पीडित व इतर अत्याचार पीडीत महिलांसाठी सरकारी रूग्णालयात विशेष उपचार विभाग (District Trauma Centre) ची स्थापना करण्यात यावी. तसेच या विभागात समुपदेशन व मोफत कायदेविषयक सल्ला पुरविण्यात यावा.

२. राज्य शासनाच्या आरोग्य विभागाने बलात्कारित पिडितांसाठी विशेष उपचार केंद्र आवश्यक ठिकाणी स्थापन करावी.

३. संवेदनशील क्षेत्रात व रस्त्यावर कॉन्स्टेबलची संख्या वाढविण्यात येईल.

४. दुर्गम व अतिदुर्गम ठिकाणी पोलीसांची मदत केंद्र उघडण्यात येईल.

५. रात्रीच्या वेळी पोलीस गस्तीचे प्रमाण वाढविण्यात येईल.

६. पोलीसांशी त्वरित संपर्क साधण्याकरीता टेलिफान बुथची व्यवस्था करण्यात येईल.

७. जिल्हा व सत्र स्तरावर जलद गती (फास्ट ट्रॅक) कोर्टाची निर्मिती करावी व त्यामध्ये महिलांवरील अत्याचाराच्या केसेस चालविण्याकरीता महिला न्यायाधिशांची प्रामुख्याने नियुक्ती करण्यांत येईल.

८. महिलांवरील अत्याचाराची प्रकरणे व्यवस्थित हाताळण्याकरीता पोलीसांना आवश्यक त्या कायद्याच्या माहितीचे सखोल प्रशिक्षणाची गरज आहे. त्यांना प्रशिक्षण देण्याची व्यवस्था व्हावी.

९. प्रत्येक पोलीस ठाण्यात, तालुक्यात महिलांवरील व बालकांवरील अत्याचाराच्या गुन्हा नोंदीकरीता विशेष कक्ष उघडण्यात यावा व त्यामध्ये महिला पोलीस अधिकाऱ्यांची नियुक्ती व्हावी.

१०. महिलांवरील अत्याचारांकरीता मदत केंद्रातील हेल्पलाईन नंबर हे प्रत्येक रूग्णालयात, शाळेत, कॉलेज व इतर सार्वजनिक ठिकाणी सर्वांना दिसतील अशा ठळक अक्षरांत लावण्याची व्यवस्था व्हावी.

११. प्रत्येक राज्याच्या संबंधीत विभागाने, बलात्कारपीडीत महिलेला प्रत्येक स्टेजमध्ये मदत करावी. जसे पोलीस स्टेशनला तक्रार देणे, वैद्यकिय तपासण्या, तसेच तिला योग्य तो सल्ला व कायदेशीर मदत करण्याचे प्रयोजन व्हावे. तसेच सदर पीडित महिलेचे प्रकरण विशेष महिला पोलीस अधिकाऱ्यांनी हाताळावीत. जेणेकरून त्या पीडित महिलेला सुरक्षित वाटेल.

१२. महिलांसाठी २४ तास हेल्पलाईन सेवा असावी.

१३. अनुसूचित जातीच्या व विमुक्त भटक्या जमातीच्या मुलींना आणि स्त्रियांना जातीचे दाखले त्वरीत मिळण्यासाठी सोय केली जाईल.

१४. आंतरजातीय विवाह करणाऱ्यांना संरक्षण दिले जाईल.

१५. लग्न समारंभ खर्चावर बंधने किंवा मर्यादा आणण्यासाठी आवश्यक त्या उपाययोजना शासन स्तरावरून केल्या जातील.

***********

## १६. महिला लोकप्रतिनिधींचे राजकीय सक्षमीकरण.

भारतीय संविधानाच्या ७३व्या व ७४व्या घटना दुरूस्तीनंतर महिलाच्या आरक्षणा संदर्भात विशेष जागरूकता निर्माण होत आहे. परंतु या अनुषंगाने खालील महत्वपूर्ण बाबी निदर्शनास येत आहेत.

**स्थानिक स्वराज्य संस्थामधील**

१. निवडून आलेल्या महिला, सार्वजनिक क्षेत्रात काम करण्यास मिळालेल्या संधीकडे सामाजिक विकास साधण्याची महत्वपूर्ण संधी म्हणून बघतात.
२. स्वत:ची कार्यक्षमता वृद्धिंगत करीत कामकाज करण्याची त्यांची मानसिक तयारी असते.
३. महिलांमुळे कुठल्या मुद्दयांवर भर द्यावा, याचे अग्रक्रम बदलले आणि दारूसारखा तसेच पिण्याच्या पाण्यासारखा सामाजिक प्रश्न त्यांनी लोकांसमोर प्रकर्षाने आणला.
४. त्यांच्या समोर उभ्या राहणाऱ्या विविध आव्हानांकडे महत्वाची संधी म्हणून बघतात.
५. त्या जबाबदारीची जाणीव ठेवून सतत सृजनशील राहण्याचा प्रयत्न करतात.

अशा तऱ्हेने . . . .

स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये ५०% आरक्षण झाल्यामुळे राजकारणात सहभागी होणाऱ्या महिलांची संख्या वेगाने वाढते आहे. संसदीय संरचनेतील अगदी तळातील संस्थेमध्ये कामकाज करताना, त्यांचे वेगळेपण ठळकपणे उठून दिसते. समानता हा संविधानातील गाभा आता फक्त कागदावरील कल्पना राहीली नसून राज्यकारभार चालविण्याच्या प्रक्रियेत महिलांच्या सक्रीय सहभागामुळे समानतेचा पुढील टप्पा गाठणे शक्य झाले आहे. समानतेच्या या प्रक्रियेस गतीमान करून त्यास लिखित दिशा देण्याकरिता ती अधिक परिपक्व होण्यासाठी

१ स्थानिक स्वराज्य संस्थेतील प्रत्येक महिला लोकप्रतिनिधी प्रशिक्षित व्हावी, यासाठी महाराष्ट्र शासन स्वत:चे प्रशिक्षण धोरण तयार करेल.

२ निवडून आलेल्या महिला लोकप्रतिनिधींच्या सर्वांगिण विकासासाठी हक्काच्या प्रचलित कायद्यात आवश्यक सुधारणा केल्या जातील. महिला सरपंचाने राजीनामा दिल्यास अशा प्रकरणी उप सरपंच कार्यभार सांभाळेल परंतु महिलांसाठी राखीव असलेल्या सरपंचपदावरील महिलेने राजीनामा दिल्यास अशा महिला संरपंचाचा कार्यभार हा महिला सदस्यांनाच देण्याबाबत कायद्यात आवश्यक दुरूस्ती करण्यात येईल.

३ स्थानिक स्वराज्य संस्थेतील सर्व महिला प्रतिनिधींना तालुका स्तरापर्यंत मोफत एस.टी. प्रवास सवलत देण्याची तरतूद बजेटसह करण्याबाबत प्रयत्न करण्यात येईल.

४ शहरी भागातील वॉर्डसभा व ग्रामीण भागातील महिलासभेने मंजूर केलेल्या महिलांसंबंधी ठरावांची काटेकोर अंमलबजावणी कशी होईल, याकडे लक्ष दिले जाईल.

५ सामान्य प्रशासन विभागाच्या निर्णयानुसार ग्रामपंचायत स्तरावरील महिला ग्राम सेवकांसाठी आरक्षण ठेवण्यात येईल. दोन पेक्षा जास्त ग्रामपंचायतींचा कार्यभार ग्रामसेवकांना देण्यात येणार नाही.

६ शासनाच्या विविध विभागाकडून गाव पातळीवर निरनिराळ्या कामाचे कंत्राट देतांना, महिलांच्या बचतगटांना प्राधान्य दिले जाईल.

७ निवडून आलेल्या महिला सरपंचांसाठी खासदार निधीप्रमाणे लोकसंख्येच्या प्रमाणात शासनातर्फे महिला सरपंच प्रोत्साहन निधी देण्यात येईल.

८ ग्रामसभेआधी जर गावांतील फक्त महिलांची सभा घेतली जर महिला प्रत्येक प्रश्नांवर मुक्तपणे चर्चा करू शकतात व त्यांच्या सहभागात लक्षणीय वाढ होऊ शकते त्यासाठी महिला ग्रामसभेची नियमावली व अंदाजपत्रक तयार केले जाईल.

९. स्त्रियांना सन्मानाने जगण्यासाठी राजकारणातील महिलांना प्रोत्साहन मिळेल, असे सामाजिक वातावरण तयार व्हावे, यासाठी पुरुषांचा पाठींबा मिळण्यासाठी शासनाच्या पुढाकाराने राज्यस्तरीय ज्योतीबा जागृती अभियान राबविण्यात येईल.

१०. महिलांना राजकारणात करिअर करण्याची इच्छा असेल तर त्यांना योग्य ते प्रशिक्षण मिळावे, म्हणून प्रशिक्षण केंद्रे स्थापन करण्यात येतील.

११. निवडून आलेल्या स्त्री प्रतिनिधींबाबत घडणाऱ्या हिंसाचाराची गंभीर दखल घेऊन कडक शिक्षा देण्यासाठी योग्य ती पावले उचलली जातील.

१२. दुर्गम भागात प्रवास करण्यासाठी त्यांना वाहनांची सुविधा उपलब्ध करुन दिली जाईल व सरकारी अतिथीगृहात त्यांच्या निवासाची सोय करण्यात येईल किंवा त्यांना प्रवास भत्ता व निवासी खर्च देण्यात येईल.

१३. सर्व स्तरावरील संविधानिक समित्यांमध्ये अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती तसेच अल्पसंख्यांक महिलांना प्रतिनिधीत्व दिले जाईल.

१४. सर्व पातळीवर अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती तसेच अल्पसंख्यांक स्त्रियांचे आरक्षण कायद्याने ठरविलेल्या टक्केवारीवर आधारित असेल.

***********

## १७. कृषी, ग्रामीण, शहरी व आदिवासी क्षेत्रातील महिलांची भुमिका / पाणी–पुरवठा

स्थावर जंगम व वारसा हक्काने येणा–या सर्व प्रकारच्या मालमत्ता यामध्ये सर्व ठिकाणी महिलेस बरोबरीने मालकी प्रस्थापित होईल, अशा पद्धतीने सर्व प्रकारच्या (उदा.भु–कायदे, वारसा कायदा, मालमत्ता कायदा,धार्मिक व्यक्तिगत कायदा) कायद्यांमध्ये सुधारणा करण्यात येईल.

शासनाच्या अधीन असलेल्या पडजमिनी व सामाजिक वनीकरणांच्या ताब्यात असलेल्या जमिनी, पडिक जमिनी, सामाजिक वनीकरणाच्या ताब्यातील पडजमिनी ह्या नजिकच्या गावातीलच महिला, महिला बचत गट, शेती करणाऱ्या विधवा महिला, शेतमजूर, परित्यक्ता, घटस्फोटित महिला आणि एकटी राहणारी स्त्री यांना सदरच्या करार तत्वावर गटशेती करण्यासाठी, ग्राम ठरावाद्वारे चक्रीय पध्दतीने लागवडीस देण्यात येतील. सदर जमिनीची शास्त्रीय पद्धतीने मशागत करण्यासाठी कृषी विभागाद्वारे तसेच शेती क्षेत्रामध्ये संशोधनाचे कार्य करणाऱ्या स्वयंसेवी संस्थांद्वारे जमिनीची शास्त्रीय पाहणी करुन त्या जमिनीमध्ये कोणत्या प्रकारची लागवड करणे योग्य होईल, याबाबतचा सल्ला व मार्गदर्शन, सदर महिलांना व बचत गटांना करण्यात येईल. सर्व प्रकारच्या माती परीक्षणाचे काम, या क्षेत्रामध्ये कार्यरत असलेल्या महिला बचत गटांना द्यावे. सदर जमिनीमध्ये गुरांसाठी चारा, सौंदर्य प्रसाधने बनविणाऱ्या कंपनीसाठी लागणारे सुगंधी गवत, गोणपाटासाठी लागणारी घायपात व वनौषधीची लागवड करून सदर महिलांसाठी रोजगार निर्मिती करण्यात येईल. त्याचप्रमाणे गुरांसाठी बारमाही चारा मिळून त्यातून फायदा होवु शकेल व स्थानिक गावकरी यांच्या चाऱ्याचा प्रश्न सुटण्यास मदत होईल. वरीलप्रमाणे सर्व तरतूदींची अंमलबजावणी करताना अनुसूचित जाती/अनुसूचित जमाती/विमुक्त जाती व भटक्या जमाती आणि अल्पसंख्यांक प्रवर्गातील महिलांना त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात लाभ देण्यात येईल.

सदर बाबीचा विकास करण्यासाठी शासन स्तरावरुन सुलभ पत पुरवठा करण्यासाठी लागणारी प्रक्रिया शिथिल व कागदपत्रांची संख्या अतिशय मर्यादित केली जाईल. केंद्र शासनाच्या the Scheduled Tribes and Other Traditional Forest Dwellers (Recognition of Forest Rights) Act, 2006 अंतर्गत असलेल्या सर्व समित्यांमध्ये ५०% महिलांचा समावेश केला जाईल.

शेती करणाऱ्या (farming), एकटी राहणारी विधवा, घटस्फोटीत, परित्यक्ता महिलांना शेती व्यवसाय व शेती पूरक व्यवसायाचे प्रशिक्षण देणे आवश्यक आहे.

१ ग्राम पंचायतीतर्फे, शेती करणाऱ्या महिलांसाठी पशुपालन बँका, पत पुरवठा याबाबतचे छोट्या अभ्यासक्रमांचे आयोजन केले जाईल. यासाठी उपस्थित महिलांना प्रोत्साहनपर उपस्थिती भत्ता देण्यात येईल. प्रशिक्षण पूर्ण झाल्यावर आवश्यक साहित्य व इतर अवजारे सवलतीच्या दरामध्ये अथवा सुलभ हप्त्यात देण्यात येईल. गाव पातळीवर शेती साठी लागणारी विविध यंत्रसामुग्री यांची बँक तयार करुन सदर अवजारे भाडेतत्वावर महिला शेतकरी अथवा महिला बचत गटांना देण्यात

येतील. या अवजारांच्या खरेदीसाठी लागणाऱ्या निधीची व्यवस्था शासनामार्फत केली जाईल. स्त्रियांना वापरण्यायोग्य शेती अवजारांची निर्मिती करण्याबाबत राज्यातील IIT तथा कृषी इंजिनियरींग क्षेत्रामध्ये संशोधन संस्थांना प्रवृत्त करावे, ज्यायोगे नवीन प्रकारच्या विविध अवजारांची निर्मिती होऊन महिलांना त्याचा वापर करणे शक्य होईल.

२ सदर प्रशिक्षित महिलांना / बचत गटांना प्रशिक्षण संस्थाकडून मोफत हेल्पलाईन उपलब्ध करुन दिल्या जातील. त्यामुळे अडचणी सोडविण्यास मदत तसेच हवामान, बाजारपेठेचा अंदाज याबाबत मार्गदर्शन होवू शकेल.

३ प्रशिक्षणादरम्यान पत पुरवठा करणाऱ्या संस्थामार्फत पत पुरवठ्याच्या पद्धती प्रक्रिया, कागदपत्रांची माहिती ही छापील स्वरुपात प्रशिक्षणाच्या वेळी देण्यात येईल.

४ सदरचे लक्ष्य वर्षाअखेरीस पूर्ण करण्याऐवजी, जिल्हाधिकारी यांनी अग्रणी बँक (lead bank) तसेच पत संस्थांना दर महिन्याचे प्रमाण ठरवून द्यावे. कर्ज घेणाऱ्या लाभार्थीमध्ये ५ % लाभार्थी महिला असाव्यात. सदर महिला ह्या प्रामुख्याने एकटी राहणारी विधवा, घटस्फोटीत, परित्यक्ता व ज्यांच्या नावावर जमीनीचा ७/१२ उतारा आहे, त्याना प्राधान्याने देण्यात येईल. इ. प्रमुख अटी घातल्या जातील.

५ कृषी महाविद्यालयामध्ये पदवी घेणाऱ्या विद्याार्थ्यांना स्थानिक पातळीवर प्रत्यक्षात कामाचा अनुभव मिळण्यासाठी (field work) गावे दत्तक देण्यात येतील व सदर विद्यार्थी हे ग्राम पातळीवरील शेती करणाऱ्या महिलांना / बचतगटांना शेती व जलसिंचनाच्या नव्या पद्धती, तंत्रज्ञान, पणन बाजारपेठेबाबत आवश्यक पूरक माहिती इ. संदर्भात मार्गदर्शन करण्यात येईल. त्याबाबतचे मॉडेल प्रकल्प तयार करुन सदर विद्यार्थ्यांना प्रात्यक्षिकेचे गुण दिले जातील. सदरचे गुण हे गुणपत्रिकेमध्ये देखील समाविष्ट करण्यात येतील.

## १ शेतीपूरक व्यवसाय :

शेतीपूरक व्यवसाय यामध्ये खालील व्यवसाय घेण्यात आलेले आहेत.

१ महिला शेतकरी यांना केंद्र शासनाच्या / राज्य शासनाच्या विविध कृषी व्यवसायाशी निगडीत असलेले उदा. दुग्ध व्यवसाय, कुक्कुटपालन, शेळी-मेंढी पालन इ. सदर व्यवसायाचे प्रशिक्षण दिल्यानंतर निधीच्या उपलब्धतेनुसार २५% पतपुरवठा करण्यात यावा व ७५% कर्ज रूपाने उपलब्ध करण्यात यावा.

२ प्रशिक्षणातून महिलांनी निर्माण केलेले उत्पादन. उदा. दुधाचे पदार्थ, तुप, पनीर, शेळी-मेंढीची लोकर, अंडी व इतर उत्पादने आठवडी बाजारामध्ये विक्री होण्यासाठी त्यांना लागणारी जकात तसेच एस.टी.मध्ये वाहतूक दरामध्ये सवलती देण्यात येतील.

शासनामार्फत घेण्यात येणाऱ्या तसेच विविध प्रकारच्या मेळाव्यामध्ये विक्रीसाठी सवलतीच्या दरामध्ये जागा उपलब्ध करुन देण्यात येतील. शहरातील मोठ्या गृहसंस्था, शॉपींग सेंटर्स, महानगरपालिका तसेच नगरपालीकाद्वारे बांधण्यात येणाऱ्या दुकानाच्या गाळ्यामध्ये करार व रोटेशन पद्धतीने वस्तू विक्री करण्यास परवानगी दिली जाईल.

३ नाशवंत पदार्थांसाठी महिलांना शितपेट्या सवलतीच्या दराने उपलब्ध करुन दिल्या जातील.

४ कृषी विभागाद्वारे कृषी पर्यटन योजना राबविणाऱ्या शेतकरी महिलांना संघटीत करुन त्यांना मदत व संपूर्ण मार्गदर्शन केले जाईल. विविध संकेतस्थळे (वेबसाईट) विकसित करुन उदा. गुऱ्हाळघरे, हुर्डापार्टी, स्ट्रॉबेरी पार्टी यासाठी महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ यांना co-partner म्हणून सहभागी केले जाईल.

५ शेतकरी महिला तसेच ग्रामीण महिलांना परसबागेचे प्रशिक्षण देण्यात येईल ज्यायोगे त्यांना आवश्यक ते अर्थाजन करण्यास निश्चितपणाने मदत होईल.

६ कृषि, फळबागा सिंचन, परसशेती यासाठी गांव व तालुका पातळ्यांवरील पाणी सोसायट्यांमध्ये महिलांना ५0% प्रतिनिधित्व दिले जाईल, तसेच शेतकरी म्हणून नैसर्गिक साधने वापरण्याचा महिलांचा आधिकार संबंधितांना अवगत केला जाईल.

## २. सिंचन प्रक्रिया / पाणी पुरवठा

१ पारंपारिक पद्धतीने शेतीला पाणी देण्यात येते. यामध्ये वाया जाणाऱ्या पाण्याचे प्रमाण, जमिनीवर होणारे पाण्याचे अपव्यय टाळण्यासाठी महिला शेतकऱ्यांना ठिबक सिंचन पद्धती अवलंबण्यास प्रोत्साहन देण्यात येईल. यामध्ये ठिबक सिंचनासाठी लागणारा पत पुरवठा हा शासनाद्वारे १००% अनुदान (Sub-sidy) स्वरूपात देण्यात येईल. तसेच विविध संस्थामाफर्त कमी दरामध्येसुद्धा पत पुरवठा करण्याबाबत सूचना दिल्या जातील. व्यावसायिक सर्व प्रकारच्या बँका / पतसंस्था यांना महिला शेतकरी यांना वैयक्तिक कर्जाच्या धर्तीवर कमी व्याजदरामध्ये पतपुरवठा करण्याचे बंधनकारक करण्यात येईल. कमीत कमी ५0% पत पुरवठा महिला शेतकऱ्यांना केला जाईल.

२ शेती बंधारे, पाझर तलाव, शेततळी, पाण्याचे नैसर्गिक स्त्रोत, पाण्याचे पुनर्वापर यंत्रणा यांचे व्यवस्थापन स्थानिक महिला बचत गटाकडे देण्यात येईल. या प्रकारची कामे करणाऱ्या शेतकरी महिलां बचत गटांना सुलभ दराने पत पुरवठा करण्यात येईल.

३ महिलांना पिण्यासाठी व कपडे धुण्यासाठी पाणी आणण्याकरिता बऱ्याचदा दूर जावे लागते व त्यांचा बराचसा वेळ पाणी आणण्यामध्ये जातो. यासाठी शेततळी, पाझर तलावाचे पाणी, सार्वजनिक विहीरी, खाजगी विहीरी यांचे पाण्याची उपलब्धता लक्षात घेवून उपलब्ध पाण्याचे निर्जंतुकीकरण करुन बंद पाईपद्वारे पिण्याचे पाणी देण्याबाबत ग्रामपंचायतींना अनुदान देण्यात येईल. यासाठी

ग्रामपंचायतींना प्रोत्साहीत करण्याचे धोरण स्विकारले जाईल. पाण्याचे योग्य नियोजन व साठवणूक यासाठी मार्गदर्शन केले जाईल.

## ३. पत पुरवठा :-

१ शेती व्यवसाय करणाऱ्या शेतकरी महिला / बचत गट यांना पत पुरवठा करण्यासाठी सद्य:स्थितील महिला आर्थिक विकास महामंडळास कृषी विषयासाठी पत पुरवठा करण्यासाठी सक्षम केले जाईल.

२ शेती करणाऱ्या महिला तसेच शेती व्यवसायामध्ये असलेल्या बचत गटांना पत पुरवठा करणे अतिशय आवश्यक आहे. याबाबत खालीलप्रमाणे उपाययोजना केल्या जातील.

- जिल्हा बँक तसेच अग्रणी बँक (Lead Banks) यांना शेतकरी महिला व बचत गट यांना पत पुरवठा करण्याचे संख्यात्मक तिमाही लक्ष देण्यात येईल.
- पत पुरवठा करीत असताना त्यामध्ये प्रामुख्याने बीज भांडवलाची अट बचत गटासाठी शिथील करण्यात येईल.
- महिला सेंद्रिय शेती करीत असतील तर त्यांना प्राधान्याने सवलती देण्यात येतील.

३ प्रगतशील शेतकरी महिलांचे अभ्यास दौऱ्याचे आयोजन करण्यात येईल. यामध्ये student exchange च्या धर्तीवर शेतकरी महिलांसाठी शासनाकडून योजना राबविण्यात येईल.

४ प्रगतीशील महिला शेतकऱ्यांना कृषी भूषण धर्तीवर पुरस्कार देण्यात येतील.

५ विविध प्रकारच्या कृषी बाजार समित्या यावर किमान ५ % महिला बचत गटांसाठी राखीव जागा ठेवण्यात येईल.

६ बचत गटांच्या विनंतीपर प्रस्तावाची प्रकरणे ताबडतोब निकालात काढण्यात येतील. जेणेकरुन त्यांना पुन्हा कर्ज घेता येईल.

७ मॉल व प्रदर्शने येथे जागा राखीव ठेवून बचत गटांनी केलेल्या उत्पादनांना बाजारपेठ मिळवून दिली जाईल.

## ४. शेती उत्पादने साठवणूक व टिकवणे :-

१ वखार महामंडळामार्फत बांधण्यात आलेल्या गोदामामध्ये धान्य ठेवण्यासाठीची जागा पूर्णपणे शेतीवर अवलंबून असलेल्या एकटी रहाणारी/ विधवा / परित्यक्ता/ घटस्फोटीत महिलांना कमी दरामध्ये देण्यात येईल.

२ पूर्णपणे शेतीवर अवलंबून असलेल्या एकटी/ विधवा / परित्यक्ता/ घटस्फोटीत महिलांना साठवणूक केलेल्या मालास १०० % विम्याचे संरक्षण दिले जाईल.

३ साठवणूक केलेल्या मालाच्या वखार पावती (credit receipt) वर शेतकरी एकटी/

विधवा / परित्यक्ता/ घटस्फोटीत महिलांना मालाच्या किंमतीच्या ७० % कर्ज देण्यात येईल.

४ महिलांनी उत्पादन केलेल्या धान्य उत्पादने टिकवून ठेवण्यासाठी वखार महामंडळाच्या तज्ञ व्यक्तीकडून शास्त्रशूध्द साठवणूक, किटकनाशकांची फवारणी, धुरीकरण महिलेच्या राहत्या जागेमध्ये अथवा उपलब्ध जागेमध्ये साठवणूक कशी करावी इ.बाबींचे प्रशिक्षण ग्रामस्तरावर आयोजित केले जाईल.

५ सहकारी तत्वावर वखार महामंडळाच्या मार्गदर्शनानुसार गोदामे शासनामार्फत बांधून ती स्थानिक महिला शेतकरी बचत गटांना करार पद्धतीने चालविण्यास दिले जाईल.

६ उत्पादन केलेले धान्य टिकवून ठेवण्यासाठी विभागामार्फत तंत्रज्ञान विकसित करून ते उपलब्ध होण्यासाठी सवलत देण्यात येईल.

७ महिलाविषयक योजनांचा पाठपुरावा करण्यासाठी व महिलांना यासंबंधीत माहिती देण्यासाठी एक खिडकी पॅटर्न प्रमाणे ग्रामीण व शहरी भागात योजना राबविण्यात येईल.

## ५. विविध विभागाचे एकत्रित बंध :–

महिला व बालकांसाठी शासनाच्या विविध विभागामध्ये वेगवेगळया प्रकारच्या योजना एकाच ध्येयासाठी काम करीत आहेत. या सर्व योजना एक खिडकी पॅटर्नप्रमाणे राबविण्यासाठी शासनाच्या विविध विभागामध्ये एकत्रित समन्वय साधण्यासाठी महिला व बाल विकास विभागास समन्वय विभाग म्हणून मान्यता देण्यात येईल. ज्यायोगे शहरी, ग्रामीण आदिवासी महिलांना सर्वप्रकारच्या योजनांचा लाभ मिळवण्यासाठी वेगवेगळ्या भागांकडे पाठपुरावा करण्याची गरज राहणार नाही व राज्यातील सर्व महिला व बालकांच्या सामाजिक, मानसिक, आर्थिक व वैद्यकीय गरजा पूर्ण करण्याची जबाबदारी महिला व बाल विकास विभागास समन्वय विभाग म्हणून देण्यात येईल व त्याचा अहवाल महिला व बाल विकास विभाग शासनास वेळोवेळी सादर करेल.

## ६. शहरी भागातील महिलांचे प्रश्न

शहरी महिलांचे प्रश्न ग्रामीण भागातील महिलांपेक्षा अतिशय वेगळे असून त्यामध्ये खालील बाबींचा समावेश होतो.

वाढत्या स्थलांतरामुळे शहरामध्ये जो गरीब वर्ग नव्याने दरवेळेस निर्माण होत आहे. त्यास शहरी गरीबी असे नांव देता येईल व त्याचा थेट संबंध राहण्यासाठी घर, स्वच्छ पिण्याचे पाणी, सांडपाणी व्यवस्था, आरोग्य सुविधा, शिक्षण व सामाजिक सुरक्षा या बाबीवर पडतो.

सद्य:स्थितीमध्ये वाढत्या शहरीकरणामध्ये मोठ्या प्रमाणात रोजगारनिर्मिती करण्याची संधी उपलब्ध झाल्या आहेत. खाजगी कंपन्या, माहितीक्षेत्र, सेवाक्षेत्र इ. बाबीवर शासनाच्या स्वयंरोजगार विभागाचे संपूर्णत: आधुनिकीकरण करुन वरील क्षेत्रांना अत्यावश्यक मूलभुत प्रशिक्षण कार्यक्रम तयार करणे व वरील क्षेत्रामधून रोजगार व स्वयंरोजगाराच्या संधी / जागा उपलब्ध करुन देण्यात येईल. यामुळे खाजगी क्षेत्रातील रोजगार केंद्रामार्फत होणारी पिळवणूक थांबविण्यास मदत होईल.

प्रशिक्षित महिला निश्चितपणाने स्वत:च्या पायावर उभे राहून स्वयंरोजगारीत होतील. यासाठी शहरातील झोपडपट्टयांमध्ये, वस्त्यांमध्ये कार्यरत अंगणवाड्या ह्या शासनाचे संपर्क केंद्र म्हणून कार्यरत होण्यासाठी एकात्मिक बाल विकास सेवा योजनेचे जास्तीत जास्त बळकटीकरण केले जाईल व घरबसल्या उद्योग पुरविणाऱ्या कंपन्यांना शासन सवलती देईल.

महिला व बालकांना अत्यावश्यक असलेल्या आरोग्य सुविधा या एकाच ठिकाणी अधिक परिणामकारक पुरविण्यासाठी शहरामध्ये स्थानिक स्वराज्य संस्था, राज्य तसेच केंद्र शासनाच्या राष्ट्रीय शहरी आरोग्य सेवा मिशन सारख्या यंत्रणा एकत्रितपणे राबवून आपल्या सेवा जास्तीत जास्त परिणामकारकरितीने त्यांच्यापर्यंत पोहोचविणे गरजेचे ठरते. यासाठी या सेवा शहरातील झोपडपट्ट्यामध्ये, वस्त्यामध्ये अंगणवाडीद्वारे देण्यात येतील.

नोकरी करणाऱ्या महिलांना दुहेरी भूमिका करावी लागत असल्याने, त्यांच्या आरोग्याकडे दुर्लक्ष होते. त्यामुळे कामाच्या ठिकाणीच दर सहा महिन्यांनी मोफत आरोग्य तपासणीची व्यवस्था करणे सर्व आस्थापनांना बंधनकारक करण्यात येईल.

१ गृह विभाग आणि वाहतूक पोलिस यांचेकडून महिलांसाठी संवेदनशील असलेली ठिकाणे निश्चित करण्यात येतील.

२ सर्व रस्ते, गल्लूया येथे पूर्ण व स्वच्छ प्रकाश देणारे दिवे बसवण्यात येतील.

३ फेरीवाला परवाना देतांना महिला फेरीवाल्यांना प्राधान्य देण्यात येईल.

४ रिक्षा व टॅक्सी यांचे परवाने देतांना महिलांना प्राधान्य देण्यात येईल.

५ संध्याकाळी ८ ते सकाळी ८ या दरम्यान महिलांसाठी सार्वजनिक वाहतूक सेवा उपलब्ध करुन देण्यात येईल.

६ महिलांच्या खेळांना (womens sport) प्राधान्य देण्यात येईल व ते जनमानसात रूजवून लोकप्रिय करण्यासाठी शासन प्रयत्नशील राहील.

७ खाजगी क्षेत्राच्या धर्तीवर शासकीय /निमशासकीय कार्यालयांमध्ये घरुन काम करण्याची

संकल्पना (Work from home) राबविण्याचा प्रयत्न केला जाईल.

८ केंद्र शासनाच्या महिलांसाठी बाल संगोपन रजा या धर्तीवर राज्य शासनामार्फत सुध्दा महिलांसाठी बाल संगोपन रजा देण्यात येईल.

## ७. आदिवासी महिला

आदिवासी स्त्री च्या कौटुंबिक, सामाजिक, आर्थिक, राजकीय व सांस्कृतिक जीवनाचा आधार निसर्ग आहे. म्हणूनच महिलांसाठीचे धोरण ठरवतांना आदिवासी महिलांच्या निसर्गाधीष्ठीत जीवन पद्धतीवर आधारीत विशेष तरतूदी करणे गरजेचे आहे. म्हणूनच त्यातील...

- पर्यावरण, शेती, नैसर्गिक संसाधने (जल, जंगल, जमिन) उपजीविका व रोजगार, शिक्षण – आरोग्य व संस्कृती या क्षेत्रात आदिवासी महिलासाठी विशेष तरतूदी केल्या जातील.
- वनाधिकार कायदा २००६ नुसार नियमित केल्या जाणाऱ्या शेतजमिनीचे हस्तांतरण हे पती–पत्नीच्या नांवे संयुक्तपणे करण्यासंदर्भात असलेल्या तरतूदीची सक्तीने अंमलबजावणी केली जाईल.

## ८. उपजीविका व रोजगार

१ राष्ट्रीय आजिविका अधिकार अभियांनांतर्गत आदिवासी क्षेत्रात अंमलबजावणी करतांना बचत गटांचा आग्रह न धरता सामूहिकपणे पुढे येणाऱ्या महिलांना गट प्रशिक्षण, अनुदान व बीजभांडवल पुरविण्यात येईल.

२ आदिवासी विकास महामंडळावर महिलांना ३३% प्रतिनिधीत्व व विशेष राखीव निधीची तरतूद करण्यात येईल.

३ रोजगारासाठी हंगामी स्थलांतर करणाऱ्या आदिवासी महिलांना रोजगाराच्या ठिकाणी सुरक्षा, निवारा, स्वच्छ पाणी व आरोग्याच्या सुविधा पुरविण्याबाबत काटेकोर अंमलबजावणी व्हावी व त्यावर नियमित देखरेख ठेवण्यासाठी स्वतंत्र सक्षम यंत्रणा निर्माण करण्यात येईल.

४ आदिवासी स्त्रियांमध्ये अंधश्रध्देचे व अज्ञानाचे प्रमाण काही प्रमाणात आढळते. त्यामुळे त्यांच्याच बोलीभाषेत त्यांच्यासाठी शिक्षणाची व्यवस्था केली जाईल. जेणेकरुन, शिक्षणाचे व आरोग्याचे महत्व त्यांना समजेल व पुढच्या पिढीला त्याचा उपयोग होईल.

५ स्थानिक पातळीवर उपलब्ध होणाऱ्या गोष्टीतून पौष्टिक आहार कसा तयार करता येईल, याचे प्रशिक्षण दिले जाईल.

## ९. स्वयंसहाय्यता बचत गटाविषयीच्या सूचना.

१ महिला स्वयंसहाय्यता बचत गट तयार करतांना बीपीएल, एपीएल असा भेदभाव न करता सर्व महिलांचा समावेश करुन त्यांचे बचत गट स्थापन करण्यास मंजूरी देण्यात येईल.

२ राज्यातील बचत गटांची माहिती व नोंदणी करण्याच्या राज्यस्तरावर महिला आर्थिक विकास महामंडळामार्फत स्वतंत्र व्यवस्थापन कक्ष स्थापन करण्यात येईल. त्यांच्या मूल्यमापन व सनियंत्रण व्यवस्थापनासाठी महिला आर्थिक विकास महामंडळाला आर्थिक सहाय्य उपलब्ध करुन दिले जाईल.

३ व्यवस्थापन कक्षाद्वारे महाराष्ट्रातील सर्व बचत गटांची सर्व माहिती (नांव, पत्ता, योजनेचे नांव, त्यांचा घटक, त्यांचा व्यवसाय, उत्पादने, संपर्काचे माध्यम इ. संकेतस्थळावर (वेबसाईटवर) प्रसिध्द करण्यात येईल व अद्ययावत ठेवण्यात येईल. तसेच ग्रामीण भागात वृत्तपत्रांद्वारे प्रसिध्दी दिली जाईल.

४ शहरी व ग्रामीण भागातील विस्कळीत व बंद पडलेल्या बचत गटांना पुनर्जिवित केले जाईल.

५ बचत गटांचे एक मोठा गट स्थापन करुन त्या गटांची लोकसंचालित साधन केंद्र म्हणजे स्वायत्त संस्थेची उभारणी केली जाईल.

६ महिला स्वयंसहाय्यता बचत गटाला ३५% अनुदान व ६५% कर्ज बीपीएल, एपीएल भेद न करता सर्वच बचत गटांना ४% व्याजाच्या दराने कर्ज पुरवठा करण्यात येईल.

७ महिला बचत गटांनी तयार केलेल्या वस्तू ५०% शासकीय व निमशासकीय कार्यालये, महामंडळे, आश्रमशाळा ह्यांनी खरेदी करावेत असा शासनाचा प्रयत्न राहिल.

८ स्वयंसहाय्यता बचत गटांच्या कौशल्य प्रशिक्षण, उत्पादनांविषयीची माहिती, औद्योगिक व्यवस्थापनासाठी स्वतंत्र उपजिविका विकास विभाग कक्ष राज्य स्तरावर स्थापन केला जाईल.

९ बचत गट स्थापनेनंतर २ वर्षांनी त्या गटांची नोंद व्यवस्थापन कक्षामार्फत करण्यात येईल.

१०. महिला बचत गटांना त्यांचा लाभ मिळवून देण्यासाठी सर्वसमावेशक कृती आराखडा तयार करण्यात येईल.

११. शहरी भागातील स्वर्णजयंती ग्राम स्वयंरोजगार योजनेंतर्गत (SGSRY) स्थापन झालेल्या व

स्वयंसेवी संस्थांनी सदर योजनेअंतर्गत काम पूर्ण झाल्यावर सोडून दिलेले स्वयंसहाय्यता बचत गट शाश्वत स्वरुपात राहण्याकरीता पुनर्जिवित करण्यात येतील.

१२. महानगरपालिका, नगरपालिकांनी एकूण निधीतून १०% निधीची रक्कम बचत गटांसाठी उपलब्ध करुन द्यावी, या निधीतून प्रशिक्षणाकरीता उद्योगांकरीता हा निधी वापरला जाईल.

१३. स्वयंसहाय्यता बचत गटातील महिलांच्या उद्योगाकरीता २० ते २५ लाखांपर्यंतचे आर्थिक सहाय्य बँकांमार्फत देण्यात येईल.

१४. केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनेनुसार National Rural Livelihood Mission या योजनेअंतर्गत बचतगटाची स्थापना करण्यात येईल.

## १०. स्वयंसहाय्यता बचत गटांच्या उत्पादित वस्तूंना बाजारपेठ व सेवा उद्योगांचे फायदे.

१ **Pay & Park** सेवा, सेतू, रेशन दुकान, पूरक पोषण आहार, आरोग्य सेवा केंद्र, शासकीय उपहार गृह चालविणे, सहकारी उद्योग इ. कामे बचतगटांना संचालीत करण्यास प्राधान्य देण्यात येईल.

२ स्वस्त धान्य दुकान (रेशनिंग) चालविण्यासाठी गटांना बँकामार्फत शून्य टक्के व्याजदराने कर्ज पुरवठा करण्यात येईल.

३ शासकीय विभागांना लागणाऱ्या सर्व शासकीय व्यवस्थापकीय वस्तूंचा पुरवठा तसेच शालेय, आरोग्य व आश्रमशाळांना तत्सम विभागांना लागणाऱ्या सर्व वस्तू व सेवा पुरवठ्यासाठी बचत गटांना ५०% आरक्षण देण्याचा धोरणात्मक निर्णय शासन घेईल.

४ कामधेनू योजनेच्या शासन निर्णयात सुधारणा करुन महिला बचत गटांनाही त्यात समाविष्ट करण्यात येईल. बचत गटांना या शासन निर्णयानुसार संबंधित विभागांना काम उपलब्ध करुन देण्याचे बंधनकारक करुन, व या योजनेचे कठोरतेने पालन करण्यात येईल.

५ शहरात व ग्रामीण भागात चांगली बाजारपेठ मिळवून देण्याकरीता महिला उद्योग भवनची निर्मिती करण्यात येईल. या महिला बचत भवनास (स्व.श्रीमती इंदिरा गांधी) ह्यांच्या स्मृती प्रित्यर्थ "प्रियदर्शनी उद्योग महिला भवन" असे नांव पुरस्कृत करण्यात येईल. या भवनाच्या निर्मितीसाठी शासन स्तरावर किमान १ एकर जागा बांधकामासाठी व व्यवस्थापनासाठी अर्थसहाय्य उपलब्ध करुन दिले जाईल.

६ राज्यातील सर्व बचत गटांना स्वावलंबन निधी कक्ष सुरु करुन प्राथमिक स्वरुपातील कर्ज रु.३०,०००– ते रु.५०,०००– प्रत्येक पात्र महिलेला उपलब्ध करुन देण्यात येईल.

७ बचत गटांना गावातील पडिक जमिनी, जमिनींचा जाहीर लिलाव न करता करारतत्वावर देवून सामुहिक शेती प्रकल्पांना प्रोत्साहन देण्यात येईल.

८ राज्यातील सध्याच्या एस.एल.बी.सी. (State Level Banker Committee) डी.एल.बी.सी. (District Level Banker Committee) आणि बी.एल.बी.सी. (Block Level Banker Committee) बँकर्स कमिटीमध्ये महिला शिखर संस्था / व्यवस्थापन कक्षाच्या प्रतिनिधींचा प्रामुख्याने समावेश करावा व त्यांना बैठकांना उपस्थित राहण्यास बंधनकारक केले जाईल.

९ महिला बचत गटांसाठी सामुहिक, सहकारी तत्वावर उद्योग सुरु करण्यासाठी आर्थिक व तांत्रिक सहकार्य केले जाईल.

१०. महानगरपालिका, नगरपालिका, जिल्हा परिषद व सर्व स्थानिक स्वराज्य संस्थेच्या बाजारपेठ व दुकानांमध्ये ३०% आरक्षण बचत गटाला देण्याची सक्ती केली जाईल.

११. शहर व तालुक्यातील सोसायटी व गृह संकुलामध्ये अधिकृतपणे महिला बचत गटांकरीता विविध सेवा उद्योग पुरविण्याकरीता स्वतंत्रपणे ३० x २० चा गाळा गृह संकुलामध्ये उपलब्ध करुन देण्याचे बंधनकारक केले जाईल.

१२. महिला बचत गटांना बाजारपेठ उपलब्ध करुन देण्यासाठी शहरातील फ्लाय ओव्हर (ब्रीज) खाली मोकळ्या जागा उपलब्ध करुन देण्यात येतील.

१३. शहरी विभागातील फेरीवाल्यांच्या संदर्भात धोरणामध्ये महिला बचत गटांसाठी स्वतंत्र पॉलिसी बनवावी आणि त्यामध्ये ३०% स्टॉल उपलब्ध करुन देण्यात येतील.

१४. शहराच्या विकासाकरिता तयार करण्यात येणाऱ्या विकास आराखड्यामध्ये स्वयंसहाय्यता बचत गटांसाठी ३०% व्यापारी गाळे तसेच प्रशिक्षण केंद्र उभारणीसाठी जागा उपलब्ध करुन देण्यात येतील.

**११. शासनाच्या योजना व शासन निर्णयाची प्रभावी अंमलबजावणी करण्यात येईल.**

१ झोपडपट्टी पुनर्वसन योजना (SRA) च्या शासन निर्णयात सुधारणा करुन महिला बचत गटांसाठी तळमजल्यावर व्यापारी गाळे निर्माण करुन देण्यात येतील.

२ बचत गटांचे उद्योगनिहाय वर्गीकरण करुन त्या त्या उद्योगांच्या गरजेनुसार त्यांना प्रशिक्षणाचे, व्यवस्थापनाचे, उत्पादनांच्या गुणवत्तेचे, उत्पादनांच्या पॅकींग, ब्रँडींग, प्रोडक्ट रजिस्ट्रेशन मार्केटिंग व कायदे विषयक बाबी, प्रमाणपत्र यांचे ज्ञान गटातील महिलांना करुन देण्यासाठी प्रशिक्षण कार्यशाळा व प्रत्यक्ष सहकार्य करण्याकरीता तज्ञ संस्था व तज्ञांची त्यांना संधी उपलब्ध देण्यात येईल.

३ यशवंतराव चव्हाण प्रबोधिनी (यशदा) मार्फत संशोधनात्मक अभ्यास करण्याचा प्रकल्प राबविण्यात येईल. या प्रकल्पावर शासकीय व अशासकीय तज्ञ व्यक्तींच्या मार्गदर्शनाखाली अभ्यास संशोधन ही निवड करण्यात येईल.

४ महिला स्वयंसहाय्यता बचत गटांच्या महिलांकरिता अभ्यास सहली, विविध मेळावे व कार्यक्रमांद्वारे जनजागृती करण्यासाठी स्वयंसेवी संस्थांना अर्थसहाय्य देण्यात येईल.

५ बचत गटांतील महिलांसाठी शहरातील व तालुक्यातील हौसिंग सोसायट्यांमधील कचरा व्यवस्थापनाच्या कामाची जबाबदारी देण्यात येईल. महानगरपालिकांनी केलेल्या सूचनांची अंमलबजावणी करण्यात येईल. कचऱ्याचे वर्गीकरण व इंधन निर्मिती करणारे उद्योगास प्रोत्साहन देण्यात येईल.

६ महिला आर्थिक विकास महामंडळाने शहरातील सर्व बचत गटांच्या व्यवस्थापनाचे मूल्यमापन व संनियंत्रणाचे काम करण्यासाठी शासनाच्या स्तरावर स्वतंत्र निधीची उपलब्धता करुन देण्यात येईल.

## १२. स्वयंसहाय्यता बचत गटांना औद्योगिक प्रशिक्षण पूरक कायदे व शासन स्तरावर अंमलबजावणी.

१ राज्य सरकारच्या बजेटमध्ये रोजगार, आरोग्य याप्रमाणे बचत गटांचा वेगळा वित्तिय लेखा शिर्ष असावा, याबाबत शासन स्तरावर निर्णय घेण्यात येईल.

२ बचत गटातील महिलांना सामूहिक / व्यक्तिगत उद्योग निर्मितीसाठी शासनाच्या उद्योग संचालनामार्फत तसेच महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळामार्फत आरक्षित ठेवण्यात येणाऱ्या भूखंडामध्ये ५०% भूखंड विशेषकरून एकटी रहाणारी महिला/विधवा/घटस्फोटीत/परित्यक्ता महिलांना उद्योग निर्मितीसाठी उपलब्ध करून देण्यात येतील.

३ स्वयंसहाय्यता बचत गटाबाबतचा (स्वतंत्र) कायदा तयार करण्यात येईल. यासाठी इतर राज्यांच्या कायद्याचा अभ्यास करुन, शासन स्तरावर निर्णय घेण्यात येईल.

४ स्वयंसहाय्यता बचत गटाच्या वर्गीकरणाची प्रक्रिया निश्चित करुन त्यांच्या उद्योगांना औद्योगिक विभागाच्या वतीने **(Industrial dispute Act च्या प्रमाणे)** प्रमाणित करण्यात येईल.

५ बचत गटांच्या उत्पादित वस्तूंसाठी लागणाऱ्या सर्व औद्योगिक निकषांची परिपूर्णता करण्यासाठी उदा. पॅकेजिंग, लेबलिंग, ब्रँडींग इत्यादी सुविधा उपलब्ध करुन देण्यात येतील.

६ बचत गटांना पर्यटन व तिर्थक्षेत्राचे ठिकाणी विशेष सवलत देवून बचत गटांना मार्केटिंगसाठी जागा तसेच लिंकेज साठीचे विशेष प्रयत्न व सवलत देण्यात येईल.

७ बचत गटांना स्वदेशी व विदेशी बाजारपेठा काबीज करण्यासाठी व्यवस्थापनाचे प्रशिक्षण, संस्थांना भेटी व संधी उपलब्ध करुन देण्यासाठी शासनाकडून विशेष आर्थिक तरतूद करण्यात येईल व त्यासाठी तज्ञ व्यक्तींची कन्सल्टन्सी घेवून महिलांचे उद्योगधंदे आंतरराष्ट्रीय स्तरावर नेण्यासाठी सहकार्य करण्यात येईल.

८ मोठ्या उद्योग निर्मिती मधील छोट्या उपकरणांच्या जोडणीची कामे बचत गटांना देण्याविषयी उद्योगांना प्रोत्साहन देण्यात येईल.

***********

## १८. असंघटित कामगार महिला

सातत्याने बदलणारा मालक वर्ग, कामाचे अनिश्चित व असुरक्षित स्वरुप, जे संघटीत होण्यात अनेक अडचणी असतात. ज्यांच्यासाठी सद्य:स्थितीत शासनाच्या कोणत्याही सुविधा उपलब्ध नाहीत असा वर्ग हा असंघटीत कामगार आहे. उदा. शेतमजूर, बिडी कामगार, दगड फोडणारे, कचरा वेचक, विटभट्टी कामगार, कलाकुसरीचे काम करणारे, डायमंड कटींग कामगार, घरकाम करणाऱ्या महिला मोलकरीण, मिठागर कामगार, शीतगृहात काम करणाऱ्या महिला, गारमेंट वर्कर्स, नाका कामगार, हात मजूर, ऊस तोडणारे कामगार, दायी, विणकाम करणाऱ्या, बांधकाम मजूर इ. अनुसूचित कायद्यात समावेश केलेल्या व्यथित असंघटित कामगारांचा समावेश होतो.

महाराष्ट्रात उपलब्ध असलेल्या एकूण श्रमशक्तीपैकी बहुतांश श्रमशक्ती ही असंघटीत क्षेत्रातील आहे. यातील बहुतेक लोक कष्टकरी – श्रमिक आहेत. आर्थिक सामाजिक स्तरावर अशाश्वत जीवन जगणाऱ्या व संख्येने प्रचंड असलेल्या या क्षेत्रातील महिलांवर कौटुंबिक, सामाजिक आणि कामाच्या ठिकाणी असलेल्या परिस्थितीचा बोजा अधिक पडतो.

या महिलांचे जीवनमान अधिकाधिक सुरक्षित व्हावे, विविध पातळ्यांवरील त्यांचे जीवनमान उंचावणाच्यादृष्टीने संधी उपलब्ध व्हाव्यात हे आमचे उद्दिष्ट आहे.

मागील महिला धोरणांमध्ये असंघटीत महिला कामगार हा विषय स्वतंत्रपणे मांडला नव्हता. परंतु या धोरणामध्ये हा मुद्दा नव्याने मांडण्यात येत आहे. या असंघटित कामगार महिलांच्या सक्षमीकरणासाठी खालील उपाययोजना करण्यास शासन प्रयत्नशील राहिल.

### १. सामाजिक सुरक्षा

१ समान काम व समान वेतन याची काटेकोरपणे अंमलबजावणी केली जाईल.

२ कौशल्य व ताकद या बरोबरीने सातत्याने व किचकट काम याचाही मानधन / वेतन ठरवितांना विचार केला जाईल.

३ जेथे असंघटित कामगारांचे मोठे नाके आहेत तेथे महिला कामगारांकरीता "हिरकणी कक्ष" स्थापन करण्यात येईल. तसेच तेथे स्वच्छतागृह,पाणी व शेड याची व्यवस्था करण्यात येईल.

४ जिल्हा परिषद, पंचायत समिती स्तरावर कामगार समितीचे गठन करण्यात येईल. त्यावर स्वयंसेवी संस्थांचे प्रतिनिधी नेमण्याची तजवीज केली जाईल.

## २. व्यक्तिगत सुरक्षा

असंघटित कामगार महिलांच्या लैंगिक शोषणाची शक्यता अधिक असल्याने, असे प्रकार घडल्यास त्याची जबाबदारी मालकाला घ्यावी लागेल. कामाच्या ठिकाणी होणाऱ्या लैंगिक छळास प्रतिबंध करणारा कायदा २०१३ यामध्ये असंघटित महिला कामगारांचा समावेश करण्यात आला असून स्थानिक तक्रार निवारण समिती स्थापित करण्यात येईल. या तक्रार निवारण समित्यांना आवश्यक ते सर्व अधिकार देण्यात येतील.

## ३. आरोग्य सुरक्षा

महिलांकरिता वेळोवेळी ग्रामीण व शहरी भागात वैद्यकीय शिबीरे घेण्यात येतील.

## ४. कायदेविषयक सुरक्षा :

१ सन २००८ मध्ये असंघटित कामगार सामाजिक सुरक्षा कायदा झाला आहे. त्या अंतर्गत महाराष्ट्र घरगुती कामगार मंडळ, महाराष्ट्र बांधकाम कामगार मंडळ, घरगुती कामगार महिला मंडळ स्थापन झालेले आहे. तसेच **वेल्फेअर बोर्ड** सगळ्या असंघटीत कामगारांसाठी असावे व त्या अंतर्गत येणाऱ्या सर्व सुविधांचा योजनांचा लाभ सगळ्या असंघटीत क्षेत्रात काम करणाऱ्या महिलांना मिळावा, यासाठी प्रयत्न केला जाईल.

२ असंघटित कामगार महिलांसाठी ग्रामीण भागात जिल्हा परिषद, पंचायत समिती स्तरावर व शहरी भागात नगरपालिका, महानगरपालिका स्तरावर कायदेविषयक मदतीसाठी प्रभागनिहाय समिती स्थापन केली जाईल व समितीत एका अशासकीय सदस्याचा प्रतिनिधी म्हणून समावेश केला जाईल.

## ५. आर्थिक सुरक्षा

१ असंघटित महिला कामगारांना मनरेगा (Mahatma Gandhi National Rural Employment Guarantee Act) योजनेप्रमाणे बेरोजगारी भत्ता देण्याचा विचार करण्यात येईल व तो थेट बँकेत जमा केला जाईल. त्यांच्या वास्तव्याचे ठिकाण निश्चित नसेल तर झिरो बॅलन्सने त्यांचे बँकेत खाते उघडण्यासाठी शासन आवश्यकतेनुसार पुढाकार घेईल.

२ स्वच्छता व पाणीपुरवठा विभागाने ५ ऑक्टोबर, २०१२ रोजी कचरा वेचक महिलांकरीता जो शासन निर्णय निर्गमित केला आहे, त्याची काटेकोरपणे अंमलबजावणी केली जाईल.

३ असंघटित महिला कामगार ज्या उद्योगात असतील त्या उद्योगातील कौशल्याचे काम अवगत व्हावे. यासाठी सेवा ज्येष्ठता क्रमानुसार महिलांना जाणीवपूर्वक प्रशिक्षित केले जाईल व त्यासाठी व्यावसायिक प्रशिक्षण केंद्रे सुरु करण्यात येतील.

४ या महिलांना विमा संरक्षण, जीवन विमा योजना, जनश्री योजना व निवृत्ती वेतन योजनांचा लाभ दिला जाईल व त्यात निम्मी रक्कम भरण्याची जबाबदारी शासन घेईल.

५ ११ वी, १२ वी पर्यंत प्रवेशासाठी प्रत्येक वर्षी रु.५,000/, पदवी परिक्षेपर्यंत प्रवेशासाठी दरवर्षी रु.१0,000/– व पुढील पदव्युत्तर शिक्षणासाठी प्रतिवर्षी रु.२५,000/– मदत मिळण्याची सुविधा बांधकाम करणाऱ्या कामगारांना आहे. त्याची कठोर अंमलबजावणी केली जाईल व ही सुविधा अन्य असंघटीत कामगारांनाही लागू करण्यात येईल.

६ असंघटित कामगार मुलांच्या गळतीचे प्रमाण शिक्षणात जास्त आहे. त्यांची नोंदणी करुन त्या मुलांना तांत्रिक शिक्षण मोफत उपलब्ध करुन दिले जाईल.

७ असंघटित कष्टकरी स्त्रियांसाठी जननी विमा योजनेंतर्गत इयत्ता ९वी ते १२वी पर्यंत शिकणाऱ्या मुलांना शिष्यवृत्ती देण्यात येते. ही शिष्यवृत्ती इयत्ता ८ वी पासूनच देण्यात येईल. कारण गळती मुख्यत: ८ वी पासूनच सुरु होते.

८ शासनाच्या गृह प्रकल्पात आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी राखीव असलेल्या सदनिकात असंघटीत महिला कामगारांनाही घरे मिळतील व सदनिका महिलेच्या नांवाने केली जाईल.

९ जिल्हा व तालुका स्तरावरील कार्यरत " सेतू " कार्यालयामार्फत असंघटीत महिला कामगारांची नोंदणी केली जाईल.

१0. विशेषत: असंघटीत क्षेत्रातील महिलांना भेडसावणाऱ्या समस्या जसे की, आजारपण, अपघात, मातृत्व, मृत्यू, सर्व प्रकारचा हिंसाचार इ. बाबी विचारात घेऊन त्यांना सामाजिक सुरक्षितता देण्यास शासन प्रयत्नशील राहील.

११. असंघटीत क्षेत्रातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल महिलांकडे विविध योजनांचा लाभ घेण्यासाठी लागणारी आवश्यक ती कागदपत्रे नसतात. त्यासाठी स्वच्छ, स्पष्ट व सोप्या शब्दात त्यांना योग्य ती माहिती उपलब्ध करुन देण्यात येईल.

१२. शासनाप्रमाणेच खाजगी मालकांनीही (कंपनी/ व्यक्ती/कंत्राटदार व अन्य वर्गवारी) वेतनाची रक्कम महिलेच्या खात्यावर बँकेत जमा करावी या दृष्टीने शासन योग्य ती पावले उचलेल.

***********

# १९. अपंग / मतिमंद महिला.

अपंग–मतिमंदांना आस्थेने वागविणे / संगोपन करणे महत्वाचे असून अपंग–मतिमंदांना पालकांनी स्वीकारणे बंधनकारक करणे. (वृध्दांच्या धर्तीवर) शासनास आवश्यक वाटते. अशा मुलांच्या संगोपनात पालकांना जर काही अडचणी येत असतील, तर त्या निवारण करण्यासाठी जिल्हा – तालुका स्तरावर नागरिकांच्या व शासकीय अधिकाऱ्यांच्या मदत समित्या स्थापन करुन त्यांना पुढाकार घेण्याचे निर्देश दिले जातील.

१ अपंग / मतिमंद विद्यार्थ्यांसाठी पुरेशा विशेष प्रकारच्या गरजांची काळजी घेणाऱ्या विशेष शाळा प्रशिक्षण केंद्रे तालुका स्तरावर उघडण्यास प्रोत्साहन देणे, तसेच शाळा / केंद्रात जाण्या–येण्यासाठी अपंग / मतिमंदांना सार्वजनिक वाहतूक उपलब्ध करुन देण्यासाठी प्रयत्न केला जाईल.

२ अपंग–मतिमंद महिलांची जनगणना करुन त्यांना वैयक्तिक लाभाच्या योजना थेट कुटुंबापर्यंत पुरविण्यासाठी शासन उपाययोजना करेल. उदा. त्यांचे बचत खात्यावर पैसे देणे, बाल संगोपन योजना, आवश्यक वस्तु / साधने पुरविणे.

३ जिल्हा स्तरावर किमान एक ५० लाभार्थी क्षमतेचे अद्ययावत वसतिगृह आणि विभागीय स्तरावर किमान १०० लाभार्थी क्षमतेचे अद्ययावत वसतिगृह शासनातर्फे स्थापन करण्यात येईल.

४ अपंग व मतिमंद महिला समस्यांबाबत जनमानसात जाणीव–जागृती करण्यात येईल.

५ अपंग मतिमंद महिलांना समान संधी, वागणूक व माणूसकीचा दर्जा मिळणेसाठी आवश्यक कायदेशीर व अंमलबजावणीच्या स्तरावरील तरतूदी शासन करेल.

६ अपंग व मतिमंदांसाठी असलेल्या कायद्यांचा प्रचार व प्रसिध्दी करण्यात येईल. तसेच अंपग व मतिमंद महिला यांच्यासोबत संवेदनशील संवाद आणि वागणूक साधण्यासाठी पालक, शिक्षक, संस्थाचालक इत्यादींना प्रशिक्षण देण्यात येईल.

७ मतिमंद व अपंग महिलांच्या शोषण व समस्या निवारण्यासाठी गरज पडल्यास स्वतंत्र कायद्याची निर्मिती शासन करेल.

८ वैद्यकीय क्षेत्रात अपंग / मतिमंद व्यक्तींना कोणताही लाभ देणेपासून वंचित ठेवता येणार नाही, अशी उदाहरण आढळल्यास संबंधितांवर कारवाई केली जाईल.

९ पुनर्वसनासाठी आवश्यक असलेले प्रशिक्षण औद्योगिक प्रशिक्षण संस्था (आयटीआय) यांच्या मार्फत उपलब्ध करून देण्यात येईल. या संस्थांमध्ये अपंगांना अनुरूप अभ्यासक्रम सोयीसुविधा यांची उपलब्धता करण्यात येईल. या संस्थांचा परिसर अपंग व्यक्तींना सोयीचा (disable friendly) करण्यावर कटाक्ष राहील.

१० स्वयंरोजगारासाठी मुक–बधिर अपंग व्यक्तींना विशेषत्वाने महिलांना प्राधान्याने व्यवसायासाठी आर्थिक मदत अनुदान स्वरूपात अथवा अल्प व्याज दराने अर्थसहाय्य शासकीय/निमशासकीय व्यापारी संकुलात कार्यालयातील इमारतीमध्ये गाळे मिळावेत यासाठी शासन प्रयत्नशील राहिल.

११. समाजात या महिलांचा अपेक्षित विकास साधण्यासाठी कराव्या लागणाऱ्या सर्व प्रकारच्या जाणीव–जागृतीसाठी महिला व बाल विकास विभागास शासन पुरेशी तरतूद उपलब्ध करुन देईल.

१२. अपंग,मतिमंद महिलांच्या कुटुंबाला आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी Western Regional Centre of National Handicapped Finance Development Corporation सारख्या संस्थांची त्यांना माहिती करुन दिली जाईल व त्यांच्याशी समन्वय साधून देण्यात येईल.

१३. अपंग प्रमाणपत्र मिळवण्याची प्रक्रिया अधिक सक्षम व सुलभ करण्याची आवश्यकता आहे व त्याचबरोबर ज्या ठिकाणी सर्व सोयीसुविधा व तज्ज्ञ डॉक्टर उपलब्ध आहेत अशा महापालिका रूग्णालये, जिल्हा रूग्णालये व शासकीय रूग्णालयांमध्ये देखील अपंगत्वाचे प्रमाणपत्रे देण्याची सोय करण्यात येईल.

१४. अपंग महिलांना सन्मान व समानतेची वागणूक देवून, त्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यात येईल.

**********

## २०. एकल महिला (Single Women)

स्त्री–पुरुष ही संसार आणि समाज रथाचीही दोन चाके असल्याचे आपण मानतो. परंतु नैसर्गिक आणि मानवी वर्तनाच्या गुंतागुंतीमुळे अनेकदा यात असमतोल निर्माण होत असल्याचेही आपण पाहतो. एकल महिलांचा प्रश्न हा असाच एक महत्वाचा प्रश्न आहे. विधवा, परित्यक्ता, घटस्फोटिता, प्रौढ कुमारिका, कुमारी माता, देवदासी, शरीर विक्रय करणाऱ्या महिला, तृतीयपंथी, संगीत बारीतील महिला यांची संख्या लक्षणीय आहे. महाराष्ट्रातील साधारणपणे २०% कुटुंबे एकल महिला चालवतात, असा एक अंदाज अभ्यासकांचा आहे. ही संख्या कमी नाही, तर काही लाखांत जाते.

अशा एकल महिलांच्या महत्वाच्या घटकाला वगळून हे धोरण पूर्ण होऊ शकणार नाही याची जाणीव महाराष्ट्र सरकारला आहे. या पार्श्वभूमीवर कुटुंबाच्या परिघातील एकल महिलांसंदर्भात खालील पावले उचलणे आवश्यक वाटते.

१ या स्त्रियांना कुटुंबात व बाहेर अशा दोन्ही जबाबदाऱ्या एकटीने पेलाव्या लागतात, हे लक्षात घेऊन सरकारी कागदपत्रे, पुरावे, दाखले तसेच विविध योजना यांचा लाभ कमी कष्टात घेता यावा, यादृष्टीने त्यांना विशेष ओळखपत्र देण्यासंदर्भात शासन विचार करेल.

२ सर्व शासकीय, निमशासकीय, खाजगी कार्यालयांस त्यांच्या अर्जांचा प्राधान्याने व संवेदनशीलतेने विचार व्हावा, यादृष्टीने अधिकारी कर्मचाऱ्यामध्ये त्यांच्या प्रशिक्षणावेळी जागृती निर्माण केली जाईल.

३ कुटुंब प्रमुख म्हणून महिलेचे नाव नमूद करण्याची अनेक सरकारी कर्मचारी – अधिकाऱ्यांची मानसिकता नसते, त्यामुळे अनेकदा संपत्ती व मालमत्ता यांवरील अधिकार तिला गमवावा लागतो. हे लक्षात घेऊन कुटुंब प्रमुख महिला ही संकल्पना सर्व शासकीय / निमशासकीय / खाजगी कर्मचारी व अधिकारी यांच्यात रुजविण्यासाठी शासन उपाययोजना करेल.

४ पितृसत्ताक समाज व्यवस्थेमुळे सर्व वर्गवारीतील एकल महिलांबाबत मातेचे नांव, आडनांव व तिच्या जैविक अपत्यांची नांवे – आडनांवे यांच्यात फरक आढळून येतो. यास्तव त्यांना केवळ मनस्तापातून जावे लागते असे नाही, तर आपले अधिकार व हक्क मिळविणे कठीण व गुंतागुंतीचे होते. हे लक्षात घेता त्यांना कोणतेही प्रमाणपत्र, दाखला, पुरावा (उदा. रेशन कार्ड, आधार कार्ड, जातीचा दाखला) व दावा लावण्याचा अधिकार यापासून वंचित ठेवले जाणार नाही, याची उपाययोजना केली जाईल.

५ या महिलांच्या वाट्याला येणारी भेदाभेदीची वर्तणूक नाहीशी व्हावी, यासाठी समाजात विशेष जागृतीसाठी मोहिमा, अभियान, सादरीकरणे, व्याख्याने, प्रसार माध्यमे, याद्वारे प्रयत्न केले जातील.

६ या महिलांना स्वत:च्या पायावर उभे राहण्यास मदत करण्यासाठी महिलांसाठीच्या उपलब्ध सर्व शासकीय योजनांचा लाभ त्यांना प्राधान्याने देण्यात येईल. रोजगार किंवा स्वयंरोजगाराच्या व्यवसायासाठी कमी व्याजदरात कर्ज उपलब्ध करुन दिले जाईल.

७ या महिलांसाठी रोजगाराची संधी उपलब्ध करुन देताना वयाची अट शिथिल करण्यात येईल.

८ मालमत्तेसंदर्भात काही वाद असल्यास त्यांना कायदेशीर मदत मोफत दिली जाईल.

९ मानसिकदृष्ट्या समुपदेशनाची गरज असल्यास, समुपदेशन केंद्रात ती सेवा मोफत पुरविण्यात येईल.तसेच आवश्यकतेनुसार विधी,आरोग्य,मानसोपचार तज्ञ इत्यादींच्या सेवा उपलब्ध करुन देण्यात येतील.

१० एकल महिलांना समुपदेशन व कायद्याचे मार्गदर्शन मोफत उपलब्ध करुन दिले जाईल व त्यांच्यापर्यंत पोहोचले की नाही याचा वेळोवेळी आढावा घेण्यात येईल.

११ केंद्र शासनाच्या धर्तीवर अविवाहित / विधवा मुलींना कुटुंब निवृत्ती वेतन देण्याची व्यवस्था करण्यात येईल.

**१. सुरक्षा बलात कार्य करणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या पत्नीस प्रोत्साहन देण्याकरीता योजना.**

सुरक्षा बलात कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांना वर्षातील फार मोठा काळ पत्नी व मुले यांचेपासून दूर राहून व्यतित करावा लागतो. पर्यायाने पत्नीस कुटुंबाची जबाबदारी सांभाळावी लागते. अशा परिस्थितीत तिला कुटुंबाची सर्वांगीण प्रगती करण्यासाठी सक्षम बनविण्याकरीता सुरक्षा बलात कार्य करणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या पत्नीसाठी, शासनाच्या उपलब्ध असलेल्या योजनांमध्ये विहित अटी व शर्तींच्या अधीन राहून प्राधान्याने लाभ देण्यात येईल.

**२. कैद्याच्या पत्नीचे प्रश्न**

१ गुन्हेगार गुन्हा करतो व शिक्षा भोगतो यापेक्षाही दाहक यातना त्याची पत्नी व परिवाराला सहन कराव्या लागतात. याची शासनास जाणीव असून, अशा कैद्यांच्या पत्नीचे व कुटुंबाचे प्रश्न सोडविण्यासाठी शासन प्रयत्न करेल.

२ ७ वर्षापेक्षा जास्त शिक्षा झालेल्या कैद्याच्या पत्नीस व मुला–मुलींना शासकीय व निमशासकीय संस्थांमधून व्यवसाय प्रशिक्षण देण्यासाठी कार्यवाही करण्यात येईल.

३ कैद्याच्या कुटुंबातील वृध्द आई वडिलांना श्रावणबाळ योजनेंतर्गत पेन्शन योजनेचा लाभ देण्याबाबत महसूल विभागास आदेशित करण्यात येईल. त्यामुळे कैद्याच्या पत्नीवरील आर्थिक भार कमी होईल.

४ महिला विकास विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या वैयक्तिक लाभाच्या योजनांचा लाभ घेण्यासाठी आवश्यक मार्गदर्शन करण्यात येईल.

***********

# २१. प्रबोधनात्मक लोक कलावंत (शाहिरी)

प्रबोधनात्मक लोककला प्रकार म्हणजे शाहिरी आणि कलापथके. समाजाच्या सर्व स्तरांवरील महिला सांप्रदायिक शाहिरीसोबतच परिवर्तनाचीही शाहिरी सादर करतात. त्यात शाहू – फुले – आंबेडकरी शाहिरी, जलसे तसेच संत तुकडोजी महाराज, गाडगे महाराज, छत्रपती शिवाजी महाराज व तत्सम समाज सुधारकांच्या विचारांवर आधारित शाहिरी कार्यक्रम सादर करतात. परंतु त्यांचा अंतर्भाव पूर्णवेळ व्यावसायिक कलावंत म्हणून केला जात नाही. त्यांना केवळ प्रासंगिक स्वरुपाचे कार्यक्रम मिळतात. ज्यावर त्यांचा वर्षभराचा उदरनिर्वाह शक्य नसतो.

या महिला लोककलावंतांना विविध शासकीय योजनांचा प्रचार – प्रसार करणारे कार्यक्रम प्राप्त झाले तर त्यांच्या उदरनिर्वाहाबरोबरच प्रबोधनाचेही कार्य होईल. त्यादृष्टीने जनजागृती, जनसुराज्य, ग्रामस्वच्छता, स्त्री–भ्रुण हत्या प्रतिबंध, महिला स्वावलंबन, एड्स जागृती हे विविध कार्यक्रम दिले जातील.

या महिलांना प्रवास करावा लागतो, हे लक्षात घेऊन त्यांना सार्वजनिक वाहतुक व्यवस्थेत सवलतीत पास देऊन त्यांचा अपघात विमा उतरविण्याचा शासन प्रयत्न करेल.

## १. संगीत बारी व तमाशा कलावंत

१ संगीत बारी तसेच ढोलकी फड तमाशात प्रामुख्याने समाजातील उपेक्षित वर्गातील महिला असतात. त्यांना उदरनिर्वाहासाठी गावोगावी भटकंती करावी लागते. अस्थिर जीवन जगावे लागते. त्यामुळे त्यांच्या मुलाबाळांचे शिक्षण व आरोग्य विषयक समस्या निर्माण होतात.

२ संगीत बारी, ढोलकी फड तमाशातील कलावंत स्त्रियांच्या मुलाबाळांना देखील निवासी आश्रमशाळेमध्ये प्रवेश देण्यात येतील, तसेच संगीत बारी, ढोलकी फड तमाशातील कलावंत स्त्रियांच्या, पथकासाठी, प्रवासासाठी सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेत सवलती पास दिले जातील, आणि आरोग्य विमा तसेच अपघात विमा काढण्यात येईल.

३ अखिल भारतीय साहित्य संमेलन किंवा अखिल भारतीय नाट्य संमेलन यांच्या धर्तीवर अखिल भारतीय महिला लोककला संमेलनासाठी भरीव तरतूद करण्यात येईल.

४ महिला लोककलावंतांना, त्यांच्या पाल्यांना लोककला विषयक शास्त्रशुध्द प्रशिक्षण देणाऱ्या विद्यापीठांच्या लोककला अकादमींना प्रतिवर्षी भरीव अनुदानाची तरतूद करण्यात येईल.

५ या महिला जरी कलावंत असल्या तरी विषमता व भेदाभेद मानणाऱ्या आपल्या समाजात त्यांना फारशी मानाची वागणूक मिळत नाही. कित्येकदा तर या महिलांना लैंगिक छळास सामोरे जावे लागते, किंवा संपूर्ण फडालाच ग्रामस्थांकडून धोका निर्माण होतो. अशा स्थितीत त्यांना संरक्षण लाभावे यादृष्टीने पोलिस अधिक्षक/पोलिस उपायुक्त दर्जाच्या पोलिस अधिकाऱ्यांकडे थेट तक्रार नोंदविण्याची सोय केली जाईल.

६ संगीत बारीत काम करणाऱ्या महिला अथवा त्यांच्या मुलींना स्वावलंबाने त्यांच्या पायावर उभे राहण्यासाठी आधार देणाऱ्या व्यक्तीस किंवा संस्थेस पुरस्कार देण्यात येईल.

७ महिला तमाशा कलावंतांना शासनाच्या घरकुल योजनेचा लाभ देण्याचा विचार करण्यात येईल.

८ ४० वर्षे पूर्ण झालेल्या महिला तमाशा कलावंतास निवृत्ती वेतन/मानधन देण्याचा विचार केला जाईल.

**********

# २२. देवदासी पुनर्वसन

अंधश्रध्दा, गरीबी, शारीरिक व्यंग, जटा येणे इत्यादी अनेक कारणांवरुन अजाण वयातील मुला–मुलींना देवाला / देवीला सोडण्याची प्रथा महाराष्ट्रात आहे. या मुला–मुलींना सर्वसामान्य नागरिकांप्रमाणे कौटुंबिक व सामाजिक आयुष्य जगता येत नाही. समाजव्यवस्थेत जागा नसल्यामुळे तसेच आर्थिक स्त्रोत नसल्याने बहुसंख्यांच्या वाट्याला बाजारात विकले जाण्याचे, शरीर विक्रय करण्याचे भोग येतात. विशेषकरुन, जात उतरंडीतील तळातल्या जातींमध्ये या दु:खद आयुष्य जगणाऱ्यांचे प्रमाण लक्षणीय आहे. सामाजिक विषमता, रुढी, अंधश्रध्दा, अज्ञान, वर्चस्ववादी जातींची समाजावर असलेली पकड यामुळे ही प्रथा निर्मूलन करण्यात अनेक अडथळे येत आहेत. मात्र तरीही माणूसपण नाकारणारी ही प्रथा नाहीशी व्हावी, यासाठी महाराष्ट्र सरकार आग्रही असून पुढील पावले उचलली जातील :

१ देवदासी प्रथा नाहीशी करणे कायदा, २००५ ची कडक अंमलबजावणी करण्यात येईल.

२ देवदासी प्रथा निर्मूलन व पुनर्वसन कार्य करणाऱ्या देवदासी महिलेस प्रत्येक वर्षी विशेष पुरस्काराने सन्मानीत करण्यात येईल.

३ देवदासी व त्यांच्या मुला–मुलींना पदवी व उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती योजना सुरु करण्यात येईल.

४ पदवी, पदव्युत्तर, तांत्रिक व उच्च शिक्षण तसेच सरकारी / खाजगी नोकरीमध्ये देवदासी व त्यांच्या अपत्यांना अग्रक्रम देण्यात येईल.

५ देवदासींना मुख्य प्रवाहात सामावले जाता यावे, यादृष्टीने त्यांना व त्यांच्या अपत्यांना बालगृहे, आश्रमशाळा, महिलाश्रम, वृध्दाश्रम येथे अग्रक्रमाने प्रवेश देण्यात येईल. या संस्थांमध्ये या वर्गावारीसाठी एकूण क्षमतेच्या १०% जागा आरक्षित ठेवल्या जातील. या १०% जागा काही कारणांनी न भरु शकल्यास त्यांवर वृध्द, निराधार, एकल महिलांस प्राधान्याने प्रवेश दिला जाईल.

६ देवदासी प्रथा निर्मूलन कायदा व पुनर्वसन योजना यांच्या काटेकोर अंमलबजावणीसाठी राज्य पातळीवर नियंत्रण समिती नेमण्यात येईल व त्यामध्ये देवदासींसाठी कार्य करणाऱ्या संस्था, कार्यकर्ते व देवदासी यांना प्रतिनिधीत्व दिले जाईल.

७ महिला व बाल विकास विभागातर्फे सर्वेक्षण पूर्ण झालेल्या देवदासी महिलांना देवदासी असण्याचा कायमस्वरुपी दाखला व ओळखपत्र देण्यात येईल. देवदासी व त्यांच्या अपत्यांना लागू असलेल्या, शैक्षणिक अनुदान, विवाहासाठी अनुदान वा तत्सम योजनांसाठी हा दाखला व ओळखपत्र एवढेच पुरावे ग्राह्य धरले जातील.

८ देवदासींचे प्राबल्य असलेल्या जिल्ह्यांमध्ये इंदिरा आवास योजनेंतर्गत देण्यात येणाऱ्या घरकुल योजनेत देवदासींकरीता आरक्षण ठेवण्यात येईल.

९ सर्व देवदासींना बीपीएल कार्ड देण्यात येईल व त्याआधारे त्यांना आरोग्य व केंद्र आणि राज्य सरकारच्या लागू होणाऱ्या सेवा व योजना यांचा लाभ घेता येईल.

१०. देवदासी हा शब्द व्यापक असून त्यात वाघ्या, मुरळी, पोतराज, आराध्ये, लुगडंवाले, जोगते, किन्नर, तृतीयपंथी, गोसावी, वासुदेव, कलावंत यांचा समावेश होतो. सर्वेक्षणात ज्यांचा अंतर्भाव आहे, त्यांना देवदासींना लागू असणारे सर्व फायदे व योजना लागू करण्यात येतील.

११. देवदासी प्रथा नाहीशी व्हावी व पुढील पिढीत ती चालू राहू नये, यादृष्टीने देवदासी महिलेला दरमहा ६००/– रुपये निर्वाह वेतन दिले जाते. मात्र वाढती महागाई लक्षात घेता हे उद्दिष्ट साध्य होण्यासाठी ही रककम वाढविण्याची गरज आहे. त्यामुळे ही रक्कम कमीत कमी १५००/– रुपये करण्याचा प्रयत्न केला जाईल.

१२. देवदासी प्रथा अनुसरणाऱ्या समुहांमध्ये महिलांनी झुलवा लावण्याची प्रथा अस्तित्वात आहे. त्यामुळे सर्वसाधारण पितृसत्ताक समाजाप्रमाणे या समुहातील मुला–मुलींना पित्याचे नाव लावण्यात असंख्य अडचणी निर्माण होतात. हे लक्षात घेता त्यांना कुटुंब प्रमुख म्हणून आईचे नांव लावण्याची व आईच्या जातीचाच दाखला देण्याची सोय करण्यात येईल. असा दाखला प्राप्त करण्यासाठी सामाजिक न्याय विभागांतर्गत स्वतंत्र जात पडताळणी कक्ष स्थापन करण्यात येईल.

१३. देवदासींच्या मुला–मुलींशी विवाह करणाऱ्या सर्वसाधारण कुटुंबातील मुला–मुलींना विशेष प्रोत्साहन देण्याच्या हेतूने त्यांना पुरस्कार आणि प्रशंसापर प्रमाणपत्र देण्यात येईल. तसेच देवदासी प्रथा सोडणाऱ्या महिलांचा जाहीर सत्कार करून त्यांना Role Model म्हणून इतर देवदासींचे प्रबोधन करण्यासाठी प्रोत्साहित करण्यात येईल.

१४. अज्ञान, अंधश्रध्दा, गरीबी आणि विषमता यांच्यामुळे आपल्या मुला–मुलींना देवाला वाहण्याची ही प्रथा पिढ्यानुपिढ्या चालू आहे. ती नष्ट व्हावी यासाठी मुला–मुलींना देवाला वाहणाऱ्या कुटुंबाचे, समाजघटकांचे प्रबोधन होणे अत्यंत गरजेचे आहे. तसेच अन्य सर्वसाधारण समाजातही या प्रथेला मान्यता असल्याचे दिसते. धार्मिक – कौटुंबिक देवकार्यात लग्नकार्यात या देवदासींशी संबंधित रुढी चालू आहेत. त्यामुळे खरे तर सर्वच समाजाचे प्रबोधन करावे लागेल. त्यादृष्टीने प्रथा बाधित समूह व प्रथेला उत्तेजन देणारा सर्वसाधारण समाज यांच्या प्रबोधनासाठी स्वयंसेवी संस्था / व्यक्ती यांच्या सहकार्याने विविध उपक्रम हाती घेतले जातील.

१५. देवदासींना स्वावलंबी बनविण्यासाठी लघु–उद्योगासाठी कमी व्याजाने कर्ज देण्यात येईल.

***********

## २३. देहविक्री करणाऱ्या महिलांसाठी.

स्त्रियांना समाजात असलेले दुय्यम स्थान, त्यांच्या श्रमाऐवजी त्यांच्या शरीराला मोबदला देण्याची विकृत मनोवृत्ती, स्त्री शरीराभोवती घुटमळणारी समाजाची फसवी नैतिकता या सर्व घटकांबरोबरच समाजाची आर्थिक घडी बदलल्यामुळे होणाऱ्या उलथापालथी, आर्थिक हितसंबंध, आर्थिक विषमतेतून निर्माण होणारी अन्यायकारक जीवनपद्धती हा मुख्य घटक आहे. भारतीय समाजात या सर्वांच्या जोडीला विषमताधिष्ठित, श्रेष्ठ कनिष्ठत्वाच्या फोल कल्पनांवर आधारलेली जाचक जातीव्यवस्थाही कार्यरत आहे.

या पार्श्वभूमीवर तळागाळातील, आर्थिक विषमतेचे चटके सोसणाऱ्या महिलांचे प्रमाण शरीर विक्रयाच्या व्यापारात वाढताना दिसत आहे. हा प्रश्न स्त्रियांच्या लैंगिक शोषणाच्या परिसीमेचा तर आहेच, परंतु समाजातील सर्व प्रकारची विषमता, संपत्ती व अधिकारांची असमान वाटणी यातून तो उद्भवला असून भाजीपाला, मुके प्राणी यांची व्हावी तशी महिलांची खरेदी–विक्री होणे ही बाब पुरोगामी महाराष्ट्राला शोभा देणारी नाही.

देह विक्रयाच्या बाजारात खरीदल्या / विकल्या जाणाऱ्या व्यक्तींना अत्याचार, हिंसा, अपमान, उपेक्षा, शाश्वतीचा अभाव, कलंकित जीवन अशा सर्व आपत्तींचा सामना करावा लागतो. कौटुंबिक जीवन तर पार उध्दवस्त होते.

कलंक आणि भेदभावामुळे तीव्र स्वरुपाच्या शारीरिक आणि मानसिक हिंसाचाराचा सामना या समुदायास करावा लागतो. नैराश्य, असाध्य आजार, लैंगिक संसर्गाचे आजार, आणि गुप्तरोग, एच.आय.व्ही.ची लागण यासारखी कमजोर करणारी दुखणी यातून मृत्यू ओढवतात. हिंसाचार मानवी हक्कांचे उल्लंघन तसेच बाह्यजगातील गुन्हेगारीची असुरक्षितता यामुळे या महिलांना वर नमूद केलेल्या असाध्य रोगांचा धोका अधिक वाढतो. हा परस्परसंबंध अनेक संशोधनातून सिध्द झालेला आहे.

आर्थिक सामाजिक परिस्थितीमुळे त्यातील शोषणामुळे महिला या व्यवसायात येतात. नंतर अनैतिक वाहतूक प्रतिबंध कायद्यांतर्गत (ITPA) घातलेल्या छाप्यांमध्ये वेगवेगळया अत्याचारांच्या शिकार होताना दिसतात. त्यांना दीर्घकाळ डांबून ठेवले जाते. जामिन नाकारला जातो तसेच न्यायालयीन आणि वैद्यकीय मदत नाकारली जाते. हे देशातील कोणत्याही नागरिकाच्या मुलभूत आणि मानवी हक्कांचे गंभीर उल्लंघन आहे.

जबरदस्तीने व्यवसाय करणाऱ्या विशेषत: अल्पवयीन मुली, ज्यांना त्यांचे नातेवाईकच विकतात किंवा नोकरी किंवा लग्नाचे अमिष दाखवून त्या फसविल्या जातात. त्याचा बचाव आणि सुटका करणे, हे पोलीस आणि सरकारचे आद्य कर्तव्य आहे.

मुलींची अवैध वाहतूक थांबविणे आणि देहविक्री करणाऱ्या महिलांच्या मानवी हक्कांचे संरक्षण करण्यासाठी शासन उपाययोजना करेल.

देह विक्रयाच्या बाजारात भारतातील अन्य राज्यांप्रमाणेच महाराष्ट्रातील गरीब अविकसित भाग , देवदासी व तत्सम प्रथांचा प्रभाव असलेले जिल्हे येथून वाहतुक होणाऱ्या मुली / महिलांचे प्रमाण मोठे आहे, हे आता सिध्द झाले आहे. महानगरांमध्येही दरिद्री वस्त्या, मागास विभागातील मुली / महिला फसविल्या जाण्याचे प्रमाण मोठे आहे. हे लक्षात घेता या सर्व क्षेत्रामध्ये खालील दक्षता घेण्यात येतील.

१ देह व्यापाराबाबतचे संवेदनशील तालुके, जिल्हे, गावे, वस्त्या यांची यादी करून ती संवेदनशील क्षेत्रे म्हणून जाहीर केली जातील.

२ या क्षेत्रामध्ये रोजगाराची कामे नियमित व न्याय्य पध्दतीने चालत आहेत, यावर शासन उपाययोजना करेल.

३ या क्षेत्रातील मुलींचे शिक्षण / आरोग्य याबाबतच्या पुनर्वसन योजना राबविण्यात येतील.

४ या क्षेत्रातील सार्वजनिक वितरण व्यवस्था (अन्न सुरक्षा) पाणी, इंधन याबाबत महिलांची स्थिती सुधारण्याकरीता शासन उपाययोजना करेल.

५ या क्षेत्रातील महिलांच्या सुरक्षेचा प्रश्न महत्वाचा मानून तेथील दलाल टोळ्या, गुन्हेगारी जाळे तसेच हितसंबंधी यंत्रणा (दारुगुत्ते, पब, सोशल क्लब, पार्लर्स, ट्रक टर्मिनल्स इ. यांवर प्रतिबंधात्मक कार्यवाही शासन करेल.

६ नैसर्गिक व मानवनिर्मित संकटामध्ये स्त्री च्या असहाय्यतेचा फायदा घेऊन त्यांना या व्यवसायात आणले जाणार नाही. यासाठी त्या–त्या ठिकाणी सरकारी तसेच पोलीस यंत्रणा प्रतिबंधात्मक दक्षता घेण्याचे काम करतील. आपदग्रस्तांसाठी उभारलेल्या मदत छावण्यामध्ये महिलांविषयक एक स्वतंत्र कक्ष विविध स्तरांवर कार्यरत राहील व महिला सुरक्षेची काळजी घेईल.

७ देहविक्री करणाऱ्या स्त्रियांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी त्यांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी नोकरी /व्यवसायाच्या पर्यायी संधी उपलब्ध करुन दिल्या जातील.

१. **सार्वजनिक आरोग्य.**

भेदभावजन्य मानसिकतेमुळे आरोग्य सेवांचा यथायोग्य लाभ घेता येत नाही / पोहोच कमी होते यासाठी.

१ आरोग्य सेवा पुरवठादार / कर्मचारी यांची देहविक्री यांच्या धंद्यातील व्यक्ती बाबतची मानसिकता बदलण्यासाठी त्यांच्यामध्ये संवेदना जागृती केली जाईल. सार्वजनिक दवाखाने/रूग्णालये येथे त्यांना वैद्यकीय उपचार हक्काने मिळावेत यासाठी दवाखाना/रूग्णालयातील समाजसेवक कक्ष कार्यरत रहातील.

२ एच.आय.व्ही. सेवा व्यवस्थापनाचे प्रशिक्षण नियमितपणे दिले जाईल.

३ देहविक्री करणाऱ्या व्यक्तींच्या तक्रारींची / अडचणींची सोडवणूक करण्यासाठी **दवाखान्यात समुपदेशन सेवा, तक्रार निवारण केंद्रे उभी केली जातील.**

४ देहविक्री करणाऱ्या व्यक्तींच्या **मुलांकरीता आरोग्य** सेवा मोफत अथवा सवलतीच्या दरात उपलब्ध करुन देण्यात येतील.

५ देहविक्री करणाऱ्या महिला व या महिलांची मुले ही कुपोषित असल्याने तसेच त्यांच्यात पोषण तत्वांची कमतरता असल्याने व त्यांना संसर्गाची अधिक शक्यता असल्याने त्यांची आरोग्य सेवेबाबत विशेष काळजी घेण्यात येईल.

६ देहविक्री करणाऱ्या महिला व त्यांच्या मुलांकरीता तांत्रिक व व्यावसायिक प्रशिक्षण देण्याबाबत गोवा राज्यातील प्रभात योजनेच्या धर्तीवर नवीन योजना राबविण्यात येईल.

## २. शिक्षण

या महिलांच्या मुलांना जन्माचा दाखला, निवासी पुरावा ही व यासारखी कागदपत्रे नसल्याने शाळा प्रवेशासाठी अडचणी येतात / प्रवेश मिळण्यात अडचणी उद्भवतात. देहविक्री करणाऱ्या महिलांच्या मुलांना शाळेत भेदभावाने / हीनपणे वागवले जात असल्याने त्यांचे शाळा गळतीचे प्रमाण जास्त आहे. देहविक्री करणाऱ्या महिलांच्या मुलींना या व्यवसायात यावे लागू नये, यासाठी आवश्यक व परिणामकारक प्रतिबंधात्मक योजनेचा अभाव आहे. यासाठी

१ काही कागदपत्रांची विशेषत: शाळेत प्रवेश देण्यासाठी लागणाऱ्या कागदपत्राची अट शिथिल केली जाईल. उदा. वडिलांचे नांव, बीपीएल कार्ड, जातीचे प्रमाणपत्र इ. राज्यात शासनाद्वारे भरविण्यात येणारे सर्व अर्जात फक्त आई किंवा फक्त वडिल किंवा दोघांचे नाव लिहिण्याचे पर्याय देण्यात येतील.

२ यासंबंधी शिक्षक व शालेय कर्मचारी– अधिकारी यांच्यामध्ये संवेदनशीलता निर्माण करण्यात येईल.

३ एच.आय.व्ही.ग्रस्त किंवा शरीर विक्री करणाऱ्या **महिलांच्या बालकांबाबत** शाळांमध्ये भेदभाव केला जाऊ नये. यासाठी शिक्षण व आरोग्य विभाग आणि **एमसॅक्स ( MSACS)** यांच्यामध्ये समन्वय **साधला जाईल.** तसेच या महिलांच्या मुलांबाबत एमसॅक्स,एमडॅक्स ( MDACS ) मध्ये आवश्यक उपाययोजना केल्या जातील.

४ देहविक्रीचे काम करणाऱ्या महिलांच्या मुलांना सरकारी शिष्यवृत्ती व निवासी शाळेमध्ये सुलभपणे प्रवेश मिळावा, यादृष्टीने शिक्षण हक्क कायद्याची प्रभावीपणे अंमलबजावणी केली जाईल.

५ देहविक्री करणाऱ्या व्यक्तींच्या मुलांसाठी पोषक आहार दिला जाईल आणि वस्तीत रात्रीची राहण्याची व्यवस्था केली जाईल.

६ या महिलांना सर्व शासकीय प्रमाणपत्रे मिळण्यातील अडचणी दूर केल्या जातील.

७ देहविक्री करणाऱ्या व्यक्तींच्या मुलींना शालेय / महाविद्यालयीन शिक्षण अर्धवट सोडावे लागू नये, यासाठी त्यांना विशेषत्वाने शैक्षणिक सुविधा उपलब्ध करुन दिल्या जातील. त्यांच्या मुली यांच्याशी सल्लामसलत करुन त्यांना आवश्यकतेनुसार व्यवसाय प्रशिक्षण आणि उद्योग निर्मितीचे सहाय्य व संधी दिली जाईल.

८ देहविक्रीच्या व्यवसायातून बाहेर पडलेल्या महिलांना आवडी व गरजेनुरुप योग्य व्यवसाय कौशल्याचे प्रशिक्षण दिले जाईल.

९ देहविक्री करणाऱ्या स्त्रियांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी त्यांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी नोकरी /व्यवसायाच्या पर्यायी संधी उपलब्ध करुन दिल्या जातील.

## ३. घरकुल योजना.

देहविक्री करणाऱ्या व्यक्तींकडे समाज हीन भावनेने बघतो, त्यामुळे वेळप्रसंगी त्यांना राहण्यासाठी भाड्याने खोली देखील मिळणे कठीण होते. त्यांच्या मालकीची जमीन नसल्याने व निवासी दाखला नसल्याने त्यांना घरकुल योजनेचा लाभही मिळू शकत नाही. यासाठी

१ या व्यवसायातील वृध्द आणि व्यवसायातून बाहेर पडलेल्या व्यक्तींसाठी निवारा व्यवस्था केली जाईल.

२ देहविक्री करणाऱ्या महिलांचे सामाजिक परिवर्तन व्हावे यासाठी महिला व बाल विकास विभागामार्फत विशेष घरकुल योजना राबविण्यासाठी जमिन व निधी उपलब्ध करून देण्यात येईल.

३ एच.आय.व्ही. ग्रस्त महिलांचे शासन मोफत पुनर्वसन करेल.

४ कल्याणकारी कार्यक्रमांची प्रभावी अंमलबजावणी व्हावी यासाठी आवश्यक कागदपत्रांची यादी कमी केली जाईल.

५. केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनानुसार इंदिरा आवास घरकुल योजना राबविण्यात येईल.

## ४. बचत गट.

१ महिला आर्थिक विकास महामंडळातर्फे देह विक्रीच्या व्यवसायातील व्यक्ती, तमाशा कलावंत आणि तृतीयपंथी व्यक्तींसाठी बचत गट सुरु केले जातील.

२ या व्यवसायातील व्यक्तींचे सध्या अस्तित्वात असलेले बचत गट महिला आर्थिक विकास महामंडळाशी जोडून घ्यावेत आणि त्यांना कौशल्य व नेतृत्व विकास प्रशिक्षण दिले जाईल.

३ या महिलांना सवलतीच्या दरात कर्ज उपलब्ध करुन देण्यात येईल.

## ५. सामाजिक सुरक्षा.

१ सामाजिक सुरक्षेच्या व लाभांच्या संबंधित योजनांचा लाभ मिळावा यासाठी कागदपत्रांच्या छाननीची व मंजुरीची प्रक्रिया सुलभ केली जाईल.

२ आवश्यक कागदपत्रे मिळवून देण्यासाठी तालुका व जिल्हा पातळीवर संबंधित विभागांच्या अधिकाऱ्यांच्या सहाय्याने त्रैमासिक शिबीरे आयोजित केली जातील.

३ मुले ए.आर.टी. ( antiretroviral therapy ) वर असल्यास या एकमात्र निकषाच्या आधारे त्यांना बाल संगोपन योजना व यासारख्या इतर योजनांचे लाभार्थी म्हणून पात्र समजले जाईल. इतर योजनांसाठीही याचप्रकारे धोरण ठरवता येईल.

४ ४० वर्षे वरील देह विक्रीतून निवृत्त महिलांना संजय गांधी निराधार योजनेतील निर्वाह वेतन अनुदान मिळण्यातील अटी शिथिल करण्यात येतील.

५ वयाचा दाखला, रेशन कार्ड आणि नागरिकत्वाचा दाखला यासारखी कागदपत्रे लवकर मिळवून देण्याची व्यवस्था केली जाईल.

६ बाल मजुरी, बाल लैंगिक अत्याचार आणि बालकांची मानवी वाहतूक याला अटकाव करण्यासाठी बाल संरक्षणांच्या उपाययोजना सक्षम करुन त्यांची प्रभावी अंमलबजावणी केली जाईल.

७ देह विक्री करणाऱ्या महिलांच्या मुलांसाठी दिवसा व रात्रीकरीता पाळणाघरांची व्यवस्था केली जाईल.

## ६. पोलीसांची भूमिका.

१ पोलीसांमार्फत धाडी टाकून सुटका केली जाते, त्यावेळी देह विक्री करणाऱ्या महिलांना मानवी अधिकार आहेत याची जाणीव ठेऊन त्या अधिकारांचा आदर केला जाईल व शासनाने विहित केलेल्या एस.ओ.पी.( Standard Operating Protocol) नुसार कार्यवाही करण्यात येईल.

२ पोलीसांमध्ये जाणीव जागृती आणि देह विक्री व्यवसायातील गुन्हेगारी दूर करण्याच्या दृष्टीने ठोस उपाययोजनांची आखणी व अंमलबजावणी केली जाईल.

३ हे धोरण विविध स्वयंसेवी संस्था, व्यक्ती व तज्ञ जानकार व्यक्ती यांची समिती नेमूण त्यांच्या शिफारशी नुसार बनविले जाईल. पोलीसांची धाडसत्रे ही देह विक्री करणाऱ्या महिलांच्या अडचणींमध्ये आणखी भर टाकणारी ठरु नयेत, यासाठी धाडी टाकून सुटका करणे व पुनर्वसन यासाठी सर्वकष धोरण ठरविण्यात येईल.

४ देह विक्री करणाऱ्या महिलांचे जोडीदार, वस्तीतील गुंड आणि पोलीस यांच्याकडून होणाऱ्या अत्याचारापासून महिलांना संरक्षण दिले जाईल.

५ लैंगिक व्यवसाय करणाऱ्या महिलांसाठी पोलीस स्टेशनमध्ये समुपदेशन केंद्र आणि आरोग्य सेवा उपलब्ध करुन देण्याबाबत कार्यवाही करण्यात येईल.

***********

# २४. तृतीयपंथी व्यक्तींकरीता.

तृतीयपंथींय व्यक्तींबद्दल सर्वसाधारणपणे तिरस्कार किंवा चेष्टेची भावना समाजात प्रचलित असलेली दिसते व त्यामुळे त्यांच्या माणूस म्हणून जगण्याच्या मूलभूत मानवी अधिकारांची पायमल्ली होत असते. परंतु प्रत्यक्षात ज्या व्यक्तींचे शरीर पुरुषांचे आणि मानसिकता, हावभाव, वर्तणूक, बोलणे–चालणे हे पूर्णपणे स्त्रीचे आहे, अशा व्यक्तीला तृतीयपंथी म्हणतात. सर्वसाधारणपणे जन्मत:च ज्यांच्या लिंगात विकृती निर्माण झालेली असते किंवा ज्यांच्या शरीरात संप्रेरकांचे (हार्मोनल) असंतुलन निर्माण झालेले असते किंवा ज्यांची वाढच पूर्णपणे मुली व स्त्रिया यांच्या प्रभावाखाली आल्याने वर्तणूक स्त्रियांसारखी होते आणि त्याचबरोबर जे विविध कारणांसाठी लिंग विच्छेदाचा मार्ग स्वीकारतात, अशा सर्व व्यक्तींचा तृतीयपंथीयांमध्ये समावेश होतो.

तृतीयपंथीयांना हिजडा, पवय्ये, खोजे, बंदे देवडा, फालक्या, फातडा, मंगलमुखी, तिरुगाई खोती, आखणी, शिवशक्ती, लुगडंवाला, जोगते, किन्नर, इमेल अशा विविध संबोधनांनी ओळखले जाते. समाजाच्या मुख्य प्रवाहापासून बाहेर फेकल्या गेलेल्या वंचित, शोषित अशा तृतीयपंथीयांना कायदेशीर मान्यता देऊन त्यांना आरोग्य, शिक्षण, रोजगार, मतदान, निवडणूक लढविण्याचा हक्क, वारसा हक्क, विवाह, पालकत्वाचा हक्क, मूल दत्तक घेण्याचा हक्क इत्यादी मूलभूत मानवी हक्क उपभोगण्याचा पूर्ण अधिकार आहे.

तृतीयपंथींची लिंगनिहाय ओळख करुन त्यांचा विकास घडवून आणणे आवश्यक आहे. तृतीयपंथीयांना कायदेशीर मान्यता देऊन त्यांना आरोग्य, शिक्षण, मतदान, निवडणूक लढविण्याचा हक्क, वारसा हक्क, विवाह, पालकत्वाचा हक्क व मुल दत्तक घेण्याचा हक्क इत्यादी अधिकार त्यांना देण्याची गरज आहे.

रोजगाराची कोणतीही शाश्वती नसल्यामुळे महाराष्ट्रातील तृतीयपंथी फार मोठ्या प्रमाणावर शरीरविक्रीचा, भीक मागण्याचा, धार्मिक कार्यक्रम, जन्म व विवाहप्रसंगी घरोघरी जाऊन आशिर्वाद देण्याचा व्यवसाय करतात. बहुतांश तृतीयपंथीयांना त्यांच्या कुटुंबातून बाहेर टाकले जाते. तृतीयपंथींच्या बाबतीत होणारा भेदभाव, शिक्षणाचा अभाव, बेरोजगारी, गरीबी यामुळे तृतीयपंथींकडे बघण्याचा दृष्टीकोन बदलत आहे. आंतरराष्ट्रीय संकेत व कायद्यानुसार लैंगिक ओरिएंटेशन व लिंग ओळख (Gender Identity) काहीही असली तरी सर्वजण समान आहेत व सर्वांना समान मानवी हक्क मिळाले पाहिजेत, अशा विचारधारणेला पाठिंबा मिळत आहे. या विचारधारणेला अनुसरुन तृतीयपंथींयांना त्यांचे मानवी हक्क मिळवून देणे हे सरकारचे कर्तव्यच आहे. तृतीयपंथीयांचे प्रश्न तसेच त्यांचा जीवन संघर्ष संपविण्याच्या दृष्टिकोनातून त्यांना २०१३ च्या महिला धोरणात विशेष स्थान देण्याचे ठरविले आहे. तृतीयपंथींचे जीवनमान सुधारावे व त्यांच्या मानवी हक्कांचे संरक्षण व्हावे म्हणून खालील पावले उचलण्यात येतील.

## १. सार्वजनिक आरोग्य

तृतीयपंथींना भेदभावाच्या दृष्टिकोनामुळे सार्वजनिक आरोग्य सेवांचा लाभ घेता येत नाही. सबब समाजातील इतर घटकांना ज्या मोफत आरोग्य सेवेचा लाभ मिळतो तसा लाभ तृतीयपंथींना मिळण्याची व्यवस्था केली जाईल. तसेच डॉक्टर व रुग्णालयातील कर्मचारी यांचा तृतीयपंथीयांकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलून त्यांना संवेदनशील करण्याची प्रक्रिया सुरु करण्यात येईल. एच.आय.व्ही. रोगासंबंधीच्या व्यवस्थापनेचे प्रशिक्षण डॉक्टर, रुग्णालयातील कर्मचारी व तृतीयपंथींना नियमितपणे देण्यात येईल. एमसीआय आणि आयटीएमआर मार्फत लिंगबदल शस्त्रक्रियेबाबत कायद्यातील संदिग्धता दूर करणे आवश्यक आहे. तसेच याविषयी शस्त्रक्रियेपूर्वी व नंतर सर्व सार्वजनिक रुग्णालयांमध्ये तृतीयपंथींना मोफत मार्गदर्शन उपलब्ध करुन देण्याबाबत सार्वजनिक आरोग्य खात्यामार्फत सर्व आरोग्य संस्थांना मार्गदर्शक तत्वे बनवून देण्यात येतील. अशा शस्त्रक्रियांसंदर्भात विविध प्रसार माध्यमांद्वारे जनजागृती करणे व या व्यक्तींसाठी उपचार व शस्त्रक्रिया यासाठी आरोग्य विम्यासारख्या योजना अंमलात आणल्या जातील. National Aids Control Organisation & National Aids Control Progarmme या बाबतची माहिती देण्यात येईल व नियमित वैद्यकीय तपासणी करण्यात येईल.

## २. शिक्षण

जन्मदाखला, वास्तव्याचा पुरावा नसल्याने तृतीयपंथींना शाळा व महाविद्यालयीन प्रवेशात अडचणी येतात. भेदभावामुळे तृतीयपंथींना शिक्षण पूर्ण करता येत नाही. हे लक्षात घेऊन तृतीयपंथींना शिक्षणाची संधी उपलब्ध करुन देणे, त्यांच्या प्रवेशासाठी लागणारी कागदपत्रे तसेच वास्तव्याचा पुरावा यासंबंधीचे नियम शिथिल करणे, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांना तृतीयपंथींच्या प्रश्नाबाबत संवेदनाक्षम बनवणे, यासाठी शिक्षण, आरोग्य खाते व महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण संस्था यांच्यात योग्य समन्वय साधला जाईल. तृतीयपंथी मुलांसाठी बोर्डींग शाळेची व्यवस्था केली जाईल. प्रौढ तृतीयपंथीयांकरीता विशेष साक्षरता अभियान राबविण्यात येईल. तृतीयपंथी विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी शून्य व्याजदर कर्ज देण्यासंबंधी योजना व शालेय शिक्षणासाठी शिष्यवृत्ती सुरु केली जाईल.

## ३. कौशल्यविकास

१ कौशल्य विकास, कामगार व उद्योग खात्यांना जोडून तृतीयपंथींना आर्थिक सहाय्यासह व्यावसायिक संधी उपलब्ध करुन देण्यासाठी **एक खिडकी (One Window)** संकल्पना राबविण्यात येईल.

२ तृतीयपंथींना लघु उद्योगासंबंधी माहिती व प्रशिक्षण मिळण्याची शासन विशेष तरतूद करेल.

## ४. निवारा

तृतीयपंथासाठी महिला व बाल विकास विभागामार्फत विशेष घरकुल योजना राबविण्यासाठी जमिन व निधी उपलब्ध करून देण्यात येईल त्यासाठी लागणाऱ्या रहिवासी, अधिवास, उत्पन्न इ. कागदपत्रांची पूर्तता करण्यासाठी महिला व बाल विकास विभागामार्फत संस्था निश्चित करण्यात येतील.

## ५. स्वयंसहाय्यता बचत गट

**तृतीयपंथींसाठी** बचत गट स्थापण्यासाठी महिला आर्थिक विकास महामंडळातर्फे मदत केंद्र उघडले जाईल. तृतीयपंथींना कौशल्य विकास व नेतृत्व विकासाची संधी देण्यात येईल.

## ६. सामाजिक सुरक्षितता.

तृतीयपंथींना गुलाबी रंगाचे रेशनकार्ड देण्याचा विचार करण्यात येईल. केंद्र सरकार व योजना आयोग यांना तृतीयपंथींची ओळख मान्य करण्याची शिफारस केली जाईल. त्यांना कायमस्वरुपी ओळखपत्र देण्यात येईल.

## ७. कायदा व गुन्हेगारी.

मा.सर्वोच्च न्यायालयाने डि.के.बसू विरुध्द स्टेट ऑफ बंगाल या न्याय निर्णयात व्यक्तीच्या अटकेसंदर्भात दिलेल्या मार्गदर्शक तत्वांची अंमलबजावणी तृतीयपंथीयांबाबत देखील करण्यात पुढाकार घेण्यात येईल. भा.दं.वि. चे कलम ३७७ संबंधी दिलेल्या न्यायालयीन निर्णय तृतीयपंथींना देखील लागू असल्यासंबंधी पोलीस अधिकाऱ्यांना प्रशिक्षण देण्यात येईल. महाराष्ट्रात तृतीयपंथींची जनगणना करण्यात येईल. विविध कल्याणकारी कार्यक्रम तृतीयपंथीयांकरीता राबविण्यासाठी एक राज्यस्तरीय समितीचे गठन करण्यात येईल. या समितीमध्ये तृतीयपंथींयांचे प्रतिनिधी, कार्यकर्ते व स्वयंसेवी संस्थांचा समावेश असेल. तृतीयपंथींयांच्या समस्यांचे संशोधन करुन त्यांच्या पुनर्वसनासाठी कल्याणकारी योजना राबविण्यात येईल. तृतीयपंथीयांना प्रमाणपत्रे इत्यादी मिळण्याकरीता तहसिल स्तरावर योग्य निर्देश देण्यात येतील. तृतीयपंथींचे गुन्हेगारीकरण रोखण्यासाठी पोलीस खात्यास संवेदनशील करण्यात येईल. तृतीयपंथींना अटक झाल्यावर त्यांना वैद्यकीय, कायदेशीर मदत मिळेल अशी तरतूद केली जाईल. या सर्व तरतुदींची अंमलबजावणी करत असतांनाच या व्यक्तींना सन्मानाने माणूस म्हणून जगता यावे, यासाठी सर्वंकष कायदा तयार करण्याच्या दृष्टीने पावले उचलली जातील.

## ८. पुरस्कार

**तृतीयपंथींचा** सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक विकास होण्यासाठी भरीव कामगिरी करणाऱ्या तृतीयपंथी व इतर सामाजिक संस्था आणि कार्यकर्ते यांना विशेष पुरस्कार देऊन पुरस्कृत करण्यात येईल.

## ९. सिनेमा / नाटक

**तृतीयपंथींच्या** समस्या समाजापुढे मांडणे गरजेचे आहे. त्याकरीता तृतीयपंथींच्या समस्या मांडण्यासाठी निर्मित केलेल्या सिनेमा व नाटकांना सरकारतर्फे आर्थिक मदत देण्यात येईल.

## १०. तृतीयपंथी कल्याणकारी बोर्ड

तृतीयपंथी कल्याणकारी योजना राबविण्यासाठी राज्यस्तरीय तसेच जिल्हानिहाय वेगळा **कल्याणकारी बोर्ड** निर्माण करण्यात येईल.

शासनाच्या वैद्यकीय अधिकाऱ्यांकडून तृतीयपंथी असा दाखला दिल्यानंतरच, तृतीयपंथीयांना सर्व योजनांचा लाभ देण्यात येईल.

## ११. कला अकादमी

तृतीयपंथी यांच्या गुणांचे संवर्धन होण्यासाठी,त्यांना प्रशिक्षण व व्यासपीठ मिळण्यासाठी कला अकादमी स्थापन करण्यात येईल.

**********

## २५. विविध क्षेत्रातील महिलांच्या योगदानाबद्दल पुरस्कार.

सर्वच क्षेत्रात महिलांनी अत्युत्कृष्ट कर्तबगारी दाखविली आहे. शिक्षण, आरोग्य, कल्याणकारी उपक्रम यासारख्या परंपरागत क्षेत्रात त्यांनी विशेष कर्तव्य दाखविलेच आहे. शिवाय परंपरेने पुरुषांची मक्तेदारी असलेल्या क्षेत्रांतही त्यांनी आपला ठसा उमटविला आहे. एक आदर्श निर्माण केला आहे. त्याच्या कर्तृत्वाची कदर करण्यासाठी व त्यांच्या कार्यातून इतरांना प्रेरणा मिळावी, याकरीता शासन योजना आखील.

महिला व बाल कल्याण क्षेत्रात उत्कृष्ट कार्य करीत असलेल्या समाजसेविकांच्या व संस्थांच्या उत्कृष्ट कामाची कदर करण्यासाठी व इतरांना प्रेरणा मिळावी, याकरीता दिनांक १५ ऑक्टोबर, १९९६ च्या शासन निर्णयान्वये दरवर्षी राज्य स्तरावर एक महिला समाजसेविकेला राज्यस्तरीय पुरस्कार, जिल्हास्तरावर प्रत्येक जिल्ह्यातून एका समाजसेविकेला जिल्हास्तरीय पुरस्कार आणि विभागीय स्तरावर प्रत्येक महसूल विभागातून एका संस्थेला विभागीय स्तरीय पुरस्कार दिला जातो.

महिला फक्त सामाजिक क्षेत्रातच कार्यरत नसून महिला आता आयटी क्षेत्र, सरकारी नोकऱ्या, सार्वजनिक उपक्रम, विविध संशोधने, उद्योग अशा क्षेत्रातही आपल्या कार्याचा ठसा उमटवित आहेत. त्यामुळे त्याच्या कार्यास प्रोत्साहन देण्यासाठी शासनाच्या प्रत्येक विभागाला राज्यातून उत्कृष्ट काम करणाऱ्या महिलांसाठी पुरस्कार योजना तयार करण्याचे आदेश देण्यात येतील व त्यानुसार प्रत्येक विभागाच्या तीन महिलांना प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकाची पारितोषिके देण्यात येतील व या सर्व पारितोषिकांचे वितरण जागतिक महिला दिनी करण्याचे बंधन सर्व विभागांना घालून देण्यात येईल. तसेच सरकारी नोकऱ्या, सार्वजनिक उपक्रमामध्ये कार्यरत असलेल्या पुरस्कार प्राप्त महिलांना विशेष वेतनवाढी देण्यात येतील.

जीवनातील हक्क संधी व शैक्षणिक संधी याबाबत स्त्रियांना जागृत करण्यासाठी केला जाईल.यासंदर्भात चांगले काम करणाऱ्या ग्रामपंचायतीला आर्थिक स्वरुपात बक्षिसे /सन्मानचिन्हे व समाजमान्यता देऊन गौरविण्यात येईल.

अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती इतर मागासवर्गीय/अल्पसंख्यांक महिलांसाठी काम करणाऱ्या महिलांना पुरस्कार देण्यात येतील.

आरोग्य क्षेत्रात काम करणाऱ्या वैयक्तिक महिला / बचत गट / महिला संघ / महिला संस्था यांना प्रोत्साहनपर पुरस्कार देण्यात येतील.

ज्या पुरूषांनी स्त्रियांच्या सक्षमीकरणासाठी व सुधारणा करण्याकरिता वैशिष्ट्यपूर्ण योगदान दिले असेल अशा पुरूषांना देखील विशेष पुरस्काराने सन्मानित करण्यात येईल.

***********

# ऋण–निर्देश

माझ्या अध्यक्षतेखाली व मा.ना.प्रा.फौजिया खान, राज्यमंत्री, महिला व बाल विकास यांच्या उपाध्यक्षतेखाली महाराष्ट्र राज्याचे तिसरे महिला धोरणाचा मसुदा तयार करताना शासनाच्या महिला व बाल विकास विभागाने शासन निर्णय क्र.संकीर्ण–२००८/प्र.क्र.२६१/भाग(१) कार्यासन २, दिनांक १२/०५/२०१३ अन्वये समिती गठित करण्यात आली होती. या समितीने तिसरे महिला धोरणाचा मसुदा तयार करण्याकरीता नऊ विषयांसाठी स्वतंत्रपणे नऊ उपसमित्या तयार केल्या होत्या. या समितीमध्ये खालीलप्रमाणे मान्यवरांचा समावेश करण्यात आला होता.

| अ.क्र. | विषय | विषयनिहाय गट सदस्य |
|---|---|---|
| १ | महिलांना केंद्रस्थानी मानून नियोजन / जेंडर बजेट / पाळणाघर / महिलांच्या अतिउत्कृष्ट कामाबद्दल योजना / सुरक्षा बलात कार्य करणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या पत्नीस प्रोत्साहन देण्याकरीता योजना. | श्रीमती शोभाताई फडणवीस, समन्वयक<br>श्रीमती मिनाक्षी पाटील,<br>श्रीमती निलमताई गोऱ्हे,<br>श्रीमती रजनीताई सातव,<br>डॉ.श्रीमती क्रांती जेजुरकर,<br>श्रीमती ज्योती म्हापसेकर,<br>श्रीमती सईदा नाईक,<br>ॲड.डॉ. श्रीमती वर्षा रोकडे,<br>श्रीमती नलिनी पाटील,<br>श्रीमती दिप्ती ताम्हाणे,<br>श्रीमती शितल म्हात्रे,<br>श्री. एम.डी. बोरखडे, सदस्य सचिव<br>उप आयुक्त, महिला व बालविकास<br>आयुक्तालय, पुणे |
| २ | महिलांसाठी सनद / महिलांविषयक कायदे / कैद्यांच्या पत्नींचे प्रश्न / मालमत्ता विषयक हक्क / देवदासींचे प्रश्न / सुरक्षा व संरक्षण / कायदा समिती / राजसत्ता | श्रीमती उषाताई दराडे, समन्वयक<br>श्रीमती शोभाताई फडणवीस,<br>ॲड. रजनीताई सातव,<br>श्रीमती निलमताई गोऱ्हे,<br>ॲड. फ्लेव्हिया एग्नीस ,<br>ॲड.श्रीमती पूजा कुटे,<br>श्रीमती सीमाताई साखरे,<br>श्रीमती हेमा पटवर्धन,<br>ॲड.डॉ. श्रीमती वर्षा रोकडे,<br>ॲड. श्री. राजीव चव्हाण,<br>ॲड. श्रीमती सना सय्यद, |

| | | |
|---|---|---|
| | | ॲड. श्रीमती बॉबी मल्होत्रा,<br><br>ॲड. श्रीमती रेणुका घुले,<br>ॲड. श्रीमती कुमूताई वाघमारे,<br>श्रीमती सुरेखा ठाकरे,<br>श्रीमती चित्रा वाघ,<br>श्रीमती वैशाली नागवडे,<br>श्री. एम.डी. बोरखडे, सदस्य सचिव<br>उप आयुक्त, महिला व बालविकास<br>आयुक्तालय, पुणे |
| ३ | कृषी, ग्रामीण, शहरी क्षेत्रातील महिलांची भूमिका / पाणी पुरवठा | श्रीमती कमलताई व्यवहारे, समन्वयक<br>श्रीमती उषाताई दराडे,<br>श्रीमती निर्मला गावित,<br>श्रीमती सीमाताई साखरे,<br>प्रा. श्रीमती नंदा कांबळे,<br>प्रा. श्रीमती मंगला जंगले,<br>श्रीमती वैशाली मोटे,<br>श्रीमती ज्योती पावरा,<br>श्री. किरण काळे,<br>श्री. अभिजित खानविलकर,<br>ॲड.डॉ. श्रीमती वर्षा रोकडे,<br>श्रीमती छाया पाटील,<br>श्रीमती प्रतिभा शिंदे,<br>श्री. महेंद्र गायकवाड, सदस्य सचिव<br>बाल विकास प्रकल्प अधिकारी |
| ४ | व्यसनमुक्ती / शिक्षण / वसतीगृह / सांस्कृतिक दृष्टीकोन | श्रीमती विद्या चव्हाण, समन्वयक<br>श्रीमती दिप्ती चवधरी,<br>श्रीमती माधुरी मिसाळ,<br>श्रीमती सुमेधा नाईक,<br>श्रीमती फरीदा लांबे,<br>श्रीमती सुरेखा पाटील,<br>श्री. दत्ता बाळसराफ,<br>श्रीमती बीना लष्करी,<br>श्री. विजय कान्हेकर,<br>श्रीमती वर्षा खन्ना,<br>श्रीमती सिसीलिया कारलेस,<br>श्रीमती सुवर्णा पवार, सदस्य सचिव<br>बाल विकास प्रकल्प अधिकारी |

| | | |
|---|---|---|
| ५ | आरोग्य / प्रसाधनगृह सुविधा / पर्यावरण | श्रीमती अलका देसाई, समन्वयक<br>श्रीमती यशोमती ठाकूर,<br>श्रीमती मीराताई रेगे पाटील,<br>श्रीमती मिनाक्षी पाटील,<br>श्रीमती प्रणिती शिंदे,<br>डॉ. श्रीमती वर्षा वर्गीस,<br>डॉ. श्री. दिलीप घुले,<br>डॉ. श्री. सचिन जाधव,<br>डॉ. श्री. समीर दलवाई,<br>श्रीमती प्रतिमा उके,<br>श्री. श्रीधर पाटील,<br>श्रीमती ललिता कचरु यादव,<br>श्रीमती रोहिणी जाधव,<br>डॉ. श्री. विवेक कोरडे,<br>श्रीमती भारती बा. धांडगे,<br>ॲड.डॉ. श्रीमती वर्षा रोकडे,<br>डॉ. श्रीमती कामाक्षी भाटिया,<br>श्रीमती एमेंन्डा फर्नांडिस,<br>श्रीमती मनिषा बिरारीस, सदस्य सचिव<br>बाल विकास प्रकल्प अधिकारी |
| ६ | जाणीव / जागृती / एन.जी.ओ. संनियंत्रण व परिवेक्षण / अपंग मतिमंद मुली | डॉ. श्रीमती सुरेखा पाटील, समन्वयक<br>श्रीमती यशोमती ठाकूर,<br>श्रीमती अलका अनंत देसाई,<br>श्रीमती शामला दिगंबरराव बागल,<br>श्रीमती स्नेहजा रुपवते,<br>श्रीमती चेतना सिन्हा,<br>श्रीमती दिपा देशमुख,<br>श्री. निलेश राऊत,<br>श्री. निलेश पुराडकर,<br>ॲड.डॉ. श्रीमती वर्षा रोकडे,<br>श्री.दिलीप हिवराळे, सदस्य सचिव<br>बाल विकास प्रकल्प अधिकारी |
| ७ | स्वयंसहाय्यता बचत गट | श्रीमती मंदा म्हात्रे, समन्वयक<br>श्रीमती पंकजा मुंडे-पालवे,<br>श्रीमती कमलताई व्यवहारे,<br>श्रीमती प्रभाताई ओझा,<br>श्रीमती वीणा पुनाचा, |

| | | |
|---|---|---|
| | | श्रीमती निलीमा तपस्वी,<br>श्रीमती ज्योती पठाणीया,<br>श्रीमती समिना खोराकीवाला,<br>श्री. विश्वास ठाकूर,<br>श्रीमती नलिनी चंदेले,<br>श्रीमती शकुंतला थोरात,<br>श्रीमती वैशाली मोटे,<br>श्रीमती सुलभा खोडके,<br>श्री प्रविण बनसोडे, सदस्य सचिव<br>उपव्यवस्थापक, महिला आर्थिक विकास महामंडळ, मुंबई |
| ८ | असंघटित कामगार महिलांकरिता | श्रीमती सुशिबेन शहा, समन्वयक<br>श्रीमती ॲनी शेखर,<br>श्रीमती मनिषा निमकर,<br>श्रीमती कांता नलावडे,<br>श्रीमती विद्या चव्हाण,<br>श्रीमती मेधा त्रिवेदी,<br>श्रीमती निला लिमये,<br>श्रीमती स्मिता कांबळे,<br>श्रीमती रेणूका सोनावणे,<br>श्री जे.बी.गिरासे,<br>सदस्य सचिव, जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी, मुंबई |
| ९ | लैंगिक व्यवसायात शोषण झालेल्या पीडित महिला व तृतीयपंथी यांच्या समस्येबाबत | लक्ष्मी नारायण त्रिपाठी, समन्वयक<br>श्रीमती नगमा<br>श्रीमती अनू स्वामी,<br>श्रीमती काशी जाधव,<br>श्रीमती उषा देसाई,<br>श्री. पंकजकुमार बेदी,<br>श्रीमती संयोगिता ढमढेरे,<br>श्रीमती अरनेस्ट नरहोना,<br>श्री. अथर्व नायर,<br>श्री.आनंद बाखडे,<br>श्रीमती मीनू शेशू,<br>श्री. डी. एम. निंबोरकर,<br>श्रीमती गौरी सावंत,<br>श्रीमती शोमिता बिश्वास, सदस्य सचिव, महाराष्ट्र राज्य महिला आयोग |

महिला धोरण अंतिम करण्यासंदर्भात शासनाच्या महिला व बाल विकास विभागाने शासन निर्णय क्र.संकीर्ण–२००८/प्र.क्र.२६१/भाग–(१)का–२, दिनांक ८.५.२०१३ अन्वये राज्य स्तरीय समिती गठित करण्यात आली होती. या राज्य स्तरीय समितीमध्ये श्रीमती निलमताई गोऱ्हे, आ.श्रीमती शोभाताई फडणवीस, माजी आमदार श्रीमती उषा दराडे, श्रीमती फरीदा लांबे, ॲड. श्रीमती पुजा कुटे, डॉ.श्रीमती क्रांती जेजुरकर, श्रीमती ज्योती म्हापसेकर, ॲड. राजीव चव्हाण, श्रीमती लक्ष्मीनारायण त्रिपाठी आणि श्री.राजेंद्र चव्हाण (भाप्रसे) आयुक्त महिला व बाल विकास पुणे या मान्यवरांचा समावेश करण्यात आला होता.

वरील समित्यांमध्ये महिलांच्या प्रश्नांची जाण असणारे व तळागाळात काम करणारे सामाजिक कार्यकर्ते, महिला संघटनांचे प्रतिनिधी, लोकप्रतिनिधी व विषयतज्ञांचा समावेश करण्यात आला होता. उपरोक्त मान्यवरांनी गठीत समितीच्या बैठकीस वेळोवेळी उपस्थित राहून धोरण ठरविताना विषयनिहाय आपल्या अमूल्य सूचना दिल्या व मार्गदर्शन केले. याबाबत त्यांचे आभार मानण्यात येत आहेत. महिला धोरणाचा मसुदा तयार झाल्यावर तो शासनाच्या संकेतस्थळावर जनतेसाठी तात्काळ दि.०८/०३/२०१३ रोजी उपलब्ध करुन दिल्याबद्दल माहिती तंत्रज्ञान विभागाचे आभार मानण्यात येत आहेत.

महिला धोरणाच्या मसुद्याबाबत अनेक स्वयंसेवी संस्थांनी अभ्यास करुन आपल्या ज्या शिफारशी पाठविल्या त्या राज्य स्तरीय समितीने विचारात घेतल्या आहेत. त्यांच्या या योगदानाबद्दल आभार मानण्यात येत आहेत. केंद्र शासनाच्या महिला व बाल विकास मंत्रालयाने महिला धोरणाच्या मसुद्यातील शिफारशीबाबत दखल घेवून विशेष कौतुक केले व आपले अमुल्य मार्गदर्शन धोरण निर्मितीत दिल्याबाबत त्यांचे आभार मानण्यात येत आहे. तसेच ज्या मंत्रालयीन प्रशासकीय विभागाने महिला धोरणाबाबत त्यांचे सुस्पष्ट मत मांडले. याबाबत त्यांचेही आभार मानण्यात येत आहेत.त्याचप्रमाणे महिला धोरणाबाबत प्राप्त झालेल्या शिफारशी संकलित करुन, त्यांचे राज्य स्तरीय समितीसमोर सादरीकरण करण्यासाठी मा.श्री.राजेन्द्र चव्हाण (भाप्रसे), आयुक्त, महिला व बाल विकास, पुणे यांचे आणि त्यांच्या कार्यालयातील संबंधित अधिकारी व कर्मचारी तसेच श्रीमती शोमिता बिश्वास (भावसे), सदस्य सचिव, महाराष्ट्र राज्य महिला आयोग यांनी व त्यांचे कार्यालयातील संबंधित अधिकारी व कर्मचारी यांनी विशेष परिश्रम घेतले यासाठी त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.

सदर महिला धोरणाचा मसुदा तयार करताना आणि महिला धोरण अंतिम करतांना राज्य शासनाने स्थापन केलेल्या समित्यांचे अध्यक्ष आणि सदस्य यांचेशी समन्वय साधणे, बैठकांचे नियोजन करणे, समित्यांनी सादर केलेल्या शिफारशी संकलित करणे आणि टंकलेखन करुन महिला धोरण तयार करण्यासाठी श्री.प्रमोद वळंज, कक्ष अधिकारी, महिला व बाल विकास विभाग, श्री.शांताराम लोंढे, विधी तज्ञ, महाराष्ट्र राज्य महिला आयोग आणि श्री.लिलाधर रा. गुमगावकर, लिपिक–टंकलेखक, श्री.दत्ताराम वासावे, लिपीक, महिला व बाल विकास विभाग यांनी तत्परतेने व सातत्त्याने पार पाडले. त्यांच्या या उल्लेखनीय कामगिरीबद्दल त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे. त्याचप्रमाणे महिला धोरणाबाबत

प्राप्त सर्व शिफारशींचे आकलन करुन,महिला धोरणामध्ये त्याचे योग्य शब्दांकन करुन एकसूत्रता ठेवण्याकामी श्रीमती प्रतिमा जोशी, मुख्य वार्ताहर, महाराष्ट्र टाईम्स, दलित मित्र प्रा.श्रीमती साधना झाडबुके, सामाजिक कार्यकर्त्या आणि प्रा.सुनीता कुलकर्णी, सदस्या, महिला विकास कक्ष, मुंबई विद्यापीठ – पी.डी.कारखानीस महाविद्यालय, अंबरनाथ, ॲड.श्री.राजीव चव्हाण व ॲड.श्रीमती पुजा कुटे यांनी जे बहुमूल्य योगदान दिले आहे. त्याबद्दल त्यांचे विशेष आभार व्यक्त करण्यात येत आहे. महिला धोरण तयार करताना शासकीय यंत्रणेसोबत सर्व संबंधित लोक प्रतिनीधी व स्वयंसेवी संस्थांचे प्रतिनिधी यांचेमध्ये समन्वय साधून कालमर्यादित महिला धोरण तयार करण्यासाठी माझे कार्यालयातील श्री.कैलास पगारे खाजगी सचिव आणि इतर स्वीय सहाय्यक आणि कर्मचारी यांनी घेतलेल्या विशेष परिश्रमाबद्दल त्यांचेही अभिनंदन करण्यात येत आहे. तसेच मा. राज्यमंत्री महिला व बाल विकास यांचे खाजगी सचिव श्री.किरण पाटील यांनी महिला धोरण अंतिम करताना घेतलेल्या विशेष सहभागाबद्दल त्यांचेही अभिनंदन करण्यात येत आहे. त्याचप्रमाणे नवनीत एज्युकेशन लिमिटेड, मुंबई यांनी या पुस्तिकेचे टंकलेखन आणि छपाई तातडीने आणि विनामूल्य करून दिल्याबद्दल त्यांचे विशेष आभार मानण्यात येत आहेत.

मा.श्री.उज्वल ऊके, प्रधान सचिव (भा.प्र.से.), महिला व बाल विकास विभाग यांनी महिला धोरणाचा बारकाईने अभ्यास करुन, यामध्ये यथोचित सुधारणा करुन, त्याचप्रमाणे नवीन तरतूदी आणि मुद्दे समाविष्ट करून हे महिला धोरण जनतेपुढे सादर केले आहे. याबद्दल त्यांचे विशेष अभिनंदन करण्यात येत आहे.

महाराष्ट्र राज्याचे तिसरे महिला धोरण www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

या महिला धोरणाची राज्यात शासकीय व अशासकीय यंत्रणा त्याचबरोबर लोक सेवक आणि जनता यांनी आदरपूर्वक आणि गांभीर्याने अंमलबजावणी केल्यास महिलांचे समाजात सामाजिक, आर्थिक, कायदेशीर, शैक्षणिक, सर्वांगिण विकास आणि सक्षमीकरण करण्यास निश्चितच हातभार लागेल, याची मला खात्री आहे.

दिनांक : ९ मार्च, २०१४

आपली,

**( प्रा.वर्षा गायकवाड )**
**मंत्री,**
**महिला व बाल विकास,**
**महाराष्ट्र शासन**

***********